# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५२

## सभावृत्तांत

दिनांक - १९.१२.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर-२०१५ ची मासिक मा. महापालिका सभा शनिवार दि.१९.१२.२०१५ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
५. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
६. मा.सायकर अजय शंकरराव
७. मा.जाधव साधना रामदास
८. मा.जाधव राहुल गुलाब
९. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१०. मा.काळजे नितीन प्रताप
११. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१२. मा.बाबर शारदा प्रकाश
१३. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१४. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१५. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१६. मा.पवार संगीता शाम
१७. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
१८. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१९. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२०. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२१. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२२. मा.भारती फरांदे

२३. मा.आर.एस.कुमार

२४. मा.जावेद रमजान शेख

२५. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२८. मा.नंदा विकास ताकवणे

२९. मा.नेटके सुमन राजेंद्र

३०. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३१. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३२. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३४. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३६. मा.अपर्णा निलेश डोके

३७. मा.अनंत सुभाष को-हाळे

३८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३९. मा.जयश्री वसंत गावडे

४०. मा.पवार मनीषा काळूराम

४१. मा.प्रसाद शेट्टी

४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४४. मा.शेख अस्लम शैकत

४५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४७. मा.वाबळे संजय मल्हारराव

४८. मा.मडिगेरी वर्षा विलास

४९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५०. मा.सुपे आशा रविंद्र

५१. मा.मोहिनीताई विलास लांडे

५२. मा.गोफणे अनुराधा देविदास

५३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५५. मा.महेशदादा किसन लांडगे

५६. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५७. मा.लोंढे शुभांगी संतोष

५८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

५९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६१. मा.पालांडे सुजाता सुनिल

६२. मा.बहल योगेश मंगलसेन

६३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६४. मा.छाया जगन्नाथ साबळे

६५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

६६. मा.आसवाणी सविता धनराज

६७. मा.वाघेरे सुनिता राजेश

६८. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७१. मा.काळे विमल रमेश

७२. मा.पाडाळे निता विलास

७३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७४. मा.विमलताई सुरेश जगताप

७५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

७६. मा.बारणे निलेश हिरामण

७७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७८. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

७९. मा.बारणे माया संतोष

८०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८३. मा.कलाटे स्वाती मयुर

८४. मा.नांदगुडे विलास एकनाथ

८५. मा.चौंधे आरती सुरेश

८६. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

८७. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८८. मा.जवळकर वैशाली राहुल

८९. मा.जगताप राजेंद्र गणपत

९०. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९१. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९२. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९३. मा.जम सोनाली पोपट

९४. मा.प्रशांत शितोळे

९५. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९६. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९७. मा.गायकवाड संध्या सुरदास

९८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९९. मा.शेंडगे आशा सुखदेव

१००. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०१. मा.संजय केशवराव काटे

१०२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.गायकवाड, मा.दंडवते, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.दुधेकर, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.ओंभासे - कार्यकारी अभियंता, मा.मोरे -सह.व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.शिक्षण मंडळाचे सन २०१६-२०१७ चे वार्षिक अंदाजपत्रक मान्यतेकामी सभाकामकाजात दाखल करुन घेणेची मा.स्थायी समितीने ठ.क्र.१४२०३ दि.१५/१२/२००१५ अन्वये केलेली मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ९० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, शरद जोशी-शेतकरी संघटनेचे संस्थापक व माजी खासदार, मोतिराम सिद्धू पवार-हवेली मतदार संघाचे माजी आमदार तथा माजी नगरसदस्य, सविता प्रकाश सोमवंशी-स्वीकृत सदस्य प्रकाश सोमवंशी यांच्या पत्नी, पद्माकर नाना खोपे - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी जनसंपर्क अधिकारी, अनिल श्रीकृष्ण कुलकर्णी-दै.सामना वरिष्ठ जाहिरात अधिकारी, किसनराव शंकरराव ठानगे, रमेश सदाशिव दळवी यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकूब करणेत यावी

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, सभा बुधवार दिनांक २०/०१/२०१६ दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते

**मा.महापौर -** उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे बुधवार दिनांक २०/०१/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ५२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.१९/१२/२०१५ ची तहकूब सभा )</u>**

<u>दिनांक - २०.०१.२०१६</u> <u>वेळ - दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९/१२/२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.०१.२०१६ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४५. मा.जयश्री वसंत गावडे

४६. मा.पवार मनीषा काळूराम

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२. मा.वाबळे संजय मल्हारराव

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.अजित दामोदर गव्हाणे

५९. मा.गोफणे अनुराधा देविदास

६०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६१. मा.महेशदादा किसन लांडगे

६२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६३. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६४. मा.लोंढे शुभांगी संतोष

६५. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६६. मा.सावळे सिमा रविंद्र

६७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६९. मा.पालांडे सुजाता सुनिल

७०. मा.बहल योगेश मंगलसेन

७१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७२. मा.गिता सुशील मंचरकर

७३. मा.छाया जगन्नाथ साबळे

७४. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७५. मा.टाक अरुण मदन

७६. मा.आसवाणी सविता धनराज

७७. मा.वाघेरे सुनिता राजेश

७८. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८१. मा.काळे विमल रमेश

८२. मा.पाडाळे निता विलास

८३. मा.विनोद जयवंत नढे

८४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८५. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८६. मा.विमलताई सुरेश जगताप

८७. मा.बारणे निलेश हिरामण

८८. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८९. मा.बारणे माया संतोष

९०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९३. मा.कलाटे स्वाती मयुर

९४. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९५. मा.चौंधे आरती सुरेश

९६. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९७. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९८. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९९. मा.जवळकर वैशाली राहुल

१००. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०१. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०२. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०३. मा.प्रशांत शितोळे

१०४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०६. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०८. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०९. मा.मोटे किरण बाळासाहेब

११०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१११. मा.संजय केशवराव काटे

११२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११४. मा.पाटील सुजित वसंत

११५. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.दुरगुडे, मा.अष्टीकर - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.पुजारी - कार्यकारी अभियंता, मा.मोरे - सह. व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, पंजाबमधील पठाणकोट येथील दहशतवादी हल्यातील शहीद झालेले सैनिक, मुफ्ती मोहम्मद सईद - जम्मू काश्मिरचे मुख्यमंत्री, जे.एफ.आर. जेकब- निवृत्त लेफ्टनंट जनरल, डॉ.आहेर - माजी आरोग्यमंत्री, ए.बी.वर्धन - ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते, सुरेंद्रकुमार धरणीधर देव महाराज - चिंचवड देवस्थानचे मुख्य विश्वस्त व माजी नगरसदस्य, रोहित वेमूला - हैदराबाद विद्यापीठातील विद्यार्थी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकूब करणेत यावी.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

**मा.महापौर**- श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सभा सोमवार दिनांक २५/०१/२०१६ दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दिनांक २५/०१/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५२**

**सभावृत्तांत**

**(दि.१९/१२/२०१५ व दि.२०/०१/२०१६ ची तहकूब सभा )**

दिनांक - २५.०१.२०१६ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/०१/२०१६ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.२५.०१.२०१६ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३२. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३३. मा.राजू मिसाळ

३४. मा.नंदा विकास ताकवणे

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.लोंढे गणेश नारायण

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.शेख अस्लम शैकत

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.अजित दामोदर गव्हाणे

५९. मा.गोफणे अनुराधा देविदास

६०. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६२. मा.महेशदादा किसन लांडगे

६३. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६४. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६५. मा.लोंढे शुभांगी संतोष

६६. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६७. मा.सावळे सिमा रविंद्र

६८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६९. मा.पालांडे सुजाता सुनिल

७०. मा.बहल योगेश मंगलसेन

७१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७२. मा.गिता सुशील मंचरकर

७३. मा.छाया जगन्नाथ साबळे

७४. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७५. मा.टाक अरुण मदन

७६. मा.आसवाणी सविता धनराज

७७. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८०. मा.काळे विमल रमेश

८१. मा.पाडाळे निता विलास

८२. मा.विनोद जयवंत नढे

८३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८५. मा.विमलताई सुरेश जगताप

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९१. मा.कलाटे स्वाती मयुर

९२. मा.चौंधे आरती सुरेश

९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९५. मा.जवळकर वैशाली राहुल

९६. मा.जगताप राजेंद्र गणपत

९७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९८. मा.जगताप नवनाथ दत्तु

९९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१००. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०१. मा.प्रशांत शितोळे

१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०४. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०६. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०७. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०८. मा.संजय केशवराव काटे

१०९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१११. मा.पाटील सुजित वसंत

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय

अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.चव्हाण, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.अष्टीकर - सहा.आयुक्त, मा.उबाळे- प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तं.ज्ञान अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.दुधेकर, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.घोडे, मा.ओंभासे - कार्यकारी अभियंता, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी, मा.मोरे - सह. व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कै.अविनाश टेकवडे यांचे दु:खद निधन झाले आणि त्यांच्या जागी पोटनिवडणूक झाली त्याच्यामध्ये त्यांच्या पत्नी श्रीमती सुजाता अविनाश टेकवडे यांची निवड झाली त्यामुळे सभागृहाच्या वतीने त्यांचा सत्कार करावा अशी मी सूचना मांडतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, सर्व पदाधिकारी व गटनेते यांचे हस्ते श्रीमती सुजाता टेकवडे यांचा सत्कार करण्यात आला.)

--------

विशेष मा.महापालिका सभा क्रमांक - ४८ दिनांक ०७/०९/२०१५ (दु.१२.०० व १२.१५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७९७ विषय क्रमांक - १

दिनांक - २५/१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.क्रीडा/७अ/कावि/६७१/२०१५ दि.१५/०९/२०१५
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१३७७८ दि. १/१२/२०१५

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दि.१८/११/१५ ठराव क्र.१८ नुसार, महापौर चषक क्रीडा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव देणेची कार्यवाही करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापनेपासून ते आजतागायत मा.महापौर पदाचा कार्यभार सांभाळलेल्या मा.महापौर यांची नावे, कालावधी यांची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | मा.माजी महापौर यांची नावे | कालावधी |
|---|---|---|
| १ | मा.ज्ञानेश्वर पांडुरंग लांडगे | दि.२३/३/१९८६ ते १९/३/१९८७ |
| २ | मा.कै.भिकू वाघेरे (पाटील) | दि.२०/३/१९८७ ते ६/६/१९८७ |
| ३ | मा.कै.अरविंद उर्फ नाना शितोळे | दि.१९/६/१९८७ ते १९/३/१९८८ |
| ४ | मा.कृष्णा शंकर उर्फ तात्या कदम | दि.१९/३/१९८८ ते २०/३/१९८९ |
| ५ | मा.कविचंद भाट | दि.२०/३/१९८९ ते २०/३/१९९० |
| ६ | मा.कै.सादबा उर्फ आप्पासाहेब काटे | दि.२०/३/१९९० ते २०/३/१९९१ |
| ७ | मा.कै.प्रभाकर नारायण साठे | दि.२०/३/१९९१ ते ७/३/१९९२ |
| ८ | मा.आझम फकीरभाई पानसरे | दि.७/३/१९९२ ते २०/३/१९९३ |
| ९ | मा.विलास विठोबा लांडे | दि.२०/३/१९९३ ते १९/३/१९९४ |
| १० | मा.रंगनाथ सदाशिव फुगे | दि.१९/३/१९९४ ते २०/३/१९९५ |
| ११ | मा.संजोग भिकू वाघेरे (पाटील) | दि.२०/३/१९९५ ते २१/३/१९९६ |
| १२ | मा.आर.एस.कुमार | दि.२१/३/१९९६ ते १३/३/१९९७ |
| १३ | मा.सौ.अनिता दत्तात्रय फरांदे | दि.१३/३/१९९७ ते २०/३/१९९८ |
| १४ | मा.हनुमंत भिमराव भोसले | दि.२०/३/१९९८ ते २०/३/१९९९ |
| १५ | मा.कै.मधुकर रामचंद्र पवळे | दि.२०/३/१९९९ ते २४/११/२००० |
| १६ | मा.लक्ष्मण पांडुरंग जगताप | दि.१९/१२/२००० ते १३/३/२००२ |
| १७ | मा.प्रकाश बंडोबा रेवाळे | दि.१३/३/२००२ ते १८/२/२००५ |
| १८ | मा.सौ.मंगलाताई कदम | दि.१८/२/२००५ ते १३/३/२००७ |
| १९ | मा.डॉ.वैशाली घोडेकर (लोंढे) | दि.१३/३/२००७ ते २३/५/२००८ |
| २० | मा.सौ अपर्णा निलेश डोके | दि.६/६/२००८ ते ३०/११/२००९ |
| २१ | मा.योगेश मंगलसेन बहल | दि.१/१२/२००९ ते १३/३/२०१२ |
| २२ | मा.सौ.मोहिनीताई विलास लांडे | दि.१३/३/२०१२ ते १२/९/२०१४ |
| २३ | मा.सौ.शकुंतलाताई भाऊसाहेब धराडे | दि.१२/९/२०१४ पासून |

वरील प्रमाणे दि.२३/३/१९८६ ते आजतागायत (दि.७/८/२०१५)अखेर एकूण २३ सन्माननिय नगरसदस्य यांनी महापौर पद भूषविलेले आहे. तरी महापौर चषक क्रीडा स्पर्धेस एका खेळाला एका महापौरांचे नाव देणेस, तसेच जस जशा महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील,तस तशा स्पर्धेस प्रस्तावात नमुद प्रमाणे मा.माजी महापौर यांचे नाव अ.क्र.नुसार देणेस, मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभेमार्फत, मा.स्थायी समिती सभेची व मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महापौर चषक क्रीडा स्पर्धेस एका खेळाला एका महापौरांचे नाव देणेस, तसेच जस जशा महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील, तस तशा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव अ.क्र.नुसार देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - २५/१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.संध्या गायकवाड व मा.सविता साळूंके यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१३८८१ दि. १/१२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भूखंड, घरदुरुस्ती, घर विस्तार अग्रीम दिले जात आहे. सध्यस्थितीत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबाअ-१०.११/प्र.क्र.५६/२०११/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि.२७ फेब्रूवारी २०१२ व मा.महापालिका समिती ठ.क्र.८० व ५९८ दि.१/९/२०१२, २०/११/२०१४ अन्वये, सुधारीत वेतनबँड मधील वेतन (मुळ वेतन + ग्रेडवेतन) विचारात घेवून अग्रीम रक्कमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा केली आहे. घरबांधणी व इतर अग्रीमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता दिलेली असल्याने १) प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.१/१/२०१३, २) प्रशा/११/कावि/१३८/२०१३, दि.२९/०१/२०१३ (प्रशा/११/कावि /६५/२०१५), दि.०३/०२/२०१५ चे परिपत्रक निर्गत केले आहे त्यानुसार घरबांधणी अग्रीम मंजूरीचे धोरण राबवले जात आहे.

मुळ अट क्र. ३- महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मंजुर केल्यानंतर नोंदणीकृत गहाणखत (साधे गहाण खत प्रकार) करुन दयावे लागेल.

सुधारीत अट- पिंपरी चिंचवड महानगरपालिकामार्फत कर्मचाऱ्यांना घर कर्ज रक्कम देताना नोंदणीकृत गहाण खत साधे गहाण खत प्रकाराने करुन घेते त्याऐवजी नोंदणीकृत इक्विटेबल मॉर्गेज (मार्गेज बॉय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) पध्दतीने करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सुधारीत अट- पिंपरी चिंचवड महानगरपालिकामार्फत कर्मचा-यांना घर कर्ज रक्कम देताना नोंदणीकृत गहाण खत साधे गहाण खत प्रकाराने करुन घेते त्याऐवजी नोंदणीकृत इक्विटेबल मॉर्गेज (मार्गेज बॉय

डिपॉझिट ऑफ टायटल डीड) पध्दतीने करुन घेण्यास किंवा नोंदणीकृत गहाणखत (साधे गहाण खत प्रकार) रद्द करुन त्याऐवजी रक्कम रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर गहाणखत नोटाराईज करुन घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.वनिता थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७९८ विषय क्रमांक - २

दिनांक - २५/१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.संध्या गायकवाड व मा.सविता साळूंके यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१३८८१ दि. १/१२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भूखंड, घरदुरुस्ती, घर विस्तार अग्रीम दिले जात आहे. सध्यस्थितीत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबाअ-१०.११/प्र.क्र.५६/२०११/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि.२७ फेब्रूवारी २०१२ व मा.महापालिका समिती ठ.क्र.८० व ५९८ दि.१/९/२०१२, २०/११/२०१४ अन्वये, सुधारीत वेतनबँड मधील वेतन (मुळ वेतन + ग्रेडवेतन) विचारात घेवून अग्रीम रक्कमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा केली आहे. घरबांधणी व इतर अग्रीमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता दिलेली असल्याने १) प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.१/१/२०१३, २) प्रशा/११/कावि/१३८/२०१३, दि.२९/०१/२०१३ (प्रशा/११/कावि /६५/२०१५), दि.०३/०२/२०१५ चे परिपत्रक निर्गत केले आहे त्यानुसार घरबांधणी अग्रीम मंजूरीचे धोरण राबवले जात आहे.

मुळ अट क्र. ३- महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मंजुर केल्यानंतर नोंदणीकृत गहाणखत (साधे गहाण खत प्रकार) करुन दयावे लागेल.

सुधारीत अट- पिंपरी चिंचवड महानगरपालिकामार्फत कर्मचाऱ्यांना घर कर्ज रक्कम देताना नोंदणीकृत गहाण खत साधे गहाण खत प्रकाराने करुन घेते त्याऐवजी नोंदणीकृत इक्विटेबल मॉर्गेज (मार्गेज बॉय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) पध्दतीने करुन घेण्यास किंवा नोंदणीकृत गहाणखत (साधे गहाण खत प्रकार) रद्द करुन त्याऐवजी रक्कम रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर गहाणखत नोटाराईज करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक - २५/१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.निता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -
२) मा. विधी समिती सभा ठ.क्र.२४ दि.४/१२/२०१५

प्रभाग क्र.२१ दळवीनगर येथील आरक्षण क्रमांक २७५ मध्ये शाळा इमारत बांधणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,९२,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी ब्याण्णव लाख फक्त) यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- सन २०१५-१६ चे मनपा अंदाजपत्रकात विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३, दि.०६/०४/२०१५ अन्वये रक्कम रु. ४०,००,०००/- रकमेस यापुर्वी मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत <u>वैयक्तीक शौचालय</u> बांधणेस नागरिकांना प्रत्येकी १६ हजार अनुदान मिळालेले असून वैयक्तीक शौचालयासाठी झोपडपट्टी क्षेत्रात मलनि:सारण नलिका टाकणे आवश्यक आहे. सदरचे काम तातडीचे असलेने या ठिकाणी मलनि:सारण नलिका टाकणेची कामे चालू कामातून प्राधान्याने करण्यात येत आहेत मलनि:सारण नलिका टाकल्यामुळे झोपडपट्टीमध्ये नागरीकांना वैयक्तीक शौचालय बांधलेने सोईचे होत आहे. तरी विषयांकित कामाच्या पुर्व मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रु ४०,००,०००/- मध्ये एकुण रक्कम रु. २०,००,०००/- ची वाढ करणेत येत असुन सदर कामासाठी एकुण रक्कम रु. ६०,००,०००/- (अक्षरी- साठ लाख रुपये फक्त) चे वाढीव अंदाजपत्रकीय खर्चास सुधारीत मान्यता देणेत यावी.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- एम एन जी एल गॅस पाईपलाईन टाकणेसाठी फुलेनगर नेवाळेवस्ती कृष्णानगर या भागात मोठया प्रमाणावर रस्ता खोदाई करणार आहे. एम एन जी एल ने या कामी परवानगी मिळणेसाठी मनपा कोषागारात र.रु. ५,५८,७०,२०१/- भरले आहेत व महानगरपालिकेने त्यांना रस्ता खोदाईस परवानगी दिली आहे. तथापि सदर खोदाई झालेवर रस्त्यांची दुरुस्ती करणेसाठी निविदा कार्यवाही करणे आवश्यक आहे सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत ३ कामांना मा.महापालिका सभेने सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यास या कामाच्या निविदा प्रसिध्द करता येतील तरी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमांना मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये प्रशासकीय मान्यता असलेली मुळ रक्कम रु. | सुधारीत अंदाजपत्रकीय प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | प्रभाग क्र. ४ महात्मा फुलेनगर ते नेवाळे वस्ती रस्त्यांचे हॉटमिक्सपध्दतीने डांबरीकरण करणे (प्रभाग क्र. ४ पुर्णानगर महात्मा फुलेनगर व कृष्णानगर मधील रस्ता खोदलेल्या विविध वाहिण्याच्या चरांची हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणकरणे) (अ.क्र.३३/९१) | १,००,००,०००/- | ४,०८,००,०००/- |
| | क्र.४ मधील रस्त्यांची दुरुस्ती खडीमुरुमाने करुन ग्राऊटींग करणे (प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील रस्त्यांचे एम.एन.जी.एल. ने खोदलेले चर डब्लू.एम.एम. व बी.बी.एम. पध्दतीने भरणे) (अ.क्र.२७९/६४) | २४,००,०००/- | ५१,००,०००/- |
| | प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील अंतर्गत रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक बसविणे (प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील अंतर्गत रस्त्यांना एम एन जी एल यांनी खोदलेले फुटपाथमधील ट्रेचेसला पेव्हींग ब्लॉकबसविणे) (अ.क्र.२९४/८७) | २४,००,०००/- | १,६२,००,०००/- |

**मा.शितल शिंदे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी, पत्रकार. आताचा जो विषय आहे त्याला उपसूचना वाचली आहे. खरंतर वारंवार सभागृहामध्ये हा विषय येता कामा नये. याच कारण असं आहे की एमएनजीएल किंवा आणखीन कोणत्याही संस्थेनी आपल्याकडे लाईन टाकण्यासाठी जर पैसे भरले असतीलतर त्या वॉर्डातील रक्कम त्या वॉर्डातच वापरली जावी असा विषय मागच्या मिटींगला सुध्दा झालेला होता. जिथ जिथ खोदाई करायची त्यासाठी ते डिपॉझीट आपल्याकडे भरतात. एमएनजीएल किंवा इतर कोणत्याही गोष्टीसाठी खोदकाम होते त्या त्या गोष्टीसाठी त्या त्या संस्था पैसे भरत असतात. तरी तो सारखा सारखा

विषय येता कामा नये. आम्हांला सुध्दा ते लोक उपसूचना दया म्हणतात कारण आम्हांला पण देणे ते योग्य वाटत नाही. एकदाच तुम्ही निर्णय घ्या की ज्या वॉर्डातील पैसे अशा काही खोद कामासाठी वापरले जातील ते पैसे त्याच वॉर्डात वापरले गेले पाहिजेत. परत परत हे विषय येता कामा नये याची नोंद घ्यावी. कारण की त्या नगरसेवकांना सुध्दा धाकधुक वाटते की आमचे पैसे दुसरीकडे वापरले जातात की काय. उदा. कृष्णानगरचा प्रभाग, नेवाळेवस्ती आहे त्याच्यातले ते घरकुल आहे फार मोठया प्रमाणावर वॉर्ड येतो. त्या लोकांना असे वाटते की आमचे पाच कोटी रुपये जर एमएनजीएलनी भरलेतर ते पैसे दुसरे कोणी वापरणार की काय. आता अजय सायकरांनी सुध्दा मला विनंती केली की ताई आमचे पैसे आमच्याच वॉर्डाला दयावे, मी म्हणाले त्यात आपल धोरण ठरलेल आहे. ज्या वॉर्डातील पैसे आहेत ते त्याच वॉर्डात वापरले जातील. तरी परत एकदा विनंती आहे की त्या त्या वॉर्डातील पैसे त्याच वॉर्डात वापरले जावेत.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. आता एमएन जीएलचा विषय निघाला म्हणून मी तुम्हांला बोलायची परवानगी मागीतली. माझ्या वॉर्डात शंभर टक्के एमएनजीएलच्या लाईन टाकण्यासाठी आपण ना-हरकत दिलेला आहे असं मला कळलं. परंतु माझ्याकडे आताच फुटपाथ केलेले आहेत. त्या खर्चाचा हिशोब कसा लागणार आहे म्हणजे आपल्याला हा सगळा हिशोब कसा परवडणार आहे. परवाच्या वर्तमानपत्रामध्ये मी वाचले आहे की कोथरुड या भागामध्ये काही नागरीकांनी ग्राहक संरक्षण कक्षाकडे एमएनजीएल ची तक्रार केलेली आहे. लोकांकडून ते लोक सहा सहा हजार रुपये घेतात. डिपॉझीट आहे म्हणजे ती रक्कम बीलासारखीच आहे. ती रक्कम देवून बरेच दिवस झाले तरी सुध्दा त्यांना ते कनेक्शन मिळालेल नाही अशा स्वरुपाची तक्रार होती. ग्राहक संरक्षण कक्षाने एमएनजीएलचे जे मेन आहेत त्यांना त्याची दखल घ्यायला सांगीतलेले आहे. सर्व सन्मा. नगरसेवकांच्या निदर्शनास हे आणुन देवू इच्छिते की, २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूका येऊ घातलेल्या आहेत आणि अशाप्रकारे पैसे घेवून लाईन जर दिल्या गेल्या नाहीतर हे उदयोग वाढण्याचेच विषय होतील. मला वाटते ज्याचे पैसे त्यालाच हे तोंडी कबुल केलेले आहे त्या प्रकारचे हेड आपण बजेटमध्ये ओपन केलेले आहे परंतु हा जो विषय एमएनजीएलचा त्याच्यावर नियंत्रण कोणाचे आहे, सुपरव्हीजन कोणाचे आहे आणि ते जर काम करणार असतीलतर प्यारलल टेंडर असायला पाहिजे. त्यांनी पुढे खड्डे केले की आपण ते लगेच बुजवले पाहिजेत. सहा महिन्यानी टेंडर निघणार आणि ते खड्डे प्रत्येकाच्या घरासमोर, आमच्या बंगल्यासमोरील गेट समोर खड्डे खंदलेतर गाडया आत मध्ये जाणार नाहीत आणि लोकांची कसरत होईल व याच्यावरती जाबादार पुर्णपणे नगरसेवक राहतील. त्यामुळे खड्डे खंदल्यानंतर ते लगेच बुजविले पाहिजेत, डांबरीकरण लगेच झाले पाहिजे. त्यामुळे तशी निवेदेची तरतूद आदि काढली पाहिजे आणि मगच हे काम केले पाहिजेत अशी माझी विनंती आहे.

**मा.योगेश बहल -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह व पत्रकार मित्र. मा.आयुक्त साहेब, मागे अनेकानी लेखी तक्रार केलेली होती. मग ते रिलायन्सवाले असतील, एमएनजीएल वाले असतील. हे खोदाईचे जे काम होतात वास्तविक पाहता त्यामध्ये नगरसेवकांना विचारले जातच नाही. आताच सांगीतल की रोड झालेले असतील, डांबरीकरण झालेले असलेतरी लगेच खोदतात. त्याच्यापेक्षा वाईट परिस्थिती अशी आहे की काही लोकांचे लागेबांधे ठरलेले की ते महापालिकेकडून परवानगी घेवून दयायचा त्यांनी धंदाच उघडलेला आहे. वास्तविक पाहता एखादया वॉर्डामध्ये १४ कि.मी. खोदाई सांगीतलीतर प्रत्यक्षात खोदाई २५ किमी. करतात आणि या पैशात गाळाबाजी होते. आपल्याकडे काय नियंत्रण आहे आपल्या भागातील ज्यु.ईंजिनीअर असेल त्यांच नियंत्रण आहे का डेप्युटी ईंजिनीअरच नियंत्रण आहे का ती परवानगी तुमच्या पर्यंत येते. त्या पध्दतीने पैसे भरले जातात की नाही असं होत नाही. तुम्हांला प्रूफ करुन देवू शकतो की त्यांनी कमी पैसे भरलेले आहेत आणि प्रचंड मोठे काम केलेले आहे. महापालिकेचे खुप मोठ नुकसान यामध्ये होते त्यामध्ये आपण व्यक्तीशः लक्ष घालाव आणि त्या त्या संबंधीत विभागाला त्याबाबतच्या कडक सुचना कराव्यात आणि याची चौकशी करुन तसे काही घडलेतर त्यांना सस्पेन्ड करा.

**मा.सिमा सावळे -** सन्मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, आता रस्ता खोदाईचा विषय आलेला आहे याच्यावर चर्चा चालू आहे. खरंतर आयुक्त साहेब, विषय असा आहे की आपण ज्यावेळेला एखादा रस्ता किंवा फुटपाथ करण्यास घेतो त्यावेळेला महापालिकेला रॉक लागतो परंतु एखादया कंपनीला रिलायन्स असु देत, एअरटेल असु देत, एमएनजीएल असु देत यांना मात्र रॉक लागत नाही यांना भुसभूसीत जमिन लागते आणि त्याचे दर कमी आहेत. खोदाईचे दर कमी असल्यामुळे आपण कमी दराने ते पैसे भरुन घेतो. मला माहिती असतीतर मी पुरावे घेवून आली असते. मा.महापौर साहेब, स्वतः महानगरपालिकेचे अधिकारी, काही पदाधिकारी या महानगरपालिकेच्या आर्थीक हिता विरोधात काम करतात. आणि तोजर विषय आमच्यासारख्याना कळू शकतो तर तुम्हांला कळलाच पाहिजे. दुसर असं की, नवीन टेक्नॉलॉजी आलेली आहे. बीआरटीचे सगळे रस्ते नवीन बांधले. टेक्नॉलॉजी अशी आलेली आहे की एका ठिकाणी मशीन लावायची ती दोन, तीन कि.मी.पुढे त्याची केबल निघते, जिथं हवी असेल तिथे. परंतु तसं न करता आपण काय करतो संपुर्ण रस्ता खोदाईला परवनगी देतो, फुटपाथ खोदाईला परवानगी देतो आणि तुम्ही पैसे भरुन घेता. परंतु रस्त्याला आलेला खर्च आणि भरलेले पैसे याचा ताळमेळ जमत नाही. या प्रत्येक कंपन्यांच जे रस्ता खोदाईचे बजेट आहे, कुठल्या कंपनीच शंभर कोटी, कोणाच दोनशे कोटी असं खोदाईच त्यांच्या कामाचे बजेट आहे ते आपल्याकडे किती भरले जातात याचा कुठेतरी ताळमेळ लावणार की नाही लावणार. ज्यावेळेला महाराष्ट्र शासनाकडे संबंधीत कंपन्या अर्ज करतात त्यांना सांगतात की पिंपरी चिंचवड मध्ये पीसीएमसी हद्दीमध्ये काळेवाडी फाटयापासून

ते जगताप डेअरी पर्यंत इतक्या कि.मी.चा रस्ता आहे त्या ठिकाणी मला खोदकामाला परवानगी पाहिजे असा राज्यसरकारकडे ज्यावेळेला अर्ज करतात आणि त्यावेळेस राज्यशासनाकडून त्यांच्याकडे बजेट विचारले जाते की या शहरामध्ये तुम्हांला किती कि.मी. रस्ता खोदायचा आहे आणि बजेटची तजवीज काय आहे. त्यावेळेला ते सांगतात की या शहरामध्ये रस्ता खोदाईसाठी १०० कोटीचे आमचे बजेट आहे पण आपल्याकडे तर २० ते २५ कोटीच भरले जातात. एकतर योगेशजी बहल साहेबांच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. याच्यामध्ये गाळा केला जातो. कारण की आपला जे.ई.त्याठिकाणी उभा नसतो. आपण एकदा कॉन्ट्रॅक्ट दिल की परत आपण काही फिरून बघत नाहीत. त्याठिकाणी तुला वाटेल तेवढा रस्ता खोद. आपल्याकडे पाच कि.मी. परवानगी असेलतर ५०-५० कि.मी. शहरामध्ये लाईन फिरलेली आहे. विक्रम केबलवाल्याचा २०१० ला एक विषय पास केला होता. संपुर्ण शहरामध्ये त्यांची केबल आहे आणि कोटयावधी रुपयाचा महसूल त्यांनी बुडविलेला आहे. त्यांनी कुठे केबल टाकली त्याची आपल्याला माहिती नसावी. आज वेगवेगळया कंपनीच आमच्याकडे फोर-जी आल आहे ते लॉन्च आता झालय. केबलला परवानगी तुम्ही देता याचा अर्थ काय आहे, याचा अर्थ हाच आहे की त्यांनी त्याठिकाणी केबल दुसरी कोणाचीतरी भाडयाने घेवून त्याचे काम चालू आहे. तुमचा महसुल बुडविला जातो ते कोटयावधी रुपये मिळणार होते ते बुडविले जातात मग त्याच्याकडे आपले लक्षच नाही. कारण उत्पन्नाचे एखादे साधन शोधायचे म्हणलेतर त्याच्याकडे आपलं लक्षच नाही. आपण रस्ते खोदाईला परवानगी देतो, आमचं असं म्हणणे आहे, एकतर तुम्ही ठरवा की कुठल्या वेळेला तुम्ही त्यांना परवानगी देणार आहेत आज ईथं खोदल, उदया तिथं खोदल, सगळीकडे संपुर्ण वॉर्ड उखड्न ठेवलेले आहेत. बालाजीनगरला फुटपाथ खोदलेले आहेत. क्वॉलीटी सर्कल पासून ते टेल्को रोडपर्यंत दिड वर्षे झाले पेव्हींग ब्लॉक काढून ठेवलेले आहेत आणि त्याठिकाणी केबलच काम चाललेल आहे पण ते परत लावलेले नाहीत. परत म्हणतात महापालिकेची जबाबदारी आहे. मग संबंधित जे.ई. असतात, डेप्युटी असतात, एक्झिक्युटीव्ह असतात ते काय करतात. एमआयडीसीमध्ये दिवसाढवळया रस्ता खोदला जातो. मागच्या वर्षी मी एमआयडीसीतल रिलायन्सच खोदकाम करताना आडवल, त्यांना मी सांगीतल आम्हांला तुम्ही पावती दाखवा आणि तुम्ही रस्ता खोदा. दुर्दैव आहे आणि मला सांगायला पण लाज वाटते ज्या दिवशी मी आडवल त्याच्या तीन दिवसामध्ये आपण पैसे भरुन घेतले आणि परत त्यांच काम चालु झालं. तोपर्यंत पाच ते सहा कि.मी. रस्ता खोदुन ऑलरेडी त्यांची केबल टाकलेली होती. आता काय करायच हातात काठी घेवून फिरत रहायच, कुठ खोदाई चालली की पहिली पावती दाखव आणि मग खोद हे आमच काम नाही तरी पण आम्ही आमच काम करतो. नगरसेवक आडवा आला की कोणीतरी भाई येतो, कोणीतरी दमबाजी करतो. आमक्या भाईच काम आहे, तमक्या भाईच काम आहे, हे बघायच कोणी, तुम्ही बघीतल पाहिजेनां. रस्त्याला तुम्ही किलो मीटरला कोटयावधी रुपये खर्च

करतातनां तर त्याच किलो मीटरप्रमाणे पैसे घेतले पाहिजेत. आपल्या कॉन्ट्रॅक्टरला फुटपाथ करताना जर रॉक लागत असेलतर व त्यांना रॉक लागत नसेलतर म्हणजे काहीतरी गफलत आहे. हे जर काढलनां तर कोटयावधी रुपये या कंपनीने आपले बुडवलेले आहेत. मग ते एमएनजीएल असु दे, रिलायन्स असु दे, एअरटेल असु दे, नाहीतर एमएसईबीचे काम असु देत. एमएसईबीने जाहीर निवीदा नोटीस काढली होती. बीव्हिजीला रेट कमी करायचा काय संबंध आहे. ज्यावेळेस जाहीर निवीदा काढली, बीव्हिजीला परवडत नसेलतर त्यांनी कशाला भरायचे कोटेशन. आपल्याकडे पैसे कमी करुन मागायचा त्यांचा काय संबंध येतो. टेंडर कॉल केले, टेंडर कॉल करुन आमची २०० कोटीची निवीदा आहे. या संपुर्ण शहरात त्यांना अंडरग्राऊंड केबल करायची होती. तिथे २३०० रुपये लावले, योग्य नाही असं. मा.महापौर साहेब, बोलाव तेवढं कमी आहे. ही कोळशाची खान आहे, जेवढ खोदालनां तेवढ तिथं काळं निघणार आहे. पण एक निश्चितपणे आहे आपले अधिकारी, काही बोटावर मोजण्या इतके पदाधिकारी यामध्ये सामील आहेत हे सत्य नाकारता येणार नाही आणि जे जे लोक महापालिकेच्या अर्थीक हिता विरुध्द वागतात त्यांच्यावर आयुक्त म्हणून आपण कारवाई करावी. खोदाईसाठी परवानगी देताना सगळया कंपन्याना सांगा एकदाच त्यांच प्रपोजल घ्या आणि उन्हाळयामध्ये त्यांना खोदाईस परवानगी दया. तुम्ही पावसाळयात देता, उन्हाळयात देता, हिवाळयात देता बाराही महिने रस्ते खोदलेले असतात आणि फुटपाथ सुध्दा खोदलेले असतात, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एमएनजीएल ज्यावेळेला गॅसची लाईन टाकते त्यावेळेला ते सोसायटीच्या बिल्डींगमधुन सुध्दा लाईन फिरवते. जसं सुलभाताईन सांगीतल पहिल्यांदा ते तीन हजार रुपये भरुन घेत होते त्याच्यानंतर डायरेक्ट त्यात शंभरपट वाढ केली आणि सहा हजार रुपये केले व काही ठिकाणी दहा हजार रुपये केले. त्यांनी कोणालाही नागरीकांना कम्पलसरी करु नये. काही लोकांनी जर कनेक्शन घेतलतर एमएसईबीसारखं कनेक्शनचे मिनीमम पैसे भरायचे. त्यामुळे त्यांनी कोणावरही बळजबरी करायची नाही. तुम्ही हे कनेक्शन घेतलच पाहिजे असं सोसायटयामध्ये जावुन लोकांना बोलतात. आणखीन एक गोष्ट अशी आहे की जर उदया त्यांच्या सोसायटीत गॅस लाईन फिरवलेली आहे ती चांगल्या क्वॉलीटीची आहे का ते बघा त्याच्यातून जर उदया दुर्घटना घडायची वेळ आलीतर त्यासाठी फायरची त्यांनी काय सिस्टीम केलेली आहे. त्यांच्याकडे भरपुर पैसे आहेत. बिल्डींगमध्ये लाईन फिरवायची सोसायटीने काय म्हणुन त्यांना परवानगी दयायची. सोसायटयामध्ये काही दुर्घटना घडलीतर पर सोसायटी त्यांच्यावर बंधन टाकावे जर तुम्ही सोसायटीमध्ये लाईन फिरवणार असालतर कोणालाही बंधन करायचे नाही. ते रेट वाढवतात त्या रेटवर सुध्दा आपण बंधन टाकले पाहिजे. अन्यत: आपण कुठे जातो आणि कुठे काय काम करतो याचा आपल्याला पत्ता लागणार नाही. उदया एमएनजीएलच्या ऐवजी अजुन दुसरी सुध्दा कंपनी येवू शकते कमी रेटने गॅस देणारी, मग अख्ख्या सोसायटीत गॅसच्या लाईनी

फिरवणार का आपण. ज्या ज्या ठिकणी एमएनजीएलने लाईन फिरवली आहे त्या त्या ठिकाणी फायरसाठीच्या उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत. याची कडक चौकशी झाली पहिजे. मागे मी सुध्दा आपल्याला सांगीतले होते की खोदाईचे परमीशन एकाचे घेतात आणि कितीतरी ठिकाणी खोदतात. किती पैसे भरले, किती कि.मी. खोदले हे जे.ई ना, कार्यकारी अभियंत्यांना कडक आदेश दया की याच डिटेल्स मिळाल पाहिजे आणि त्यांनी पैसे किती भरले, किती खोदले याचा सर्व खुलासा झाला पाहिजे.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच मंगलाताईनी सूचना मांडलेली आहे त्या उत्तम होत्या. आपण असे परमीशन देत आहोत. या लाईन टाकल्यानंतर कित्येकवेळा आपल्या महापालिकेच्या पाण्याच्या लाईन टाकलेल्या आहेत. त्याचे ड्रॉईंग नाही. गॅसलाईन ड्रॉईंग सुध्दा कुठल्याही प्रकारचे नाही. उदया रस्त्याची खोदाई करताना त्या पाईपलाईनला धक्का लागलातर निश्चितपणे अपघात होण्याची शक्यता आहे. आपण असे परमीशन देतो आपले फायरस्टेशन आहे त्यांच्याकडून परवानगी घ्यावी. त्यांनी त्यांचा प्लॅन सादर करावा. आपल्या महानगरपालिकेच उत्पन्न कमी कमी होत चाललेल आहे ते या माध्यमातून उत्पन्नाचे साधन मिळेल. सोसायटीमध्ये लाईन फिरवतात त्याची सुध्दा परमीशन घेण्यात यावी. अशा परवानग्याच्या अटि जर टाकल्यातर निश्चितपणे त्याच ड्रॉईंग सुध्दा आपल्याकडे येतील. हे पैसे भरतात याच काही मोजमाप होत नाही. निश्चितपणे या संस्था येतात त्यांनी अशाप्रकारची फायर परवानगी घ्यावी आणि त्यांनी ड्रॉईंग सादर करावे अशी मी सूचना करतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी जो विषय निघाला मागील कित्येक वर्षे मी या सभागृहात त्यावर चर्चा केलेली होती. हे जे शहर आहे ते खड्डयाचे शहर झालेल आहे. बीएसएनएल, रिलायन्स, एमजीएनएल यांचे शहर झालेले आहे. यांचे शहरामध्ये एवढे लागेबांधे झालेले आहेत रात्रीचा आम्हांला फोन येतो की ते माझ काम आहे, ते काम करु दे. मी हॉटेल मधुन रात्री बारा, एक वाजता हॉटेल पास केलेतर रस्त्याचे काम चालू असत लगेच दोन मिनीटात मला फोन आला, हे शहरामध्ये काम करणारे माझे पोर आहेत त्यांना काम करु दे अशा पध्दतीचे शहरामध्ये दादागीरी किंवा दमदाटी करतात. दुसऱ्या दिवशी एक्झिक्युटीव्हला या गोष्टीची कल्पना दिली, आपण कुठे तरी सेंट्रलाईज केले पाहिजे. छोटेसे काम एक्झिक्युटीव्ह इंजिनीअरला सांगीतलेतर त्याठिकाणी काम करण्यासाठी टेंडर या गोष्टी सांगत असतात. मागच्या बजेटचे टेंडरच काम अजून पर्यंत चाललेल आहे. दुसर बजेट यायला झालेल आहे अजूनही मागच्या बजेटच टेंडर वर्क ऑर्डर हातात काही नाही. याचे सगळया शहरात मोठे जाळे पसरलेले आहे याच काम कोण करणार. कस्तुरी मार्केट मध्ये अजुन काम झालेले नाही अजूनही त्याठिकाणी खड्डे तसेच आहेत आता योगेश बहल, सुलभाताई यांनी सांगीतले, खरोखरच या लाईनचे पैसे ज्या त्या वॉर्डातच

वापरले पाहिजे. बजेट कुठे जाते, आता एलबीटी बंद झाल्यामुळे परिस्थिती वाईट आहे आपल्याकडे पैसे नाहीत परंतु आपण या गोष्टीकडे लक्षच देत नाहीत. आपल्या महापालिकेमध्ये काही एजंटस आहेत ते हे मंजुर करायचे काम करतात बीएसएनएलचे वेगळा माणुस काम करतो, एअरटेलचा वेगळा, एमएनजीएलचा वेगळा माणुस काम करतो. शहरात त्यांचे हे कामच आहे हे मंजुर करुन ठेवणे त्याच्यानंतर काही प्रॉब्लेम झालातर आपला माणूस तातडीने पोहचविणे असे चाललेले आहे. आता योगेश बहल यांनी सांगीतले १०० रुपयाचे काम असेलतर २५ रुपयाचे काम मंजूर करुन घेतात. याकड कोणाच लक्षच नाही. मी तुम्हांला दाखवू शकतो की ज्याच्याकडे टेंडर असलेला डायरेक्ट पैसे भरलेले त्याच्यानंतर त्याची चौकशी केली त्याला कळालं की अमुक अमुक त्याठिकाणी चौकशी करतो की लगेच त्यान त्या माणसाला पैसे देवून तोंड गप्प केलं. म्हणजे याचा अर्थ कुठेतरी आपल्या लोकांचे सुध्दा लागेबांधे आहेत. एक-एक कोटी पैसे भरुन घ्यायचे असतात त्यापैकी २५ लाख फक्त भरुन घेतात व बाकीचे मॅनेज करतात. टॉवर सारख्या गोष्टीची तक्रार केलीतर ते काढत नाहीत. कुठेतरी कधीतरी असे अपघात झाल्यानंतर हे काढणार. तुमच्याकडे बिल्डींग परमीशनसाठी परवाना मागयला येतात तसा टॉवरसाठी कोणीच परवानगी मागायला येते का. कोणीच येत नाही. अशा या छोटया छोटया गोष्टीकडे आपण लक्ष दिलतर आपलही इन्कम वाढणार आहे. कितीतरी कमर्शिअल ईलीगल बिल्डींगवर टॉवर उभे आहेत. त्याचे जे साऊंड आहेत हे आपल्याला घातक आहेत. एवढा मोठा टॉवर उभा केल्यास त्याचे वेट आर्किटेक्टने त्याच्यामध्ये मोजलेले नसते. एवढा मोठा लांबलचक पन्नस शंभर फुटाचा टॉवर उभा करतो. इंजिनीअरनी सांगाव त्या हिशोबाने आर्किटेक्ट सँक्शन करतात का आणि त्याची ऑफिशिअल परवानगी कोणी घेत सुध्दा नाही. सगळया शहरामध्ये एजंट लोकांचा कारभार आहे. महापालिका तुम्ही चालवत नाहीत, हे शहर एजंट चालवतात मंजूर करायला माणस वेगळे, टॉवर उभे करायला माणस वेगळे, खड्डे करायला माणस वेगळी असे चालले आहे. एमएनजीएल फक्त पाईपलाईन टाकते. पाईपलाईन त्यांच्या नॉर्म्स प्रमाणे लागते. त्या गोरगरीबांना पुर्ण पाईपलाईन बदलावी लागणार आहे. त्यांचा फायदा आहे, तोटा आहे तो नंतरचा भाग आहे. कमर्शिअल पाईपलाईन जो वापरतो त्यांना चालत नाही. त्यांची पाईपलाईन वेगळया पध्दतीच्या असतात. थरमॅक्स चौकात रात्री साडेबारा एक वाजता रोड क्रॉसींग करतात, रातोरात खड्डे केलेले आहेत, तुम्हांला सुध्दा पत्ताही नाही. माझी विनंती आहे की आपली आर्थीक परिस्थिती बघता इन्कम सोर्स म्हणून याकडे बघीतले पाहिजे. दुस-याच्या घशात जाणारे पैसे महापालिकेला मिळत नाहीत. खंडोबामाळ रस्ता अजून तसाच आहे. सहा महिन्यापुर्वी खड्डा खांदलेला आहे, धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार. खरंतर आजचा हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. कारण आज फक्त आम्ही सदस्य म्हणून १३३ जण बोलणार त्याच्यापेक्षा आमच्या प्रभागात खोदाई सुरु झालीतर आमचे नागरीक लोक विचारतात

ताई नेमक काय चाललेल आहे अस विचारतात. आमच्या येथे कंपनीचे केबल टाकण्याचे काम चालू आहे. आज रिलायन्सवाले, अजून महिनाभर गेला की व्होडाफोनवाले असे प्रत्येक कंपन्यांचे असे जर आपण केबल टाकत राहीलोतर नेमके २०१७ समोर आले आहे. असे चाललेतर आम्ही किती वेळेला आमच्या जे.ई.ला एक्झिक्युटीव्हला इन्क्वॉयरी करायला सांगायच. आज खोदाईचे आणि पुन्हा ते प्लेन करायचे हे महिन्यानी दोन महीन्यानी आहेच. कुठेतरी आपले धोरण ठरविले पाहिजे, कोणत्या महिन्यात आपण ही परवानगी देणार हे ठरविले पाहिजे. एअरटेल वाले असतील, आयडीयावाले असतील अशा कंपनीना एक विशिष्ठ महिना दयायला पाहिजे. या या महिन्यात तुम्ही अर्ज करा तुमच्या खोदाईवर आमचा निर्णय होईल आणि वर्षातून दोनदा किंवा एकदा जे काही सभागृहाला मान्य असेल अस एखाद उचीत यासाठीचे धोरण ठरविणे आवश्यक आहे. ज्याला वाटेल, ज्याला जसं जमेल, त्याच्याकडे माणस अव्हेलेबल होतील त्या पध्दतीने खोदाईचा प्रकार आपल्या शहरामध्ये चालू आहे. हे शहर आहे का या शहरात खड्डयाचे रस्ते आहेत अशी चर्चा २०१७ ला होईल. यापुढच्या काळात धोरण ठरविणे गरजेचे आहे. मार्च नंतरची खोदाई फक्त महापालिकेच्या माध्यमातून झालेली असली पाहिजे आणि त्याची कल्पना सर्व नगरसेवकांना असणं गरजेच आहे. खोदाईचे पैसे भरुन घेतो ते पैसे प्रभागात वापरले जातात वगैरे वगैरे. परंतु हे पैसे आपल्याकडे येतात का आणि येत असतीलतर हे रात्रीची खोदाई का करतात. जर रितसर या लोकांचे पैसे भरुन घेतले असतीलतर, शहरात सर्व नगरसेवकांनी फिरा रात्री दोन, तीन पाहाटे चार नाहीतर रात्रभर हे लोक खोदाई करतात. त्यांच्यावर कोणत्याच प्रकारचा आपला अंकुश का राहत नाही. सगळयात महत्वाचा मुद्दा पुढच्या काळात एलबीटी बंद झालेली आहे, यापुढच्या काळामध्ये उत्पन्नाचे साधन म्हणून या सर्व गोष्टीकडे बघायला हरकत नाही. जर या पुढील काळामध्ये ठरावीक अंतरावर आपण डक्ट केले आणि ते डक्टजर आपण भाडयाने दिलेतर एक उत्तम प्रकारच उत्पन्नाचे साधन आपल्या शहराला उपलब्ध होईल आणि त्या निमीत्तान खड्डे कोण करतय याच्यावर आपल नियंत्रण राहील. बीव्हीजीला विषय करुन दिलेला आहे. काय कारण आहे, एमएसईबी, बीव्हीजीवाले आपल्यावर मेहरबानी करत नाहीत. जर सगळया खोदाईचा एक रेट असेलतर यांना वेगळा करण्याचा काहीच अधिकार आपल्याला नाही. येथून पुढच्या काळात खोदाई ही पुर्ण वर्षभरामध्ये एका महिन्यातच करावी, या सगळया गोष्टीचे आपण बारकाईने वर्कआऊट करावे अशी विनंती करते आणि थांबते.

**मा.कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच याठिकाणी गॅस लाईन खोदण्याच्या अनुषंगाने हा विषय आलेला आहे. मागील महिन्यात मी पत्र दिलेले होते की आमच्या प्रभागात गॅस लाईन टाकणा-यांनी खोदकाम केलेले होते. आपल्याकडे काही लिमीट असेलना की कुठल्या रस्त्याला, किती मीटर रस्त्याला परमीशन दयायचे असे असेलना. आमच्याकडे फक्त चार मीटरचा रस्ता आहे. त्या चार मीटर

रस्त्यामध्ये बघीतलतर सर्वप्रथम आपली ड्रेनेजलाईन टाकलेली आहे, पाण्याची लाईन टाकलेली आहे, एमएसईबीची एसटी लाईन टाकलेली आहे, एलटी लाईन टाकलेली आहे त्याठिकाणी सर्व्हिस वायर वरुन एमएसईबीने कनेक्शन दिलेले आहे आणि त्या चार मीटरच्या रस्त्यावरती त्याठिकाणी गॅस लाईन सुध्दा टाकलेली आहे. मी पत्र दिलेले होते ते पत्र कुठे केराच्या टोपलीत टाकून दिल की काय, त्याच उत्तर दिलेल नाही, त्याची काहीही चौकशी झालेली नाही. त्याठिकाणी छोटया रस्त्यावर जर एवढया लाईन आहेत, त्याठिकाणी गॅसची लाईनही आपण टाकतो. गॅसची लाईन टाकल्यानंतर आपल्याकडे असं आहे की आज लाईन टाकल्यानंतर परत महिना पंधरा दिवसानी प्रॉब्लेम येतो त्याठिकाणची लाईन परत खोदली जाते. मग त्या पाणीपुरवठयासाठी खोदल्या जातात किंवा ड्रेनेजच्या लाईन चोकअप झाल्यानंतर खोदल्या जातात. अशी लाईन खोदली जावुन त्याठिकाणी जर गॅस लिकेजस झालेतर त्याठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. आपण काहीतरी लिमीट ठरवावे एवढया एवढया रस्त्यालाच खोदाईचे परमीशन दिले पाहिजे. चार मी. रस्त्यावर परमीशन दिलेतर गॅस लाईन संपुर्ण शहरात फिरवित आहोत. काही काही ठिकाणी एक मीटरचे पण रस्ते आहेत त्याठिकाणी सुध्दा गॅस लाईन खोदाईसाठी आपण परमीशन देणार आहेत का, याची मला माहिती दयावी. आपण परमीशन खोदाईला देतो. आता आपण रिलायन्सला खोदाईला परमीशन दिलेले आहे. गॅसच्या लाईनला परमीशन दिलेले आहे, एमएसईबीच चालूच आहे त्याच्यावरचा वाद काही थांबलेला नाही, तीकडून आणखीन काही पैसे भरल्या गेलेले नाहीत त्याचाही वाद चाललेला आहे. आपण खोदाईला परमीशन देतो परंतु त्याची परत दुरुस्ती करण्यासाठी नियोजन करत नाहीत. सर्वात प्रथम आपण खोदाईला परमीशन दिल्यानंतर ते रिपेअर करण्यासाठी काहीतरी नियोजन अगोदर केले पाहिजे. आपण गॅसच्या लाईनला, एमएसईबीच्या लाईनला किती मीटरपर्यंत परमीशन देण्याची आपल्यालाकडे व्यवस्था आहे याची महिती देण्यात यावी, धन्यवाद.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- कामाचे नाव- चिंचवड प्र.क्र.२२ व २३ येथे नदीकाठी घाट बांधणे व सुशाभिकरण करणे. निविदा रक्कम - ४८९८८४४/- ठेकेदाराचे नाव- यशक असोसिएट्स, मुळ अंदाजपत्रकीय रक्कम - ७०,००,०००/-, विषय - चिंचवड प्रभाग क्र. २२ व २३ येथे नदीकाठी घाट बांधणे व सुशाभिकरण करणे या कामाच्या सुधारित प्रशासकीय रक्कम रु. १,००,००,०००/- यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, तीन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसुचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ७९९ विषय क्रमांक - ३

दिनांक - २५/१/२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.निता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

२) मा. विधी समिती सभा ठ.क्र.२४ दि.४/१२/२०१५

प्रभाग क्र.२१ दळवीनगर येथील आरक्षण क्रमांक २७५ मध्ये शाळा इमारत बांधणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,९२,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी ब्याण्णव लाख फक्त ) यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१५-१६ चे मनपा अंदाजपत्रकात विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३, दि०६/०४/२०१५ अन्वये रक्कम रु. ४०,००,०००/- रकमेस यापुर्वी मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत वैयक्तीक शौचालय बांधणेस नागरिकांना प्रत्येकी १६ हजार अनुदान मिळालेले असून वैयक्तीक शौचालयासाठी झोपडपट्टी क्षेत्रात मलनि:सारण नलिका टाकणे आवश्यक आहे. सदरचे काम तातडीने असलेने या ठिकाणी मलनि:सारण नलिका टाकणेची कामे चालू कामातून प्राधान्याने करण्यात येत आहेत. मलनि:सारण नलिका टाकल्यामुळे झोपडपट्टीमध्ये नागरीकांना वैयक्तीक शौचालय बांधलेने सोईचे होत आहे. तरी विषयांकित कामाच्या पुर्व मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रु ४०,००,०००/- मध्ये एकुण रक्कम रु. २०,००,०००/- ची वाढ करणेत येत असुन सदर कामासाठी एकुण रक्कम रु. ६०,००,०००/- (अक्षरी- साठ लाख रुपये फक्त) चे वाढीव अंदाजपत्रकीय खर्चास सुधारीत मान्यता देणेत येत आहे तसेच एम एन जी एल गॅस पाईपलाईन टाकणेसाठी फुलेनगर नेवाळेवस्ती कृष्णानगर या भागात मोठया प्रमाणावर रस्ते खोदाई करणार आहे. एम एन जी एल ने या कामी परवानगी मिळणेसाठी मनपा कोषागारात र.रु. ५,५८,७०,२०१/- भरले आहेत व महानगरपालिकेने त्यांना रस्ता खोदाईस परवानगी दिली आहे. तथापि सदर खोदाई झालेवर रस्त्यांची दुरुस्ती करणेसाठी निविदा कार्यवाही करणे आवश्यक आहे सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत ३ कामांना मा.महापालिका सभेने सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यास या कामाच्या निविदा प्रसिध्द करता येतील तरी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमांना मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये प्रशासकीय मान्यता असलेली मुळ रक्कम रु. | सुधारीत अंदाजपत्रकीय प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | प्रभाग क्र. ४ महात्मा फुलेनगर ते नेवाळे वस्ती रस्त्यांचे | १,००,००,०००/- | ४,०८,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | हॉटमिक्सपध्दतीने डांबरीकरण करणे (प्रभाग क्र. ४ पुर्णानगर महात्मा फुलेनगर व कृष्णानगर मधील रस्ता खोदलेल्या विविध वाहिण्याच्या चरांची हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणकरणे) (अ.क्र.३३/९१) | | |
| | क्र.४ मधील रस्त्यांची दुरुस्ती खडीमुरुमाने करुन ग्राऊटींग करणे (प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील रस्त्यांचे एम.एन.जी.एल.ने खोदलेले चर डब्लू.एम.एम. व बी.बी.एम. पध्दतीने भरणे) (अ.क्र.२७९/६४) | २४,००,०००/- | ५१,००,०००/- |
| | प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील अंतर्गत रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक बसविणे (प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील अंतर्गत रस्त्यांना एम एन जी एल यांनी खोदलेले फुटपाथमधील ट्रेचेसला पेव्हींग ब्लॉकबसविणे) (अ.क्र.२९४/८७) | २४,००,०००/- | १,६२,००,०००/- |

तसेच कामाचे नाव- चिंचवड प्र.क्र.२२ व २३ येथे नदीकाठी घाट बांधणे व सुशाभिकरण करणे. निविदा रक्कम - ४८९८८४४/- ठेकेदाराचे नाव- यशक असोसिएट्स, मुळ अंदाजपत्रकीय रक्कम - ७०,००,०००/-, विषय - चिंचवड प्रभाग क्र. २२ व २३ येथे नदीकाठी घाट बांधणे व सुशाभिकरण करणे या कामाच्या सुधारित प्रशासकीय रक्कम रु. १,००,००,०००/- यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८००                                                          विषय क्रमांक - ४

दिनांक - २५/१/२०१६                                                         विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.झोनिपु/३/कावि/३००/१५/२०१५, दि.२३/०७/२०१५
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.६ दि.७/१०/२०१५
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७६८ दि.२०/११/२०१५

महाराष्ट्र शासनाने दि. २ मे २०१४ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्वविकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ पारित केला आहे. सदर अधिनियमाव्दारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१ मध्ये दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त अधिनियमातील दुरुस्तीस अनुसरुन गृहनिर्माण विभागामार्फत क्रमांक झोपुधो - १००१/प्र.क.१२५/१४/ झोपसु-१ दि.१६ मे, २०१५ अन्वये शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. सदर दुरुस्त्या व दि. ११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१, दि. २ जानेवारी, २०१२ आणि दि.२२ जुलै, २०१४ च्या आदेशातील तरतूदींचे अधिक्रमण करुन सुधारीत कागदपत्रे /अभिलेख व कार्यपध्दती विहित करणेचा निर्णय घेणेत आला आहे.

**<u>शासन निर्णयातील ठळक बाबी खालीलप्रमाणे</u>-**

**१) झोपडी व झोपडीवासिय संरक्षणपात्र ठरविण्याबाबत.**

**(अ)** झोपडी दि.१/१/२००० अथवा त्यापूर्वीची संरक्षणप्राप्त झोपडी आहे त्यासाठी विवरणपत्रातील किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**(ब)** सध्या तिथे राहत असल्यास पत्याचा उल्लेख असलेल्या विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**(क)** झोपडी दि.१/१/२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या राहत असलेल्या विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**२) <u>शपथपत्राबाबत</u> –**

**अ)** झोपडीधारक त्याच्या/तिच्या, पत्निच्या/पतीच्या अथवा १८ वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नांवे महानगरपालिका क्षेत्रात अन्य झोपडी/घर/सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नसल्याचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०९ मार्च २०१५ अन्वये स्वत:चा फोटो लावुन “स्वयंघोषणापत्र”(Self-Declaration)साध्या कागदवर भरुन देणे आवश्यक राहील.

**ब)** झोपडीधारक जोडपत्र तिन किंवा जोडपत्र चार भरुन देताना त्यासोबत स्वयं साक्षांकन जोडलेल्या पुराव्यावर “स्वंय स्वाक्षांकनासाठीचे स्वयंघोषणापत्र”(SelfDeclaration for Self Attestation)देणे आवश्यक असेल.

**क)** नमुने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०९ मार्च २०१५ सोबतच्या प्रपत्र “अ” व “ब”प्रमाणे राहतील.

**३) अ) दि. १/१/२००० पूर्वीपासूनच्या झोपडीवासियांसाठी अर्जाबाबत**

नमुन्यात दर्शविलेल्या अर्जासोबत “जोडपत्र तीन” (जोडपत्र-पाचसह) अर्ज भरणे आवश्यक राहील.

**ब) दि. १/१/२००० नंतरच्या झोपडीवासियांसाठी अर्जाबाबत**

नमुन्यात दर्शविलेल्या अर्जासोबत “जोडपत्र चार”(जोडपत्र-पाचसह) अर्ज भरणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग यांचेकडील २ जानेवारी २०१२ नुसार अपात्र ठरला असेल तर त्यांनाही पुन्हा अर्ज करता येईल.

वरिल पुर्ततेनुसार संगणकावर संकलित केलेले माहिती व फोटोच्या आधारे पडताळणी, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अमलंबजावणीसाठी निष्कासित झालेल्या झोपडीच्या पुराव्या आधारे, स्थळ पाहणी, करुन पात्र/अपात्र बाबत निर्णय घेणे. व अभिलेखाचे जतन करणे. पुनर्वसनाचा लाभ देतात त्याच्या/तिच्या, पत्निची/पतीची फोटोसह माहिती व त्या दोघांच्या आधारकार्डाच्या क्रमांकाची नोंद करुन संलग्न करणे.

तरी उपरोक्त दि. २ मे २०१४ रोजीचा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्वविकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ व त्याअनुषंगाने दि. ११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१, दि. २ जानेवारी, २०१२ आणि दि.२२ जुलै, २०१४ च्या आदेशातील तरतूदींचे अधिक्रमण करुन सुधारीत दि. १६ मे, २०१५ चा शासन निर्णयाचे अवलोकन करणेत आले.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी, पत्रकार. हा विषय आलेला आहे शासनाने पुर्वी जी.आर. लागू केलेले होते याची स्पष्टता समजावून सांगावी.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक ४ जो आहे त्याच्यामध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन आणि पुर्नविकास सुधारणा अधिनियम २०१४ अन्वये, शासनाने झोपडपट्टीवासियासाठी त्यांच्या पात्रतेसाठी पुर्वी जे निकष होते त्याच्यामध्ये काही सुधारणा केलेल्या आहेत पुर्वीच्या निकषाप्रमाणे १/१/२००० पर्यंतची झोपडी संरक्षणासाठी पात्र होती. त्याच्यामध्ये झोपडीवासियांने त्याच्या पात्रतेसाठी किमान दोन पुरावे देणे आवश्यक होते. यापुर्वीचा शासनाचा जो जीआर आहे २२ जुलै २०१४ चा त्यामध्ये विवरणपत्र अ आणि विवरणपत्र ब याच्यामध्ये काही पुराव्याची यादी दिलेली आहे. विवरणपत्र अ मध्ये काही पुरावे आहेत व विवरणपत्र ब मध्ये काही पुरावे आहेत २२ जुलै

२०१४ चा जो जी.आर.आहे त्याच्यानुसार विवरणपत्र अ मधील किमान एक पुरावा झोपडपटीधारकाने सादर करणं आवश्यक होतं आणि विवरणपत्र अ व विवरणपत्र ब मध्ये दोन्हीपैकी आणखीन किमान एक पुरावा असे दोन पुरावे आवश्यक होते. २२ जुलै २०१४ चा जो जी.आर. आहे त्याच्यामध्ये विवरणपत्र अ मध्ये सहा प्रकारचे पुरावे आहेत त्याच्यामध्ये- १) मतदारयादी २) वीज जोडणी दिल्याचे कागदपत्रे ३) शासननिर्णय २००१ प्रमाणे जो सर्व्हे झालेला आहे त्या सर्व्हेचा गणना फॉर्म किंवा गणना यादीतील नाव ४) नगरपालिकेनी, महापालिकेनी दिलेली मालमत्ता करआकारणी, ५) महसुल विभागाकडून अकृषीक परवानगी अथवा अकृषीक वापर नियमीत करण्याची परवानगी व त्यावेळी भरलेला अकृषीक कर, अकृषीक दंडाच्या रक्कमेची पावती ६) सहाय्यक निबंधक सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्याकडे नोंदणीकृत असलेचा एक पुरावा. हे विवरणपत्र अ मधील एक पुरावा सादर केल्यानंतर आता विवरणपत्र ब मधील काही पुरावे दिलेले आहेत त्यांची यादी मी सांगतो- १) झोपडीधारकांची पत्नी/पती, आपत्याचे जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्र २) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिलेले डोमेसाईल सर्टिफीकेट ३) मुंबई महानगर दुरसंचार निगम कंपनीकडुन दुरध्वनी जोडणी दिल्याची कागदपत्रे किंवा इतर अभिलेख ४) झोपडीवासीयांचे नाव, वय इत्यादी बदलण्याबाबतचे शासन राजपत्र, गॅझेट ५) झोपडीला महापालिका किंवा नगरपालीकेकडून जल ज्वडणी दिल्याचे पुरावे ६) झोपडीवासीयाने स्वत:च्या नावे प्राप्त केलेले पारपत्र ७) केंद्र व राज्यशासनाच्या योजनेअंतर्गत आर्थीक सहाय्य मिळवण्याबाबतची कागदपत्रे ८) झोपडीवासीयास न्यायालयाकडून प्राप्त झालेले समन्स. ९) आयकर विभाग किंवा महापालिका / नगरपालीका अथवा शासकीय निमशासकीय कार्यालयात कराचा भरणा केल्याचा पुरावा. १०) राष्ट्रीयकृत, खाजगी अथवा सहकारी बँकेत झोपडीवासीयांचे अथवा त्याचे पती/पत्नी किंवा अपत्याचे उघडलेल्या खात्याचे पासबुक ११) महापालिका/नगरपालीका शासकीय व अनुदानीत शाळा किंवा महाविदयालय सोडल्याचा दाखला १२) त्या विशिष्ठ झोपडीत अधिकृत गॅसकंपनीकडून गॅसपुरवठा करण्यात येत असल्याचा पुरावा. १३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेला वाहन चालवणेचा परवाना. १४) केंद्रशासनाकडून देण्यात आलेले आधार कार्ड १५) व्यावसायीक अथवा औदयोगिक स्वरुपात वापरात असलेल्या अथवा त्याचा निवासी वापरात असलेल्या झोपडीच्या बाबतीत त्या झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित ठिकाण दर्शवणारा महापालिका दि.१/१/२००० अथवा त्यापुर्वी प्राप्त झालेला गुमास्ता परवाना किंवा खानावळ/उपहारगृह किंवा त्याअनुषंगाने भरण्यात आलेली कराची पावती विक्रीकर, व्यावसायकर भरल्याची पावती, आयकर, सेवा कर अथवा इतर कर भरल्याचा पुरावा. असे विवरणपत्र अ आणि ब मध्ये पुराव्याची यादी दिलेली आहे. पुर्वीचा जो शासन जीआर आहे त्या जीआरप्रमाणे विवरणपत्र अ मधील किमान एक पुरावा आवश्यक होता आणि दुसरा पुरावा विवरणपत्र अ किंवा ब मधील दोन्हीमध्ये म्हणजे यांची यादी यामधील १५ आणि हे ६, २१ पैकी आणखीन १ कोणताही पुरावा. अशी पुर्वी अट होती

त्यानंतर १६ मे २०१५ चा जो जीआर आलेला आहे त्याच्यामध्ये १/१/२००० पुर्वीची झोपडी संरक्षणसाठी पात्र आहे. याच्यामध्ये विवरणपत्र अ आणि ब असा प्रकार ठेवलेला नाही. त्याच्यामध्ये फक्त एकच विवरणपत्र दिलेल आहे आणि त्यामध्ये सात पुरावे दिलेले आहेत

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही पात्रतेच्या आम्हांला अटि सांगीतल्या आहेत परंतु अपात्र होण्यासाठी कोणत्या अटि आहेत ते जर सांगीतलेतर त्याच्यावर आम्हांला बोलता येईल.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय घरासाठी पात्र असा हा विषय नाही. त्याला ओळखपत्र देणे हा विषय आहे. घरकुलची योजना आपल्याकडे आहे पण तो पुढचा विषय आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा, सभागृह. जशी पात्रता दिलेली आहे, तुम्ही जे डॉकेट आम्हाला या विषयाच दिलेले आहे त्यामध्ये अपात्र कोणत्या व्यक्ती ठरतील हे दिलेले आहे. त्याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. आता आम्हांला जे बोलायचे आहे त्यावर आम्ही बोलू. तुम्ही दिलेले सगळे पुरावे देवून सुध्दा एखादी व्यक्ती अपात्र ठरते त्याचे स्पष्टीकरण दयावे. सगळे असुन एखादी व्यक्ती अपात्र ठरते.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या सगळया पुराव्याची पुर्तता केल्यानंतर कोणता व्यक्ती आमच्याकडून अपात्र ठरत नाही. घरकुलासाठी जर तो अपात्र ठरत असेलतर तो वेगळा विषय आहे. हा विषय जो आहे तो झोपडपट्टीवासीयांसाठी ओळपत्र देणे असा विषय आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यांच्या जवळ फोटोपास आहे तो त्या घरकुलाला पात्र ठरतोच तरीही काही लोकांना मिळालेले नाही. ते का मिळालेले नाही.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यांची दुबार मिळकत आहे, आपल्या धोरणाप्रमाणे त्याची इतर मिळकत जर असेलतर बीएसयुपीमध्ये आपण लाभ देत नाहीत.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. असा एखादा जीआर दाखवा की ज्याच्या अनुषंगाने डयुएल प्रॉपर्टी असल्याच्यानंतर त्याला आम्ही नाकारलय.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे महापालिकेचे धोरण आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण दोन योजना केलेल्या आहेत. चौथ्या मजल्यावर बसुन काही तज्ञ मंडळीने निर्णय घेतलेला आहे. तुम्ही झोपडपट्टीत राहीलेच नाहीहो त्यांना काय माहिती. शासनाचे निर्णय यांनी वाचलेले नाहीत. शासन असे सांगते दि.१/१/१९९५ ने युतीच्या काळात झालेला निर्णय त्याच डोक कायम केलेल

आहे. २००० ला पुन्हा त्याला पुष्ठी दिलेली आहे त्याच घरट पुन्हा कायम केलेल आहे. पुन्हा सरकारन २०१४ मध्ये निर्णय घेतला त्याला बळकटी आली तो कायमचा पात्र ठरला. तुम्ही ५० पुरावे दिले त्यापैकी एक दिलातरी तो पात्र होतो. माझ्या बहिणीने गावाकडून पाठविलेली राखी, पत्र पाठवल तो पुरावा धरावा असं सरकारच म्हणणं आहे. आता तुम्ही त्याला पात्र केलेलं आहे. काही तज्ञ मंडळीने पिंपरी चिंचवड व पुनर्वसन विभागा मार्फत पात्र लाभार्थी यांना ११/७/२००१ च्या शासन झोनिपू नियमाप्रमाणे पात्र करण्यात आलेले आहे. लाभार्थी यांच्याकडून संपुर्ण सेवाकर वसुल करण्यात आलेला आहे लाभार्थी यांच्याकडून दहा सोसायटया स्थापन करुन प्रत्येकाना सामावुन घेण्यात आलेले आहे. त्यापैकी ६७२ लाभार्थी त्यांना इमारतीचा संपुर्ण सेवाकर सोईचा जमा करणेसाठी झोनिपु अधिका-यांनी पुनर्वसनातील घर राष्ट्रीयकृत बँकेकडे गहाण ठेवून स्वहिस्स्यापोटी रक्कम मिळवलेली आहे. तसेच काही लाभार्थी यांनी स्वहिस्सा बँक ऑफ बडोदा येथे भरलेला आहे. एकंदरीत दहा सोसायटयाचे ११२० लाभार्थी पुनर्वसन प्रकल्पात जाणार आहेत. पिंपरी चिंचवड मनपा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील सक्षम अधिकारी यांनी मार्च-२०१३ ला एसआरए नियमावली ५ फ अंतर्गत कारवाईच्या नोटीसा काढलेल्या आहेत. आयुक्त साहेब, जर आपला प्रोजेक्ट एसआरएचा नाहीच किंवा या शहरामध्ये एसआरएचा एकही प्रकल्प कार्यान्वित नाही तर तुम्ही ६ फ या एसआरएच्या नियमाच्या नोटीसा का काढल्या. जर आपला प्रोजेक्ट एसआरएचा नाहीच तर ६ फ च्या नोटीसा तुम्ही अपात्र करण्याच्यासाठी का काढल्या. म्हणजे तुम्ही आम्हांला घरापासून वंचीत करु शकता. पुनर्वसन प्रकल्पामध्ये झोपडपट्टी पात्र लाभार्थ्याकडुन २००५ च्या नंतर फोटोपास देण्यात आलेले आहेत २०१३ पर्यंत सेवाकर वसुल करण्यात आलेला आहे. बँकेत स्वहिस्स्याची रक्कम भरलेली आहे. बारा टक्केनी वसूल केलेली आहे. सक्षम अधिकारी यांनी एसआरए नियमावलीच्या ५ फ चा आधार घेवून त्यांना पुनर्वसन प्रकल्पात लाभ घेण्यासाठी भुमिहीन केलं का, हे कशासाठी. एकतर आपली योजना जेएनएनयुआरएम फ योजना आहे आणि दुसरी चिखलीला केलेली स्वस्त घरकुल योजना आहे. ज्यावेळेला केंद्रसरकार तुम्हांला एवढ बजेट देतं, पैसे देतं काही नॉर्मस पण देत असेलनां. २५ वर्षा पुर्वी मी या शहरामध्ये आलेलो आहे. त्यावेळेला माझे लग्न झालेले नव्हते, माझ आता लग्न झाल, मला दोन मुलं झाले माझ्या मुलालाही मुल झाले. आमच दोन माणसाचे कुटूंब २५ जणाचे झाले आणि १०x१० च्या खोलीत मी राहत आहे, मग कुठतरी मला असं वाटल की अर्धा गुंठा जागा मी माझ्या पोरासाठी, नातवासाठी घ्यावी म्हणून मी घेतली. १/१/९५ न माझ घरट शासनानच कायम केलय, त्यावेळी त्याला बळकटी दिली. काय गुन्हा आहे माझा, मी झोपडपट्टीमध्ये राहतो म्हणुन. शासन असं कुठच म्हणत नाही. आपण चौथ्या मजल्यावर बसुन केलेले हे नियम आहेत. विशालनगरची आठ एक्करची जागा आहे. त्या लोकांना तुम्ही घरात रहायला दिलेल आहे तो प्लॉट रिकामा झालेला आहे ते आरक्षण ताब्यात घ्यायला नको का. दोन हजार स्क्वेअर फुटच फायरब्रिगेडच जर रिझर्व्हेशन

सोडलतर आठ एक्करचा प्लॉट चांगल्या प्रोजेक्टसाठी मिळतो त्याठिकाणी चांगले हौसिंग करा, महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये वाढ होईल, ते आपण का केल नाही आणि याला एसआरएचा तुम्ही ५ फ चा नियम लावता, एवढ लुटलेल आहे गरीब माणसाला एकानेतर चिंचवडला आत्महात्या केली. ही तज्ञ मंडळी होती ज्यावेळेला एखादा नियम आपण करतो त्यावेळेला झोपडपट्टीत कामकाज करणा-या लोकांना बरोबर घेतल पाहिजे. काही शासनाचे नियम वाचले पाहिजेत. शासनाने असं कुठच म्हणलेल नाही उलट आता दंडवते साहेबांनी

वाचुन दाखवलना त्यात आम्हांला बळकटी आलेली आहे. आमच मतदारयादीत नाव आहे, फोटोपास आमचा आहे. ठिक आहे माझी दुबार प्रॉपर्टी आहेना नका देवू पण तो प्लॉट तुम्हांला ताब्यात घेता येणार नाही, माझ घरतर तुम्हांला पाडता येणार नाही. असा कुठला नियम आहे तो एखादया सक्षम अधिका-यांनी मला येथे सांगावा की तुम्ही डयूएल प्रॉपर्टीमुळे अपात्र आहात आणि आम्हांला तुमच घर खाली करायचय. असा शासनाचा नियम दाखवा. तुम्ही काढूच शकत नाहीत कारण तसा कायदा नाही. बॉम्बे हायकोर्टाचा एक लॅण्डमार्क डिसीजन झालेला आहे आणि म्हणून तुम्ही एखादया गरीब माणसाला त्याच्या हाक्का पासून वंचीत करुच शकत नाहीत. हा नियम तुम्ही केलेला आहे, ईथे केलेला आहे. तुम्ही एकतर सरमिसळ केली. एसआरएची योजना नाही, जर तुम्हांला एसआरएचे नियम लावायचेतर लावा, तुम्हांला ते अधिकार आहेत, मग तुम्ही ७० टक्के लोकांची परमीशन का नाही घेतली. हा पण एसआरएचाच नियम आहे. एसआरएप्रमाणे ४५० स्क्वेअर फुट दयानां, ते नाही दिलेल तुम्ही आणि केवळ अपात्र करण्याच्यासाठी डयुएल प्रापॅर्टी म्हणता. तुम्ही सगळया डयुएल प्रॉपर्टीवाल्यांना बाहेर काढलेल नाही. कोणाकोणाला लपवून ठेवल तुम्ही, माझ्याकड यादी आहे, एसआरएचच पत्र आहे हे. संजय कोलते, अति. सीईओ आहेत त्यांनी पत्र लिहीलेल आहे. त्यांनी स्पष्टपणे लिहीलं आहे “ही योजना महानगरपालिकेची आहे. या अपिलाच्या संदर्भात महानगरपालिकेनी निर्णय घ्यावा आणि येथून पुढ कुठलही एसआरएकडे पाठवू नये” हे संजय कोलते यांच २०११ च पत्र आहे. झोपलेत का आपले अधिकारी तीकड पाठवतात. आणि म्हणुन चुका आपल्या अधिका-यांनी केल्यात. याच्यामध्ये गोंधळ झालेला आहे. साहेब, बेघर झालेल्याना काय दु:ख असतं ते फार वेगळ आहे. या महानगरपालिकेच्या या सभागृहाच्या सदस्या शकुंतला बनसोडे त्यांच सामान आपल्या काही सक्षम अधिका-यांनी पोलीस बंदोबस्तात बाहेर काढल. मी गोरक्ष लोखंडे मलाही नोटीस आलेली आहे. का प्रॉपर्टी घेवू नये असा काही नियम आहे का. ठिक आहे, माझ्या दहा ठिकाणी प्रॉपटर्या असतील, मी इन्कमटॅक्सपेअर आहे म्हणून या सगळया गोष्टीचा आपण विचार केला गेला पाहिजे. अजून कोणी कोर्टात गेलेल नाही. पालीका पातळीवरचा हा निर्णय आहे. यांना एसआरएचा नियम लावता येणार नाही. आपण ओटयावर बोलत नाहीत, आपण एका जबाबदार सभागृहाचे सदस्य आहोत. हे नियम करत असताना तुम्ही ज्या नियमाला धरुन आपण काम करत आहोत त्यात नियमबाहय

काहीच करायच नाही आपल्याला. दंडवते साहेबांनी जे आता सात आठ जीआर दाखवले त्याने आम्हांला बळकटी आलेली आहे. आम्हांला तुम्हाला बेघर करण्याचा अधिकार नाही किंवा असा कुठला अधिकार आहे ते मला येथे येवून सांगाव की तुम्ही १/१/९५ ला पात्र आहात, २००० ने त्याला बळकटी दिलेली आहे, २०१४ च्या नियमान त्याला पात्र करण्यात आल आणि आमच्या नियमात तुम्ही अपात्र आहात म्हणुन तुमच घर पाडतोत असं याठिकाणी सांगाव. अस करताच येत नाही. बेघर माणसाची एक व्यथा आहे, एका माणसाने आत्महात्या केली त्याच मनोगत आहे. पात्र अपात्रमध्ये त्याचा बळी गेला, त्यांने आत्महात्या केली. मी एक कवीता वाचून दाखवतो- "माझ्या झोपडीत एक आभाळ होतं; माझ्या स्वप्नांच, माझ्या झोपडीत एक आभाळ होतं, माझ्या स्वप्नांच. भविष्याचा आधार होता माझा निवारा. चिलीपिली जगत होती, चिमणचारा खात होती, मोठी होत होती. अचानक बे-घर झालोहो मी. चिमणीपाखरं रस्त्यावर आली, मी मोडलो, मी खचलो, संसार रस्त्यावर आला शेवटी मला जगाचा निरोप घ्यावा लागला. वरुन मी पाहतोय, पात्र-अपात्रतेचा लढा. कोणी घर देता का, घर. कोणी काय दिले; कोणी काय दिले, कोणी किती घेतले याचा हिशोब नाही फसले ते वेगळे होते, फसवणारे शहाणे होते, प्रशासन सुस्त होते मी मेल्यावर तरीही प्रशासन मस्त होते आणि म्हणुन तो वरुन बघतोय, हे काय आहे जीवन. त्यांना तुम्ही बेघर करुच शकत नाहीत, लॉ हा असा परफेक्ट असतो. त्याच डयुएल मिनींग कधीच बदलत नाही.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. विषय क्रमांक ४ हा आपल्याकडे अवलोकनासाठी आलेला आहे. साहेब, तुम्ही खुप घाई केलेली आहे पुण्यातील कुठल्याही नगरसेवकाला विषयच माहित नाही. अजूनही पुण्याच्या आयुक्तांनी हा विषय सभागृहापुढे ठेवलेला नाही कधीतरी आम्हांला विचारत जा, कधी ठेवायचा, काय ठेवायचा. खरं म्हणजे विषय चांगला आहे. अधिका-यांनी अवघड केलेल्या पुराव्याचा जो विषय आहे तो सोपा केलेला आहे. अर्थात तो विषय जे आपल पुनर्वसन चालू आहे त्याला लागू आहे की नाही हा पुन्हा कायदयाचा विषय होवू शकेल. त्याची माहिती तुम्ही आम्हांला नंतर दिलीतरी चालेल. पुनर्वसन हा पिंपरी चिचवडचा एक खुप मोठा विषय आहे आणि मला असं वाटत की संपुर्ण महाराष्ट्रामध्ये अभिमानाने आपण सांगू शकतो की पिंपरी चिंचवड ही एकमेव महानगरपालिका आहे की जिणे एवढया मोठया प्रमाणामध्ये पुनर्वसन केलेल आहे. मी १९९९-२००० ला चेअरमन असताना मिलींदनगरचा प्रकल्प झाला आणि त्याहीपुर्वी १९८६ साली भाटनगरचा प्रोजेक्ट झाला, सुरवात तेथून झाली आणि खुप मोठया प्रमाणामध्ये गरीबांना घर दयावीत, अगदी गरीब की ज्यांना घर घ्यायची ऐपत नाही. १९६४ पासून वाढत आलेली ही नगरी याठिकाणी औदयोगीककरणाचा जो वेग आहे तो खुप मोठया प्रचंड प्रमाणात होता आणि म्हणुन संपुर्ण भारतातून पिंपरी चिंचवडमध्ये लोक आले आणि त्यांनी घरे कुठे मिळत नाहीत, ऐपत नाही म्हणून ते मिळेल त्याठिकाणी झोपडया बनवुन राहिले. माझ्या प्रभागातील ज्या झोपडया आहेत

त्या १९७० पासून आहेत. वेताळनगरची झोपडपट्टी ही तशीच १९७० पासूनची आहे. ओटा स्किम मधील ३३०० घर ही त्यावेळेस वेताळनगरसाठी बांधलेली आहेत. परंतु माहित नाही कुठ माशी शिंकली आणि ती घरही अशीच गेली. कोणीही लॉक काढले आणि घेतले हा महानगरपालिकेच्या कारभाराचा नमुना आहे. काही हजारएक घर कायदेशीर वाटली असतील परंतु बाकी सगळी घरे कोणीही लॉक उघडले आणि त्याठिकाणी घुसले, ठिक आहे ज्यांना आवश्यकता आहे ते घुसले असतील. परंतु अशाप्रकारे ही योजना त्यावेळेस बारगळली आणि म्हणुन ज्याठिकाणी झोपडपट्टीवासीय राहतात त्याचठिकाणी स्थलांतर न करता त्याच ठिकाणी घर बांधाव म्हणुन ही योजना राबवली. वेताळनगरची योजना, मिलींदनगरची योजना त्यापुर्वी झालेली ती अजूनही चालू आहे. अशाप्रकारे रमाबाईनगर, अजंठानगर आणि वेताळनगर खुप मोठयाप्रमाणात या योजना राबवल्या गेलेल्या आहेत. त्यासाठी त्याकाळच्या सरकारने, आघाडी सरकारने त्याला भरघोस मदतही केलेली आहे आणि त्यामुळे या योजना आपण राबवू शकलो. योजना राबवली त्याबद्दल सर्व अधिकारी वर्ग अभिनंदनास पात्र आहेत. परंतु काही अधिका-यांकडून त्यावेळेस त्रुटी राहून गेल्या असतील सगळयात महत्वाच असं आहे की याठिकाणच्या या योजनेकडे कोणतेही आयुक्त गांभीर्यपुर्वक पाहत नाहीत असं दिसतय. उदाहरण सांगते वेताळनगरचा प्रोजेक्ट आहे, दळवीनगरचा प्रोजेक्ट आहे. आठ वर्षापुर्वी सुरु केलेल बांधकाम फक्त चारच ईमारती व्हाव्यात. पुनर्वसनाच्या बांधकामाचा एवढा मंद असा वेग, एवढा कमी असा वेग मला नाही वाटत कुठेही असेल. तुम्ही त्यावर स्पेशल अधिकारी दिलेले आहेत. स्थापत्याचे सिटी ईंजिनीअरच्या लेव्हलला काम करणारे अधिकारी तिथे आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली दोन-तीन एक्झिक्यूटीव्ह काम करतात. असं असून सुध्दा आठ वर्षात वेताळनगरच्या फक्त चार बिल्डींग झाल्या. आडीच ते तीन वर्षा पुर्वी वेताळनगरच्या दोन बिल्डींग बांधुन तयार आहेत अस मी सांगीतलेल होतं. ज्या बिल्डींग तयार आहेत त्याच्या सर्व काचा फुटायला लागलेल्या आहेत, का वाटप करत नाहीत. मला असं सांगण्यात आल की तेथे ड्रेनेज जोडता येत नसल्यामुळे वाटप थांबलेल आहे. आपले अधिकारी इतके ऐशमध्ये आहेत, मला वाटत त्यांना त्या झोपडयामध्ये काम करायला कमीपणा वाटत असेल. कुठलेही ड्रेनेजचे अधिकारी तिथे गेले नाहीत, लोकांना विचारल नाही. वाघ मॅडम आता डेप्युटी ईंजिनीअर आहेत त्यांना मी म्हणाले माझ्या बरोबर चला, काही मार्ग निघतय का ते बघु. तेथे गेल्यावर दहा मिनीटामध्ये मार्ग निघाला, लोक स्वत:हून आले, दंडवते साहेबही त्याठिकाणी होते. तेथील दहा लोकांनी स्वत:हून लिहून दिल की आमच्या दारापुढून ड्रेनेजलाईन टाकायला हरकत नाही. एवढ सोप दहा मिनीटाच काम होतं त्याला तुम्ही दोन वर्षे लावले. त्या दोन वर्षात तो प्रकल्प तसाच रखडला गेला त्याच्या पुढच्या बिल्डींग रखडल्या, यात कोण दोषी आहे. आयुक्त साहेब, तुम्ही जशा बांधकामाच्या बाकीच्या मिटींग घेता, जशा कामाच्या मिटींग घेता, एचओडीला बोलवता तस यांना स्वतंत्रपणे बोलवा. आता जे बांधकाम चालू आहेत ती तरी लवकर होतील. यात सर्वात मोठ जे दु:ख आहे ते

म्हणजे आमच्या दळवीनगरची झोपडपट्टी पुनर्वसन हे थांबवलेल आहे. जेएनएनयुआरएमचे पैसे या वेताळनगरलाच पुरत नाहीत असं तुमच्याकडून सांगण्यात आलं आणि निधीअभावी आमचे गोरगरीब, ज्यांना घर आहेत ते अजून या झोपडीतल्या घरासाठी भांडत असतीलतर ते माझ्या दळवीनगरचे लोक १९७० च्या आदि पासून त्याठिकाणी राहतात. ते अत्यंत हलाखीमध्ये राहतात. पुनर्वसन आहे, पुनर्वसन आहे म्हणून १९९० च्या आदि पासून त्यांना कोणत्याही सोई दिल्या गेलेल्या नाहीत. रस्ते केले गेलेले नाहीत, ड्रेनेज लाईनचा आता विषय घेतलेला आहे चार महिने झाले काम सुरु झालेल आहे. गटारी सुध्दा तुटलेल्या आहेत पुनर्वसन म्हणून तेही कधी होत नव्हतं. आयुक्त साहेब मी तुम्हांला एक विनंती करते, तुम्ही चौकशी करा या पंधरा ते वीस वर्षामध्ये तिथं काय काम झालेल आहे आणि किती खर्च झालेला आहे आणि कोणत्या अधिका-यांनी तो खर्च केलेला आहे. प्रत्यक्षात कोणतीही सुविधा तेथे पुनर्वसन आहे म्हणून दिली जात नव्हती याची नोंद घ्यावी. पाण्याच्या पाईपलाईन सुरवातीला टाकलेल्या आहेत. त्याच पाईपलाईन आहेत. पाणी नाही, लाईट नाही, रस्ते नाहीत. अत्यंत हलाखीच्या जशी गटारीमध्ये घाण असते अशा घाणीमध्ये ते लोक राहतात. तुम्ही जेव्हा ते पुनर्वसन होणार नाही असा ठराव पास केला त्यावेळी त्याच्या अगोदर एक वर्षभर झाल त्याठिकाणी सुविधा पुरवायला सुरवात झालेली आहे. त्याठिकाणी ब्लॉक टाकलेले आहेत. नळाच्यासाठी आपल्याकडे तांबे साहेब, एक्झिक्युटीव्ह आहेत, बजेटमध्ये तरतूद होती परंतु टेंडर काढायला नऊ ते दहा महिने लागले. नऊ महिनेतर इस्टीमेटच नव्हते. तुम्ही आमच्याकडून अंदाजपत्रक तयार करुन घेता, वेळ जाईल, मुदत संपेल म्हणून आम्ही बजेट तुम्हांला लगेचच पास करुन देतो थोडी चर्चा होते परंतु नऊ-नऊ महिने ज्यांनी ज्यांनी इस्टीमेट केल नसेल अशांवर काय कारवाई करणार. ब प्रभागातून इस्टीमेटची फाईल मी काढली मग तो शिपाई माझ्या मागे पळत आला. रात्री आठ वाजेपर्यंत थांबले आणि त्या क्लार्क कडून टेंडर काढून घेतलेल आहे. त्यानंतरची जी प्रोसिजर आहे ती लवकर झाली आणि आता परवा त्याला वर्क ऑर्डर दिलेली आहे. ड्रेनेज काम चालू आहे, ड्रेनेज लवकर झाल, मी म्हणाले होते पाण्याची वर्कऑर्डर येईपर्यंत थांबा म्हणून ड्रेनेजच्या कामासाठी थांबलो. जेणेकरुन एकत्रीत खंदल की तो रस्ता होईल, लोकांना वागायला जागा नाही आणि म्हणून ते एकत्रीत काम सुरु केलीत. बजेटमध्ये जी काम आहेत त्याचे इस्टीमेटतरी केलय का? टेंडरची प्रोसिजर कुठपर्यंत आलेली आहे. कोणकोणती काम राहिलेली आहेत. जरा थोडस मागे वळून पहा साहेब, म्हणजे कळेल प्रभागाला एका कामासाठी तुम्ही तीन लाख देताय. त्याच्यावर चर्चाही करता येत नाही. आता आमच्यासमोर बजेट येईल ते अस येईल आणि असच जाईल. छापूनही होतं चर्चा काही करता येत नाही. आमच्या समोर येत त्यात वाढ करता येत नाही जे बजेट मंजूर झालय त्याच्यावर काम काढल्यानंतर एखाद वाढवायच म्हणलेतर एखादया लाखाच सुध्दा वाढीव काम करता येत नाही एवढया मर्यादा प्रभागामध्ये आहेत. बजेटमध्ये असुन सुध्दा काम होत नाहीत म्हणून माझ्या दळवीनगरच

काम रखडल गेल आहे. केंद्रशासनाने ही शौचालयाची योजना आणलेली आहे तेही का रखडल्या गेल आहे. ड्रेनेज लाईन झाल्याशिवाय अनुदान देता येत नाही म्हणून ती ड्रेनेजची लाईन सुरु केली आता पाण्याची लाईन त्याठिकाणी सुरु होईल. साहेब, तुम्ही झोपडपट्टीमध्ये एक-एक दिवस पाहणी करा. झोपडपट्टीमध्ये सुध्दा माणसच आहेत. दळवीनगरच्या झोपडपट्टीच पुनर्वसन होता होता राहील. म्हणताततना "उष:काल होता होता काळ रात्र आली", ती काळरात्र आमच्या दळवीनगर मध्ये आलेली आहे. मी उपसूचना दिलेली आहे त्याप्रमाणे वाढवुन दयाव. आता मा. ॲड.गोरक्ष लोखंडे हे खुप पोटतीडकीने याठिकाणी बोलले. पहिल्या चार बिल्डींगमध्ये ज्यांना शहरामध्ये प्रॉपर्टी आहे त्यांना घर मिळाली. आता पुढच्या दोन बिल्डींगच वाटप झाल आहे. पहिल्या बिल्डींगमधल्या लोकांना काढा असं आमच मुळीच म्हणण नाही आणि काढु सुध्दा नये कारण तिथ कोण राहत, जे गरीब आहेत तेच राहतात, जे अगदी मजबुर आहेत तेच राहतात. काही लोक असेपण आहेत, १९७० पासून २००० पर्यंत त्यांनी सांगीतल आहे. २००० ला मुलगा जर १८ वर्षाचा असेलतर तो आता १५ वर्षानंतर ३५ वर्षाचा होईल त्यानी काय करायच. जरी कायदा असला, नियम असलातरी तो चुकीचा आहे. २००० पर्यंत तो २० वर्षाचा असेल, खरं म्हणजे त्याला मतदानाचा अधिकार मिळाला की तो सज्ञान आणि मग आता १५ वर्षानी तोच नियम लागू करत असालतर त्या नियमामध्ये हा बसला पाहिजे. आज जर पुनर्वसन होत असेलतर त्या नियमामध्ये तो बसला पाहिजे. म्हणजे आई-वडीलाला जर घर मिळाल किंवा मोठया भावाला घर मिळाल आणि छोटा जर ३५ वर्षाचा असेल, ३० वर्षाचा असेलतर त्याच्याही घराचा विचार करा. म्हणजे त्याला दुबार वगैरे असा नियम लावु नका. अगदी सुटसूटीत हा नियम आलेला आहे त्याला आम्ही मंजुर करणारच आहोत परंतु आपण कोणत्या नियमाने कोणत्या कायदयाने तुम्ही ज्यांची शहरामध्ये प्रॉपर्टी आहे अशा झोपडपट्टीवासीयांना पुनर्वसनात घर नाकारताय. दुसर असं की सन २००० मध्ये जो १८ वर्षाचा असेलतर त्याच आताच काय? त्यावेळेस १८ वर्षाचा आता ३५ वर्षाचा झालाय त्याच्याबद्दल आपली काय भुमिका आहे. आजचा जो नियम होतोय तो येथे अवलोकनासाठी आलेला आहे हा नियम तुम्ही लागू करणार आहात काय? याचा खुलासा करावा आणि दळवीनगरसाठी जर लवकरात लवकर पुनर्वसनाची कोणती योजना आली असेलतर त्यासाठी सर्वात प्रथम दळवीनगर व उदयोगनगर झोपडपट्टीसाठी सर्वात प्रथम विचार करावा ही विनंती करते.

**मा.शेखर ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ताथवडे भागामध्ये काळाखडक झोपडपट्टी आहे त्या झोपडपट्टीमध्ये असुविधा आहेत. त्या झोपडपट्टीमधील नागरीकांना पिण्याच्या पाण्याची सुध्दा सोय नाही. कॉलेजला पाणी जात परंतु तिथ पाणी नाही. शौचालयाच्या अनुदानासाठी ती लोक आले नाहीतरी त्यांना तुम्ही घरोघरी जावुन फॉर्म दिलेतर त्या सर्व लोकांना ती सुविधा होईल. महापालिकेच्या अधिका-यांना फोटोपास संदर्भात फोन केला होता. ती झोपडपट्टी प्रायव्हेट बिल्डरने घेतलेली जागा आहे. तिथं लोकांना पुर्वी घरपट्टया

यायच्या परंतु आज दोन-तीन वर्षे झाले तिथल्या लोकांना घरपट्टया येत नाहीत. त्यामुळे त्या लोकांना अशी भिती निर्माण झालेली आहे की आमची झोपडपट्टी उठते की काय आणि त्यामध्ये सर्व लोकांची सम्मती नाही. आयुक्त साहेब, त्यामध्ये आपण लक्ष घालाव, झोपडपट्टीत जायला वेळ दया. तुम्ही तिथ आलाततर अजुन चांगल्याप्रकारे सुविधा होतील. पाण्याचा प्रश्न खुप महत्वाचा आहे तो लवकरात लवकर करुन दयावा ही विनंती आहे.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. झोपडपट्टीधारकांच्या अन्य मिळकती बाबत किंवा अन्य त्याची प्रॉपर्टी कुठे आहे का त्याबाबत शासन जीआर १६ मे २०१५ मध्ये परिच्छेद क्रमांक २ दिलेला आहे. परिच्छेद क्रमांक २ हा झोपडपट्टीधारकांकडून घ्यावयाचे शपथपत्राबाबतचा आहे. झोपडपट्टीधारक त्याला फोटोपास मिळण्यासाठी अर्ज करतो आणि पुरावे सादर करतो त्यासोबत त्याने एक शपथपत्र दयायच आहे आणि त्या शपथपत्रामध्ये त्याने अस नमुद करायच आहे की माझ्या नावे, माझ्या पत्नीच्या नावे किंवा १८ वर्षाखालील अज्ञान मुलांच्या नावे महापालिका क्षेत्रामध्ये झोपडी किंवा मालकी तत्वावर अथवा भाडेतत्वावर घर नाही असं एक सेल्फ डिक्लेरेशन दयायच आहे. त्याच्याच पुढ म्हणलेल आहे यामध्ये चुकीची माहिती दिल्याच आढळून आल्यास सदर झोपडपट्टीधारकास अपात्र ठरवण्यात येईल त्याशिवाय त्या व्यक्ती विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. १६ मे २०१५ चा जो जीआर आहे त्याच्यामध्ये स्पष्टपणे शासनाने असं नमुद केलेल आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शासनाने शपथपत्र दिलेल आहे, माहिती मागवलेली आहे. त्यात असं म्हणलेल आहे का, शासन जेव्हा डिक्लेअर करताना तेव्हा ते डयुएलमध्ये करत नाही. शपथपत्राचा नमुना तुम्ही वाचून दाखवून त्याला नियम समजत असालतर मला वाटते आमच्यासारखे शहाणे आम्हीच आहोत. अजुन कोर्टात कोणी गेलेल नाही. गेल्या आठवडयामध्ये भारतीय संसदेन काही नियम केलेले आहेत. त्यात त्यांनी असे म्हणलेल आहे १९८९ चा जो नागरी कायदा आहे. ५५ ची अमेंडमेन्ट १९८९ पर्यंत झालेली आहे आणि १९८९ च्या ज्या जाचक अटि होत्या त्या १९८४ मध्ये होवू घातलेले आहेत त्यात मॉडीफीकेशन झालेल आहे. जे आपल्याशी संबंधीत आहे ते सांगतो. प्रामुख्यान झोपडपट्टीमध्ये मागासवर्गीय माणस राहतात. ते या लाभापासून वंचीत राहतात. मागासवर्गीय माणसाच्या संदर्भामध्ये असंही म्हणलेल आहे तुम्ही अमक्याला मतदान करा आणि अमक्याला करु नका हा संसदेन गुन्हा ठरवलेला आहे आणि म्हणून तुम्ही एखादया माणसाला त्याच्या निवा-यापासून, त्याच्या घरापासून वंचीत ठेवू शकत नाहीत. एक शपथपत्राचा नमुना वाचुन सभागृहाची दिशाभूल करता की काय. स्वस्त घरकुल योजना, त्याचे केलेले नियम तुम्ही जर मला या नियमात दयायच होततर मला ही नोटीस का दिलीहो. कशासाठी दिली ही नोटीस. संजय कोलते, अति. सीईओ, एसआरएचे हे त्यांच्या पत्रामध्ये स्पष्टपणे सांगतात ही तुमची

योजना नाही स्वत:ची महानगरपालिकेची योजना आहे तुम्ही त्याचे निर्णय स्वतंत्रपणे घ्या. आमच्याकडे एकही प्रकरण पाठवू नये आणि म्हणून तुम्ही एका फॉर्मेटला कायदा बनवु शकत नाहीत. त्याच ते फॉर्मेट आहे. याची शहनिशा करुन निर्णय घेवू.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह. हा जो विषय आलेला आहे तो राज्यशासनाने झोपडपट्टी पुनर्वसन करताना जी काही पात्रता ठरवायची आहे त्यामध्ये जो काही सुटसूटीतपणा आणला त्यासाठी तो जीआर आहे त्याची अदि सभागृहाने नोंद घेतली पाहिजे अशी माझी विनंती आहे. पुर्वी प्रपत्र अ, प्रपत्र ब असे होते प्रपत्र ब मध्ये असे काही एकवीस पुरावे होते, त्यात पहिल्याचा किंवा दुसऱ्याचा असं थोड किचकट होतं. हे सगळ त्यांनी बाजुला काढल आणि आता एकच पुरावा लागेल अस सुटसूटीत धोरण ठेवलेल आहे त्यामुळे या बदलाप्रमाणे यापुढचे सगळे प्रकल्प होतील आणि ही झोपडपट्टीवासीयांसाठी अतीशय सकारात्मक बाब आहे. हा शासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे तो मा.महासभेच्या निदर्शनास आणुन दयावा हा या विषय ठेवण्यामागचा उद्देश आहे. त्यामुळे त्याप्रमाणे आपण याची नोंद घ्यावी आणि यापुढे जे काही हौसिंग डिपार्टमेंट, एसआरए आणि त्यांचे जे काही सक्षम अधिकारी आहेत, आपल्या महापालिकेचे दंडवते साहेब सक्षम अधिकारी आहेत त्यांनी भविष्यात जी काही पात्रता ठरवायची आहे ती या २०१५ च्या नवीन जी.आर.प्रमाणे सुटसूटीतपणे एकच पुरावा मागुन ठरवावी अशी अपेक्षा आहे. याच्यामध्ये काही दुसरे मुद्दे निघाले मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपल्या शहराला केंद्रशासनाने बेस्ट सिटी फॉर प्रो को ॲक्टीव्हीटीज अस बक्षीस दिलेल आहे. आणि हे जे प्रो को ॲक्टीव्हीटीजच बक्षीस दिलेल आहे किंवा जो काही ऑवार्ड दिलेला आहे तो बीएसयुपीमध्ये आपण राज्यात सगळयात जास्त घर बांधण्यासाठी प्रकल्प हाती घेतले त्या व्यतिरीक्त ईडब्ल्यूएस हे महाराष्ट्रात कुठल्याही शहरात नाही आपण आपल्या शहरात ६७२० घर बांधले त्याची नोंद घेतलेली आहे त्यामुळे महापालिकेनी प्रो को ॲक्टीव्हीटीज हे चांगल काम केलेल आहे पुढेही करत राहील त्याची नोंद केंद्रशासनान पण घेतलेली आहे. आता जो मुळ मुद्दा आहे की दुबार नोंदी बाबत मी लोखंडे साहेबांना सांगु इच्छितो की याबाबत आपण बघुयात फक्त याच्यामध्ये सध्याच जे काही धोरण आहे याच्यामध्ये केंद्रशासनाने नवीन प्रायमिनीस्टर आवास योजना आणलेली आहे. त्याच्यातले चार काम मिळतात त्यामध्ये त्यांनी असं जाहीर केलेल आहे की, या सगळया लाभार्थ्यांना शहरात नव्हे, देशात कुठही दुसर घर नसेल, आपल जे आहे ते शहरात आहे देशात नको अस म्हणलेल नाही. त्याव्यतिरीक्त आता जो त्यांनी शपथपत्राचा नमुना वाचून दाखविला त्यामध्ये जी खालची लाईन वाचली की जर तुम्ही आम्हांला चुकीची माहिती दिलीतर तुम्ही अपात्र ठराल. याचा अर्थ असा आहे की स्वत:च सेल्फ डिक्लेरेशन कराव आणि जर स्वत:च घर असेलतर घेवू नये अशीही त्याच्यामध्ये अपेक्षा आहे पण तरीही दुबार घर असताना आपण का अपात्र करतो आणि तो झोपडपट्टी पुनर्वसनचा नियम इकड बीएसयुपीला का लावतो याच्या बद्दल चर्चा होवू शकते त्याच्याबद्दल

वादविवाद होवू शकतात. तुम्ही म्हणाल बीएसयुपी आणि एसपीएस मध्ये ज्यावेळेस आपण प्रकल्प केला, डीपीआर केला तीच पात्रता आहे, त्याबद्दल वेगळी पात्रता बगायची गरज नाही. आणि मग त्याला एक घर असेल किंवा दोन घर असतील. शहरात असेल नाहीतर बाहेर असेल पण तरीही थोड काळजीपुर्वक पुढ जाव. आपण आदि जे पात्र आहेत त्यांना घर देण्याचा प्रयत्न करतो आहोत. पठाण मॅडमनी दोन मुद्दे उपस्थित केले, झोपडपट्टीत मी कालही सुट्टी जरी होती तरी आनंदनगरमध्ये एक ते दिड तास फिरुन आलेलो आहे. त्याठिकाणी कचरा होता, काही ठिकाणी पाणी येत होतं, काही ठिकाणी पाणी येत नव्हतं आणि म्हणून झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये आपण चांगले अधिकारी दिलेले आहेत. झोपडपट्टी आमच्या दृष्टिने प्रायोरीटीच आहे. त्यासाठी कधीही आमचे काम सोडून आम्ही त्यासाठी येण्याचा आमचा प्रयत्न राहील आणि झोपडपट्टी मधील गरीब जनतेला मिनीमम सेवा देवू, पाणी, रस्ता, लाईट आणि साफसफाई, धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही. या विषयाच्या अनुषंगाने मला विनंती करायची आहे की एसआरए, जेएनएनयुआरएम, म्हाडा या एकाच कायदयामध्ये बसविलेल्या आहेत. कारण मुंबई महापालिका असेल किंवा पुणे महापालिका असेल किंवा पिंपरी चिंचवड महानगरपालिका असेल यांचे नियम, टॅक्स, वेगळे का. मी मागेही गायकवाड साहेबांना सांगीतले होते, पुनर्वसनाचा प्रकल्प आपण जेएनएनयुआरएमच्या नावाखाली घेतला असेलतर तो कायदा आपणच घेवू शकतोना. १० टक्के नुसार त्यांनी केला असेलतर आपली महापालिका का करत नाही. आपल्या महापालिकेनी त्यांचे आधारे केले पाहिजे. आपण ज्या ज्यावेळेस कुठला विषय घेतो तो पुणे महापालिकेच्या धरतीवरती, पिंपरी चिंचवड महापालिकेचा विषय असा असा करण्यात यावा असे आपण हमेशा करतो. किंवा मुंबई महापालिकेच्या धरतीवर असे विषय असतात. मग या टॅक्सबद्दल का. माझ्या भागामध्ये १९८६ साली ओटास्किम राबवली गेली. १५६३ गाळयात पुनर्वसन केले गेले. त्यातील काही लोकांना आणखीन टॅक्स येत नाही. त्यांचा फोटोपास आहे. सेवाआकाराची पावतीच भेटत नाही. फोटोपास आहे, ताबापावती दिली, माझ्याकडे काही लोक आलेले होते ते म्हणाले टॅक्स पावती दिलेली नाही कारण ती मुलांच्या शिक्षणासाठी अत्यंत गरजेच असते. से-२२ मध्ये १५६३ ओटाधारक आहेत त्यांना टॅक्स येत नाही याची नोंद घ्यावी आणि त्यांची टॅक्सची पावती कशी मिळेल हे बघावे. दुसरी गोष्ट सग्रांमनगर झोपडपट्टी आता प्राधिकरणाने जो स्पाईनरोड केलेला आहे त्या स्पाईनरोडवर काही झोपडया होत्या त्या झोपडयाच पुनर्वसनासाठी माझ्या भागात काही जागा मोकळी केलेली होती त्या जागेमध्ये आपण टेम्पररी झोपडया शिफ्ट केल्या. बो-हाडेताईनी पत्र दिलेले आहे. २४० असतील त्या पत्राशेडमध्ये काही पाठवल्या. दत्त मंदीर परिसरामध्ये आणि काही आनंद चौकामध्ये आणि काही अंकुश चौकामध्ये अशा ठिकठिकाणी झोपडया टाकल्या गेल्या. २५०

झोपडयाचे ६०० ते ७०० झोपडया झाल्या याला जबाबदार कोण? आम्ही त्यावेळेस सांगत होतो की याची तुमच्याकडे कुठेतरी नोंद पाहिजे, यादी पाहिजे. आज तिथल्या झोपडपट्टीधारक लोकांनी पाच-पाच, दहा-दहा हजार देवून जागा दिल्या गेल्या. याला जबाबदार कोण राहणार आहे. अधिकारी का स्थानिक नगरसेवक. अधिकारी असतीलतर का त्यांची जबाबदारी ते पार पाडु शकत नाहीत. उदया जर तो ऐरीया जास्त वाढला आणि त्याच्यावर कारवाई करायची झालीतर निश्चितच आमच्यासारखे लोक आडवे येणार आहेत. हे होवु नये म्हणून याची काय काळजी आपण घेणार आहेत. आज मतदानदिन शहरात साजरा करतात. सर्वांना सांगतो की २००० पर्यंतचे जे पुरावे आहेत त्यामध्ये झोपडीधारकाचा सुध्दा पुरावा असु शकतो भोसरी मतदारसंघ, चिंचवड, पिंपरी मतदारसंघ त्याठिकाणी रोज मतदान नोंदणी चालू आहे सर्वांनी याची नोंद घ्यावी. सकाळी ११ वाजल्यापासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत रविवार सुट्टी सोडून कोणाचे काही फोटोमध्ये काही अक्षेप असतील किंवा नावात फेरफार करायचे असतीलतर, पत्ता चेंज करायचा असेलतर, नवीन नाव नोंदणी करायची असेलतर प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये आण्णासाहेब मगर स्टेडीअम, हेगडेवार भवन, थेरगाव असेल याठिकाणी मतदान नोंदणी चालू आहे तरी सर्व सभागृहाला आणि पत्रकाराना विनंती आहे की आपण सर्व शहरवासीयांना कळवावे. टॅक्स बद्दल मुंबईला घेतले जाते तेच आपल्याकडे घ्यावे. कारण माझ्या वॉर्डामध्ये जेवढे आपण पुनर्वसन करतो त्या प्रत्येकाना आता प्राधिकरणाच्या टॅक्स प्रमाणे टॅक्स लागलेला आहे. जे झोपडपट्टीधारक आहे त्यांच्या बाबत मा.गोरक्ष लोखंडे यांनी कायदा सांगीतलेला आहे, धन्यवाद.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. झोपडपट्टीचे पुनर्वसन करावे हे आमच्या मनामध्ये आहे. मग ते सेंट्रल गव्हर्मेंट असू दया, स्टेट गव्हर्मेंट असू दयात, महापालिका असु दयात नेहमी सहकार्य करते, मी छोटा कार्यकर्ता आहे मीही सहकार्य केलेले आहे. गेली बारा वर्षे झाली माझ्या जागेमध्ये अजंठानगर झोपडपट्टी स्थलांतर केली. ट्रॅन्झिट कॅंप बनवला माझ्याकडून फक्त दोन वर्षासाठी लिहून घेतले आज आठ ते नऊ वर्षे झाले अजेंठानगर बांधले गेले पण माझी जागा खाली केलेली नाही. त्यावेळेला त्यांनी ठराव केला की चाळीस हजार रुपये तुम्हांला देण्यात येतील. तसं म्हणलेतर आठ वर्षाचे महापालिकेचे दिड ते दोन कोटी मिळाले असते मी घेतले नाही मी म्हणालो मला पैसे नको माझी जागा खाली करावी म्हणुन अनेकवेळेला सगळयांना मी सांगीतल, पत्र सुध्दा दिले. आयुक्तांना मी तोंडी सांगीतल, पत्र दिलेल आहे. मी विनंती करतो की आपण आज सांगावे त्याठिकाणी सगळयांना घर दिलेली आहेत पण अजून त्याठिकाणी १५० ते २०० झोपडया माझ्या जागेमध्ये आहेत, मी साधा कार्यकर्ता आहे, मी भविष्यासाठी ती साडेचार एक्कर जागा घेतलेली आहे. युती शासनाच्या मंत्र्यांनी मला नोटीस पाठवलेली आहे की ती जागा ताब्यात का घेवू नये म्हणून. मा.आयुक्त साहेब जर आपण त्याप्रमाणे एक पत्र दिल मा.मिनीस्टरनां तर

निदान माझी जागातरी वाचू शकेल. त्यांनी दोन ते आडीच कोटी रुपये मला भरायला सांगीतलेले आहेत. आता सध्या माझ्याकडे पैसे नाहीत. पण आयुक्तानी भाड चालू केलतर ते पैसे मी देवू शकतो व माझी जागा मला मिळू शकते. मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती करतो की झोपडपट्टी वाढत चाललेली आहे. नवीन झोपडपट्टीचे पुनर्वसन करतो पण ज्याठिकाणी ट्रॉन्झीट कँप मधल्या झोपडया आहेत त्या तशाच राहतात. त्यामुळे तिथं झोपडपट्टी वाढत राहते. आई-वडील तीकडे जातात आणि मुल त्याचठिकाणी राहतात ते म्हणतात नाव दिलीतरी आम्हांला मिळाले नाही. आपले सहा.आयुक्त असतील त्यांना सांगा की असे करताना त्याठिकाणी सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. त्यांच्याकडून तुम्ही लिहून घ्या की ज्यावेळेला तुमच घर तयार होईल त्यावेळेला सगळयांना तेथे ट्रान्फर करायचे आहे. उदया मुलं त्यांची नातवंड सुध्दा मोठी होतात, ते सुध्दा अधिकार दाखवू शकतील त्यामुळे कॉर्पोरेशनमध्ये आणि आपल्या पिंपरी महापालिकेमध्ये आमच्यासारखे पांढरपेशी कमी होतील आणि सगळया ठिकाणी झोपडपट्टया जास्त होतील. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की आपण आपल्या मा.मिनीस्टर साहेबांना एक पत्र दयावे. लवकरात लवकर ज्यांना घरे मिळालेली आहेत त्यांचे पत्राशेड ताबडतोब काढाव आणि माझ्या परिवाराची प्रॉपर्टी आहे ती मला खाली करुन मिळावी, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते-

विषय क्रमांक - ५

दिनांक - २५/१/२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१५/ २०१५ दि.१५/४/२०१५

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/ २०१५ दि.१५/४/२०१५

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि.१३/५/२०१५

४) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७०३ दि.२०/६/२०१५

५) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२५ दि.२३/७/२०१५

६) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७४३ दि.२५/८/२०१५

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे सद्यस्थितीत १४५० बसेस व भाडेतत्वावरील ६६२ बसेस अशा मिळून एकूण २११२ बसेस आहेत. यासाठी महामंडळाकडे पुणे हद्दीत ७ डेपो व

पिंपरी चिंचवड हद्दीत ३ डेपो असे+मिळून एकूण १० डेपो आहेत. बस संख्येच्या प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत महामंडळाच्या शेकडो बसेसचे पार्किंग रस्त्यावर करण्यात येते. भविष्यामध्ये जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५०० नविन बसेस परिवहन महामंडळास प्राप्त होणार आहेत. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व बसेसचे पार्किंग संरक्षित जागेत होणे आवश्यक आहे. तरी सदर बसेसचे अंतर्गत पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी महामंडळास जागेची अत्यंत आवश्यकता आहे व त्यासाठी मनपा हद्दीतील रिकाम्या झालेल्या विविध जकात नाक्यांच्या जागा बस डेपो/बसस्थानकाचे वापरासाठी मिळणेस परिवहन महामंडळाने विनंती केलेली आहे व अशा १० जकात नाक्यांच्या जागेंची यादी त्यांनी दिलेली आहे.

तथापी यापूर्वी मनपा हद्दीतील बस टर्मिनससाठी आरक्षित असलेल्या एकूण ४ जागा आदेश क्रं.भूजि/सर्व्हे-२/कावि/१७०/१४ दि.३/२/१४ अन्वये परिवहन महामंडळास सदर जागांची असणारी तातडी लक्षात घेता तात्पुरत्या स्वरुपात देणेत आल्या आहेत.

पि.चि.म.न.पा. हद्दीतील एकूण १० जकात नाक्यांच्या संपूर्ण जागा ताब्यात मिळणेबाबत परिवहन महामंडळाने विनंती केली आहे. सदर जकात नाक्यांचे जागांचा ताबा दि. ८/४/१५ रोजी एल.बी.टी. (जकात) विभागाकडून या विभागांस प्राप्त झाला आहे. सदर मागणी केलेल्या १० जकात नाक्यापैकी एकूण ३ जागा परिवहन महामंडळास देता येणे शक्य आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्रं. | गावाचे/जकात नाक्याचे नाव | प्रयोजन | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | निगडी | | से.क्रं.२२ | १.०० | प्राधिकरणाकडून ताबा |
| २ | च-होली | | ९९३ पै. | ०.४३ | T.D..R. ने ताबा |
| ३ | डुडुळगाव | | ५० पै. | ०.४० | ताबा आहे. |
| | | | एकूण क्षेत्र | १.८३ हे. | |

सदर जागा परिवहन महामंडळास देणेबाबतची तातडी पाहता, सद्यस्थितीत उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मनपाच्या एकूण ३ जकात नाक्यांच्या जागा कायदा, नगररचना विभाग यांचे अभिप्राय/अटी-शर्तीस अधिन राहून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांस बसडेपो/बसस्थानकाचे वापरासाठी तात्पुरत्या स्वरुपात देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावा अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.साधना जाधव-** मा. महापौर साहेब, अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ८०१ विषय क्रमांक - ५

दिनांक - २५/१/२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१५/ २०१५ दि.१५/४/२०१५

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/ २०१५ दि.१५/४/२०१५

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि.१३/५/२०१५

४) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७०३ दि.२०/६/२०१५

५) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२५ दि.२३/७/२०१५

६) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७४३ दि.२५/८/२०१५

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते-

विषय क्रमांक - ६

दिनांक - २५/१/२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र पअक/६/कावि/३१९/२०१५ दिनांक ०९/०७/२०१५

२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७२७ दि २३/७/२०१५

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७५० दि.१९/९/२०१५

४) मा.महापालिका सभा ठराव क्र.७७३ दि.२०/११/२०१५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७ (अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगत पूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधीचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल. अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या DPSIR या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा. महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेली अनेक महिन्यापासून हा विषय खरतर विषयपत्रीकेवर आहे. मंजूर करणार असालतर बोलते, मंजूर करणार नसालतर बसते. मा.महापौर साहेब, खरतर आपल्या शहराचा आणि पर्यावरणाचा दुरदुरपर्यंत संबंधच नाही. पर्यावरण अहवाल दरवर्षी हा कट, कॉपी, पेष्ट असतो. या विभागाचे प्रमुख म्हणून मी खरतर नाव घ्यायला नाही पाहिजे होत, नाव नाही घेतल, जबाबदारी नाही निश्चित केलीतर सगळे हात झटकून मोकळे होतात आणि म्हणून पर्यावरणासाठी स्वतंत्र अधिकारी नेमलेले आहेत संजय कुलकर्णी साहेब. दरवर्षी आम्ही पर्यावरण अहवाल जसा आहे तसाच वाचतो. त्याच्यामध्ये काय सुधारणा केल्यात हे कळायला खरतर मार्गच राहत नाही. प्रत्येक वर्षी अहवाल आला की असं वाटत की मागच्या वर्षाचाच वाचतो की काय. त्यामध्ये ज्ञान घेण्यासारख दुसर काही नसतं. DPSIR म्हणजे ड्रायव्हींग फोर्स प्रेझर स्टेटस इम्पॅक्ट रिस्पॉन्स हा दरवर्षी प्रमाणे जसा आहे तसाच आहे पान सुध्दा आपण बदलत नाही. याठिकाणी आयुक्तांचे मनोगत सुध्दा बदलले जात नाही आणि मग खरच याला पर्यावरण अहवाल म्हणायचं का? अनेक संस्था, अनेक कार्यकर्ते या शहरामध्ये पर्यावरणाच पोटतीडकीने काम करतात. पर्यावरणाच्या अहवालामध्ये पीएच, डीओ, सीओडी, बीओडी असेल याचे प्रमाण पाहण्याचे काम प्रामुख्याने पर्यावरण विभागाला करायच होत. पीएच म्हणजे काय. पीएच म्हणजे पाण्यातील आम्ल किती. मा.महापौर साहेब, या पीएचच महत्व असं आहे की पाण्यातील हायड्रोजनची शक्ती, पाण्यामध्ये जर पीएचच प्रमाण घटलेले असेलतर आम्लतेचे प्रमाण वाढते. मा.महापौर साहेब, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाने दिलेल्या मानांकानुसार पाण्यामधील पीएच हे ६.५ ते ९ पर्यंत असणे अपेक्षीत आहे. पीएचचे प्रमाण कमी किंवा अधिक असल्यास गोगलगाय, बेडूक, मासे व जलचराना धोकादायक ठरतं म्हणून पीएचच प्रमाण हे योग्य प्रमाणात राखल गेलं पाहिजे. यात अक्षम्य अशी चुक महानगरपालिकेकडून वारंवार घडते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डीओ म्हणजे पाण्यात विरघळलेला प्राणवायू खरतर या या प्राणवायूच पाण्यातील प्रमाण कमी झालतर वनस्पती, जिवाणू यांना जगणे कठीण होते आणि म्हणून पाण्यातील डीओ सुध्दा आपण बघायला पाहिजे. बीओडी म्हणजे जैवीक प्राणवायूची मागणी. बॅक्टेरीया हा सुक्ष्म जीव सेंद्रीय व जैवीक ऑरगेनीक विघटनास कारणीभूत ठरतं. यामध्ये पालापाचोळा, गवत, मैला अन्य इ.सेंद्रीय बाबीचे विघटन पाण्यातील जिवाणूमुळे होतं परंतु हेच बीओटी जर पाण्यातील कमी झालेतर त्यामध्ये पाण्यातील नायट्रेट फॉस्फरसच्या अधिक प्रमाणामुळे एकपेशीय जलपर्णीची वाढ होते व अशा वनस्पती विघटनासाठी जिवाणू कार्यरत होत असल्याने पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमालीचे कमी होते व जे जलचर आहेत त्यांच्या जिवीतास धोका निर्माण होतो. सीओडी म्हणजे रासायनीक प्राण वायुची मागणी. मा.महापौर साहेब, रासायनीक प्राणवायूची मागणी म्हणजे सीओडी. महाराष्ट्र

प्रदुषण महामंडळाच्या मानांकानुसार पाण्यामधील रासायनीक प्राणवायुची मागणी १५० मि.ग्रॅ.लि. पेक्षा जास्त असता कामा नये. खरंतर मा.महापौर साहेब, ज्या दिवशी आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाचा अहवाल सादर झाला त्याच दिवशी, त्याच्या दुस-या तीस-या दिवशी आम्ही पर्यावरणाचा खोटेपणा हा प्रामुख्याने लक्षात आणुन दिलेला आहे. खोटेपणा लक्षात आणून दिला म्हणजे फार मोठे काम केले असे अजीबात नाही. सुधारणा व्हावी एवढीच अपेक्षा आहे आणि त्या सुधारणाकडे आपला अजीबात कल नाही. याठिकाणी मा.महापौर साहेब, मला कुठल्याही वृत्तपत्राला मोठ करायच म्हणून मी नाव घेत नाही. सकाळ पेपरमध्ये असे सलग त्याबद्दलचे विश्लेषण येत होते. महानगरपालिकेचे पर्यावरणाकडे किती दुर्लक्ष आहे. पाणी कसं पिण्यास अयोग्य झालेल आहे. मा.महापौर साहेब, आपल्या शेजारी देहू-आळंदीमध्ये भावीक आले की नदीमधील ओंजळभर पाणी घेवून ते तिर्थ म्हणून प्राशन करतात आणि इतक घाणेरड पाणी, इतक रासायन मिसळलेल पाणीजर त्यांनी पिलंतर त्यांच्या जिवीतास धोका निर्माण होवू शकतो. त्याचे वेगवेगळे परिणाम आपल्याला बघायला मिळतात. या शहरामध्ये खरंतर बाहेरच्या कुठल्याही संस्था किंवा नागरीकांना यामध्ये आपण सामिल करुन घेत नाहीत. कुलकर्णी साहेब आपण “हाम करेसो कायदा” करतात आणि म्हणून माझ असं स्पष्ट मत आहे की आपला हा जो पर्यावरणाचा अहवाल आहे तो फसवा आहे याचा पहीला मी निषेध करते. मार्च पर्यंत दुसरा पर्यावरण अहवाल येईल. शासनाकडे पाठवायला सुध्दा खुप उशिर झालेला आहे. परंतु आपण उशिरा का होईना निर्णय घेतला त्यामुळे मी आपली मनापासून आभारी आहे. सरासरी थेरगाव स्मशानभूमि जवळील नाला नदीत मिसळल्यानंतर त्याचा बीओडी ३६. झालेला आहे. जो ख-या अर्थाने साडेसात पाहिजे तो ३६ झालेला आहे. म्हणजे किती ठिकाणच त्या पाण्यामध्ये रसायन मिसळून त्यामध्ये पीएच राहीलेलाच नाही. त्याचबरोबर एम.एम.पॉलटेक्निक कॉलेज जवळील नाला जो आहे त्यामध्ये सुध्दा ३६.७ पीएच झालेला आहे तो सरासरी ८.२ पाहिजे होता. मा.महापौर साहेब, ही छोटी छोटी उदाहरण यासाठी सांगायचे आहे की खरंतर विषय आल्याबरोबर त्याच्यावर चर्चा करायला खुप मजा वाटली असती पण गेल्या पाच ते सहा महिने हा विषय तहकूब ठेवल्यामुळे आणि शेवटच्या टप्प्यामध्ये असल्यामुळे विषयाची हवा काढायची थंड करुन खावं असं आपल धोरण याठिकाणी पण आणलेले आहे. मा.महापौर साहेब, आपल्या पर्यावरण अहवालामधील फोटो आणि आम्ही काढलेले फोटो यामध्ये का तफावत आहे हे मला माहित नाही. आपल्याकडील फोटो एकदम चकचकीत, छान, स्वच्छ असे दाखवतात. आमच्याकडे मात्र एवढा कचरा, अजूबाजूला वाढलेली जलपर्णी यात हे सगळ आहे. महापालिकेला केवळ चांगले चित्र दाखवणे व ते लोकांच्या पुढ आणणे हा एक उद्देश असल्यामुळे आपल्याला चकचकीत असे फोटो मिळालेले आहेत. मा.आयुक्त साहेब आपल्याकड सुध्दा आमच पुस्तक आहे. याठिकाणी झुलेलाल घाट पिंपरीमध्ये आहे. त्याठिकाणी खाली

कचरा किती आहे, घाण किती आहे, चिखल आहे आणि त्या घाटावर लोक पाणी पितात. कारण नदीला आपण आई म्हणतो आणि त्या आईची अशी दुरावस्था आपल्याकडून होत असेलतर शंभर टक्के त्याठिकाणी आपण लक्ष घालणं गरजेच आहे. एक स्वतंत्र विभाग याठिकाणी आपण पर्यावरणाचा केलेला आहे. यावेळेस तरतूद किती असेल हे मला माहिती नाही परंतु आपण मागच्यावेळेस चांगली घसघशीत तरतूद त्यासाठी केलेली होती आणि ती तरतूद केलेली असल्या नंतर सुध्दा आपण त्याठिकाणी काम करु शकत नाहीत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण सगळीकडचे पुरावे आणि पाण्याचे घटक तपासले तर आपल्या असं लक्षात येईल की आपल्या अधिका-यांनी आपल्या डोळयामध्ये चक्क धुळफेक केलेली आहे. हानी झालेला पर्यावरणाचा अहवाल, भकास केलेल शहराच पर्यावरण त्याचबरोबर इतर पेपरनी केलेल विश्लेषण याच्याकडे तुम्ही बघणार का नाही. मा.महापौर साहेब, याठिकाणी माझी विनंती राहील की जसे पाण्यातील घटक आपण तपासायला पाहिजे होते तसे हवेतील घटक तपासायचे आहेत, धुलीकण तपासायचे आहेत. या सर्व गोष्टी आपण फक्त पेपरवरती करतो पण प्रॅक्टीकली करत नाहीत. येथे हॉर्न वाजवण्यास मनाई आहे, त्याचा नागरीकांवर काय परिणाम झालेला आहे, याचे आपण कुठे काही पाहणार आहोत की नाही. आणखीन बोर्ड सुध्दा त्याठिकाणी नाही. बोर्डावर आपण ३० ते ३५ लाख खर्च केले आणि ते बोर्ड पण नाहीत. मा.महापौर साहेब, याठिकाणी खरंतर मला घनकचरा व्यवस्थापनावरती जास्त बोलायला आवडेल. प्लॅस्टीकवर गेली अनेक वर्षे आम्ही बोलतो. प्लॅस्टीकवर महापालिकेनी बंदी आणली, ७ एमएमच्या वरती असेलतरच तुम्ही वापरायच, हे फक्त कागदोपत्री करतो. तुम्ही स्पॉटला जवुन आतापर्यंत किती दुकानदारानां नोटीस दिलेल्या आहेत, किती लोकांना आपण दंड केलेला आहे याच आपल्याकडे काय गणीत आहे ते आपण मांडत नाहीत. डॉ.नागकुमार साहेब असताना मला चांगल आठवत संपुर्ण पिंपरी मार्केटमध्ये दहशत केली होती त्यांनी प्लॅस्टीक बंदी करताना प्रॅक्टीकली, स्पॉटला दुसरे कुठले अधिकारी न पाठवता स्वत: जावुन कारवाई करनं, त्याठिकाणची परिस्थिती बघणं आणि त्यावर बंदी आणण हे खुप चांगले काम त्यांनी त्यावेळेस केलेले होते परंतु दुर्दैवाने ते पुढे राहू शकले नाहीत मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये दररोज ७५० मेट्रिक टन कचरा रोज गोळा केला जातो. हा कचरा उचलण्यासाठी वर्षाकाठी तब्बल ३१ कोटी रुपये आपण खर्च करतो. खर्च का करतो, केलाच पाहिजेनां, एवढे मोठे शहर आहे खर्च केलाच पाहिजे. २१०० कोटीचे बजेट जर आपण दरवर्षी करत असुतर ३१ कोटी त्या मानान काहीच नाही. आम्हीतर म्हणतो सुका आणि ओला कचरा वेगवेगळा करण्यासाठी आणखीन पैसे लागलेतरी खर्च करा परंतु त्यामध्ये खरंच विलगीकरण होते का हे सुध्दा बघा मा.महापौर साहेब, बरेच वॉर्ड आपण कुंडीविरहीत केलेले आहेत. कुंडीविरहीत केले पण आपली घंटागाडी वेळेवर येत नाही. पर्यायाने नागरीक काय करतात

कचरा प्लास्टीकच्या पिशवीत भरतात आणि पुर्वी कुंडी ज्या ठिकाणी होती त्या ठिकाणी ठेवतात. मग आपली गाडी आकरा वाजता येते. त्याच्यानंतर तो ठेवलेला कचरा बाजुला तसाच ठेवतो आणि मग त्याठिकाणी मोकाट जनावर असतील, कुत्री असतील ते सगळीकडे कचरा पसरवतात. आपण इतका खर्च करुन सुध्दा लोकांना रिझल्ट देवू शकत नाहीत. मा.महापौर साहेब, कच-याचे वर्गीकरण करण्यासाठी ओला कचरा आणि सुका कचरा आपण खुप सिरीअसली घेतलं. आतातर प्रशासनान मान्य केल आहे. ७ कोटी रुपये आपण डस्टबीनवर खर्च केले त्याचे पुढे काय झाले. आजही त्याठिकाणी कचरा हा एकत्रीतच जातो. कच-याचे वर्गीकरण किंवा सुका, ओला कचरा वेगवेगळा केलाच जात नाही. जणवानी संस्थेचा नुकताच स्टॅण्डीगला एक विषय केला आहे. आमच असं मत आहे की एखादया गोष्टीवर तुम्ही कागदोपत्री फिरवता, याला किती खर्च करावा याला सुध्दा मर्यादा पाहिजेनां. जणवानीचा ४५ लाखाचा विषय होता, कशासाठी तर, पत्रक छापायचे, बॅनर छापायचे आणि ते वॉर्डात लावायचे मग त्यासाठी ४५ लाख खर्च अपेक्षीत नाही. एकीकडे आमच्या वॉर्डामध्ये तुम्ही निधी कमी केला, प्रभागाला निधी कमी केला आणि दुसरीकडे मात्र तुमची उधळपट्टी चालूच आहे. माझ्याच वॉर्डामध्ये बालाजीनगरमध्ये ७५ शौचालय संस्थेनी बांधुन तयार केलेले आहेत. संपुर्ण मटेरीअल त्यांनी दिलं बांधुन ते तयार झाले. रोज उठून ते दार वाजवतात, बांधलनां, बांधलना, बांधलना. आपण चार लोकांना त्याठिकाणी दिलं त्यातील तीन लोकांनी तुम्हांला सांगीतल पैसे काय खर्च करायचे ते करा. मग आपले अधिकारी पगार घेतातत्तर त्यांच्याकडून काम पण योग्य करुन घेता आल पाहिजेनां. आपण त्याच्याकडे काहीच बघत नाहीत. पैसे दिले सोडून दिलं. परंतु एखादी संस्था शंभर टक्के काम करुन घेते त्याचे सुध्दा कौतूक झाले पाहिजे जनवाणी संस्थेला आम्ही तुमच्याकडे तसं पत्र दिलं. त्यांना ॲक्टीव्हीटीज करु दयानां. शंभर टक्के त्यांनी कंपन्याकडून अनुदान घ्याव आणि कराव. आमच काहीही म्हणणं नाही. परंतु त्यामध्ये तुम्ही काय करता आज एक वॉर्ड करायला सांगीतला त्यांनी करुन दाखवला की तुम्ही परत त्यांना ४५ लाखाची ऑर्डर देणार. मा.महापौर साहेब, मी ठामपणे त्या विषयाला विरोध करेल. कचरा विलणीकरणाचा जो विषय आहे तो आजचा उदयाचा एका दिवसाचा बॅनरचा आणि पत्रकाचा विषय नाही जी माणसाची माणसीकता आहे ती मानसीकता बदलवण्यासाठी आपले जे आरोग्याधिकारी असतील, आपले घंटागाडीवाले असतील त्यांनी सुध्दा कचरा स्विकारला नाही पाहिजे. कचरा अलग अलग करुन घेवून स्विकारला पाहिजे. वॉर्डातला कचरा आणतात, तुमचे डस्टबीन त्याठिकाणी आहेत त्याच्यामध्ये सुध्दा वेगवेगळा कचरा नाही. सुका, ओला कचरा एकाच ठिकाणी टाकतो त्याचे अलगीकरण कधी करणार आहेत. मुळातच ज्याठिकाणाहून तुम्ही उचलता तिथूनच जर का तुम्ही त्याठिकाणी वेगळी व्यवस्था केलीतर निश्चितपणे त्यामध्ये सुधारणा होवू शकते किमान चांगल्या सोसायटयामध्ये ते स्विकारतील सुध्दा. मध्यंतरी कागद, काच, पत्रा वेचणा-या संघटनांनी काळेवाडीमध्ये एका सोसायटीचा कचरा उचलायला मनाई

केली, का कचरा घेत नव्हते त्या सोसायटीचा तर त्यांनी स्पष्टपणे सांगीतले, घंटागाडीवाल्या महिलांनी सांगीतले तुम्हांला दोन डस्टबीन दिलेले आहे. सुका आणि ओला कचरा आम्हांला वेगवेगळा दयायचा आहे, असा आम्ही एकत्रीतपणे घेणार नाहीत. त्या कचरा गोळा करणा-या, झाडू मारणा-या, काम करणा-या त्या महिला आहेत, त्यांच शिक्षण किती झालेल आहेहो. त्यांचे पगार सुध्दा ठेकेदार वेळेवर करत नाहीत. मग त्यांना तो शहाणपणा येत असेलतर त्यासाठी वेगळी संस्था नेमण्याची काय गरज आहे त्याच लोकांना नेमणुक दया, त्यांना प्रशिक्षण दया ते चांगल्या प्रकारचे काम करतील. शाळेच्या विदयार्थ्याना तुम्ही सांगावे, तुमच्या आई-वडलांना सांगावे की रस्त्यावर कचरा टाकायचा नाही, ओला कचरा, सुका कचरा वेगळा करा असे लहान मुलांना जर तुम्ही सांगीतलतर ते मुलं घरी जावुन सांगतील तशा पध्दती खुप आहेत पण आपण काय करतो आपल्याला खर्चाचे विषय खूप आवडतात आणि म्हणून जास्तीत जास्त खर्चाकडे लक्ष असते. मोशी कचरा डेपो येथे २५ मेट्रिक टन प्रतीदीन क्षमतेचा कच-या पासून इंधन निर्मीतीचा प्रकल्प उभा करण्याच काम दि.२९/१/२००७ रोजी करारानुसार बीव्हीजीला दिलेल आहे. आता यात प्लॅस्टीक येतच परत तेच बोलायला आम्हांला लाज वाटते जे पैसे घेतात आणि जे देतात त्यांना काहीच वाटत नाही, त्याठिकाणी बीव्हीजी काय काम करत, खरंच ते कच-यापासून इंधन बनवते का. एक थेंबभर तरी ऑईल त्यांनी काढले का. संजय कुलकर्णी यांनी त्यांच्या स्पष्टीकरणामध्ये सांगाव. किती लाखाचा दर महिना त्यांना दंड मारला होता. ज्या मुळ गोष्टीसाठी, प्रोजेक्ट राबविण्यासाठी त्यांना पैसे दिले होते, त्यांना जागा उपलब्ध करुन दिली होती आणि आजही त्यांना पैसे देतो त्याचा उपयोग लोकांच्याकरीता आहे का? कुलकर्णी साहेब तुम्हांला जर शासनाने स्पष्टीकरण मागीतले असेलतर व बाबा धुमाळ म्हणतात ते या सभागृहाचे सदस्य आहेत ते जर तुमच्यावर आरोप करत असतीलतर निश्चितपणे जबाबदारीने ते आरोप करतातातर आपण त्याकडे सुध्दा लक्ष दिले पाहिजे. मा.महापौर साहेब, कचराडेपोची पाच एक्कर जागा तीस वर्षासाठी आपण त्यांना दिलेली आहे. वार्षीक एक हजार त्यांच्याकडून जमिनीच भाड घेतो. यामध्ये तुम्ही त्याठिकाणी गेलाततर तुमच्या लक्षात येईल प्लॅस्टीकपासून आपण इंधन निर्मीती करत नाहीत प्लॅस्टीकपासून जे बाहेरच्या कंपन्यामधुन ते आणतात, बाहेरच्या राज्यात स्वच्छ प्लॅस्टीक असते त्यामधुन ते इंधननिर्मीती करतात. मा.महापौर साहेब, कचराडेपो याठिकाणी सुका आणि ओला कचरा आहे ७५० मेट्रिक टन दररोजचा कचरा जमा होतो त्यापैकी २७० मेट्रिक टन कचरा कोणतीही प्रक्रीया न करता थेट आपण लॅण्डफिलींग करतो. संजय कुलकर्णीच खरंतर मी चांगल काम केलतर कौतूक पण करेल. लॅण्डफिलींग केल्यानंतर ज्याप्रकारच त्याठिकाणी डिझाईन वापरल, असं वाटत की आपण एखादया गार्डनमध्ये आलोत. लॅण्डफिलींग सुंदर करण्यात आलं आहे परंतु मा.महापौर साहेब, लॅण्डफिलींग करता करता आपल्याकडे जागा अपूरी आहे. मला वाटत दोन वर्षानंतर लॅण्डफिलींगसाठी आपल्याकडे कचराडेपोला जागाच नसणार. लॅण्डफिलींग करताना

तुम्ही जाळी टाकता, तुम्ही पहिल प्लॅस्टींक टाकता त्याच्यावर जाळी टाकता. त्याचे विहीरीमध्ये प्रयोजन पण केलेल आहे परंतु लॅण्डफिलींग करुन कच-याचा प्रश्न मिटणार आहे का. जोपर्यंत त्याठिकाणी ओल्या कच-यापासून खताची निर्मीती होत नाही म्हणजे ज्या वॉर्डाचा कचरा असेल तो त्याच वॉर्डात जर जिरवला गेला नाहीतर दोन-तीन वर्षानी आम्हांला सुध्दा दुसरीकडे जागा शोधावी लागणार आहे. मा.महापौर साहेब, प्रतीदिन २८० मेट्रिक टन कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी दोनवेळा खर्च केला जातो. एकदा मेकॅनिकल कंपोस्टींगसाठी खर्च केला जातो व दुस-यांदा लॅण्डफिलींगसाठी केला जातो कचरा एकच परंतु खर्च दोन. आपल्याला सगळयांना माहिती आहे, आपल्याला त्याठिकाणी त्या कचरा डेपो पासून तोटाच झालेला आहे फायदा झालेला नाही तरी आपण बीव्हीजीला पोसण्याचे काम उघडपणे करतो. का करतो, का नवीन कंपनी करत नाहीत. डेव्हलप किती दिवस करायची. २००७ पासून. आम्हांलाही दहा वर्षे होतील त्यांनाही दहा वर्षे होतील. नवीन तंत्रज्ञान येत असेलतर त्यांला आत्मसात करानां. कच-याचा प्रश्न मिटवला पाहिजे. त्याच्याकडे आपल गांभीर्यान लक्ष असलं पाहिजे परंतु आपण नाही लक्ष देत. मा.महापौर साहेब, पर्यावरण प्रकल्पामध्ये प्लॅस्टीक कच-या पासून निर्मीती प्रकल्पासाठी मनपाने गोळा केलेल्या कच-यातील प्लॅस्टीक वापरले जात नसुन सदर कंपनी ऑईल तयार करते. आतमध्ये हे काय करतात ते तुम्ही बघीतल का. वेगवेगळया भागातील भंगारवाल्या महिला असतातनां त्या प्लास्टीक, कागद, काच वेचतात त्यांचे पाय गुडघ्यापर्यंत आतमध्ये फसलेले आहेत त्या घाणीत प्लॅस्टीक वेचत असतात. ते घाणीतल प्लॅस्टीक परत ते भंगारवाल्याकडे येत, त्याच्याकड जे विकल्या जात ते विकल्या जातं आणि जे नाही विकल्या जात ते परत कचराकुंडीत येतं आणि कचराकुंडीतून परत त्याचा प्रवास मोशी कचराडेपोवर येतो. स्वत:चे पैसे असतेतर, स्वत:चा एखादा घरचा प्रकल्प असतातर अशाप्रकारची उधळपट्टी केली असते का. ही महापालिका जगलीतर आम्ही जगणार आहोत ही भावना अधिका-याच्या मनात का येत नाही. का त्यांना कळवळा वाटत नाही. अशाप्रकारे गोलगोल फिरुन त्याच ठिकाणी जर तुम्ही येणार असालतर थोडतरी मनाला वाटू दयात. मी या संस्थेचा पगार घेतो. लोकांच्या कराच्या पैशातून माझ घर चालतं. त्या खाल्ल्या मिठाला मी जागल पाहिजे. मी नवीन कुठलातरी प्रयोग अवलंबला पाहिजे. तुम्ही काहीच करत नाहीत. तुम्ही येण्याच्या आदिपासून आम्ही त्या कच-यावर असंच बोलणार आणि आजही आम्ही असंच बोलणार. हा पर्यावरण अहवाल पास केला की परत दुसरा पर्यावरण अहवाल मार्च, एप्रिलला येणार. परत तो कट, कॉपी, पेस्ट जसा आहे तसा देणार. तुम्ही असं दाखवणार नाहीत की येथे कचरा साठलेला आहे, येथे पाणी घाण आहे किंवा पाण्यातील पीएच जो मानांक आहे त्यापेक्षा कमी झाला हे सांगणार नाही. मा.महापौर साहेब, मला मान्य आहे की याठिकाणी एमपीसीबी सारखी रिकामटेकडयाची एक संस्था काम करते. महाराष्ट्र गव्हर्मेंटची ती संस्था आहे. त्यांना फक्त

एकच माहिती आहे की कुठल्या बिल्डर्सचा मोठा प्रकल्प येतो. त्यांना नागरीकांशी काही घेणे देणे नाही. ते बघणार मोठमोठया प्रकल्पामध्ये एसटीपी चालू आहे की नाही. एसटीपी चालू नसेलतर त्याना दंड करायचा का नाही. मा.महापौर साहेब, आपण दरवर्षी त्या एसटीपीच्या देखभाल दुरुस्तीवर साडेपाच ते सहा लाख रुपये खर्च करतो त्यातले किती एसटीपी पाण्यावरती प्रक्रिया करुन नदी मध्ये सोडतो. चिंचवडचा तो एसटीपी आहे त्यामध्ये घाण पाण्यावर प्रक्रिया करुन परत ते नाल्यात सोडतो. त्या नाल्यामध्ये सगळया गावभरच पाणी आलेल असतं. कशाला आपण खर्च करतो. तुम्ही डायरेक्ट सोडानां, काय फरक पडतो. काय फरक पडतो यासाठी शब्द वापरला खरंच आपल्याला पुढच्या लोकांची काळजी असतीतर आपण तसं केल असत का? जितक जास्त नदीचे प्रदुषण रोखता आले असते तितका रोखण्याचा आपण प्रयत्न केला असता. परंतु आपण तस करत नाहीत. प्रक्रिया केलेले पाणी आणि घाण पाणी दोन्ही एकाच नाल्यातून तुम्ही सोडता आणि परत तुम्ही म्हणता की पर्यावरण अहवाल आम्ही स्विकारावा, नाही स्विकारणार. तुम्ही तो पासही कराल परंतु दुर्दैवाने म्हणा की अजून काही पण म्हणा. काही लोक पर्यावरण संदर्भात काम करणारे आहेत की ज्यांना कळकळ वाटते. आज इंद्रायणी नदीचे, मुळा नदीचे काय केल आपण. मा.महापौर साहेब आपण नदीवर गेलात आणि पायात जोडवे असतीलतर पाच मिनीटात बाहेर आलातर ते पुर्ण काळे पडलेले असतील आणि तरी पर्यावरण अहवाल आपण बेशरमपणे छापतो, बेशरमपणे छापतो. मा.महापौर साहेब, मोशीच्या कचरा डेपोच्या आजुबाजूचा परिसर हा शेतीयोग्य सुध्दा ते पाणी राहीलेले नाही असा एमपीसीबीचा रिपोर्ट आहे. पिण्याचतर सोडा, शेतीयोग्य सुध्दा राहीलेल नाही. जमिनीमध्ये एखादा कचरा टाकु दे बीज पेरा काही होओ पाणी टाकलेतर जमिनीचा गुणधर्म ते सर्व शोषून घेते. आणि ईथं खोद, खोद, खोद किती खोदणार आहेत. बोअरींगची त्या भागातील काय परिस्थिती आहे. सगळी भांडी काळी पडतात, नख काळी होतात, दागीने काळी पडतात. तरीही आपल्याला असं वाटत की आपण पर्यावरणाच रक्षण करतो. मा.महापौर साहेब, आता आपलं शहर हिंजवडीला लागून आहे. ई-वेस्ट सर्वात जास्त जमा होणारा भाग जो आहे तो हिंजवडी आहे. ई-वेस्टच आपण काय केल, काहीही आपण करत नाहीत. ज्या दिवशी पर्यावरण दिवस असतो त्यादिवशी आपली एक व्हॅन ई-वेस्ट कचरा गोळा करायला फिरते. ई-वेस्ट म्हणजे मोबाईल व जे काही वापरण्यायोग्य नसेल ते सर्व त्यांना दयायचे परंतु मा.महापौर साहेब, खरतर याचे व्यवस्थापन आणि हाताळणी योग्यप्रकारे केली जात नाही. यामध्ये पेन्सिल असतात, बॅट-या असतात असं खुप काहीकाही असतं आणि त्यामध्ये असणारे जे रासायनीक घटक आहेत ते शरीराला अत्यंत हानीकारक आहेत आणि त्यामुळे माणसाच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होवू शकतो याची जाण असताना सुध्दा आपण आपली जबाबदारी नाकारतो. पिंपरी चिंचवड शहरामध्ये एक छोटीशी संस्था आहे की जी ई-वेस्ट गोळा करते तुमच्याकडून काही पैसे घेत नाहीत मग अशा संस्थेला तुम्ही का जवळ करत नाहीत. त्यांना बोलवा, त्यांना

काम दया व त्यांना सांगा की जे तुम्ही ई-वेस्ट गोळा कराल ते आम्हांला दया. मा.महापौर साहेब, हा पर्यावरण अहवाल आपण सभागृहामध्ये मंजूर करणार आहात. मंजुर करताना विरोधाला विरोध म्हणून नाहीतर खरच डोळसपणे या शहराकडे बघण्याची आपल्याला अत्यंत आवश्यकता आहे. या शहरामध्ये धुळीमध्ये असलेले प्रदुषण आम्ही रस्त्यावरुन जातो, श्वासोश्वास घेतो ज्याप्रकारचे त्याठिकाणी धुलीकण आहेत त्यामुळे होणारे श्वासनाचे त्रास आहेत त्याकडे आपण लक्ष दया. बीआरटी आणली म्हणजे आमचे काही रस्ते कमी होणार नाहीत. आम्हांला सुध्दा त्या रस्त्यावरुन फिरायच आहे. तरी आपण जेवढया सुखसुविधा आणता त्यापेक्षा महत्वाच आहे की आम्हांला प्रॉमीस केलेल्या ज्या सुविधा आहेत त्याकडे आपण जास्तीत जास्त लक्ष दयावे. मा.महापौर साहेब, आशा करते की आपण पुढच्यावेळेस निश्चितपणे रिएॅलीटी बघुन चांगला पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी सांगावे, धन्यवाद.

**मा.नारायण बहिरवाडे -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. स्थानिक स्वराज्य संस्थेवरती दरवर्षी ३१ जुलै पुर्वी पर्यावरण सदयस्थिती अहवाल सादर करायचे बंधन आहे. हा जानेवारी महिना आहे म्हणजे जवळ जवळ पाच ते सहा महिने हा विषय याठिकाणी तहकूब राहिलेला आहे. सिमाताईने सांगीतलेले आहे त्यामुळे या विषयावरती काही मजा राहीलेली नाही कारण ही कार्योत्तर मान्यता असायला हवी असं याठिकाणी मला वाटतं. हा अहवाल सादर करण्यासाठी मला वाटतं महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाच्या DPSIR नुसार वापर करणे असं आपल्यावरती बंधनकारक नाही. पर्यावरण सद्यस्थिती अहवालाबद्दल पुस्तक आपण बघीतलेतर माझ्यासारख्या सामान्य बुध्दी असलेल्या माणसाना एकदा वाचलतर समजत नाही. मी संजय कुलकर्णी यांना विचारल की सद्स्थिती अहवाल जो दरवर्षी आपण प्रकाशीत का करतो ते नेमक काय आहे तर त्यांनी मला फार मार्मीक उत्तर दिलेले आहे. ते मला म्हणाले की समजा आपल आरोग्य बिघडल आणि आपण डॉक्टराकडे गेलो की डॉक्टर आपल्याला वेगवेगळया तपासण्या करायला सांगतात, मग ती ईसीजी असेल, सोनोग्राफी असेल, रक्त, लघवी तपासणी असेल. हे सगळया तपासण्या केल्यानंतर जो काही रिपोर्ट येतो तो रिपोर्ट म्हणजे आपला पर्यावरण सद्स्थिती अहवाल आहे. शहराची आजची जी परिस्थिती या पुस्तकामध्ये दिलेली आहे ही सेम तशीच आहे. पण मला संजय कुलकर्णी साहेबाना विचारायचे आहे या सगळया मानवाच्या तपासण्या झाल्याच्या नंतर डॉक्टर त्यांना औषध देतो, प्रिस्क्रीप्शन देतो, वेळप्रसंगी औषधाने बरा होणारा रोग नसेलतर ऑपरेशन देखील करतो. सद्स्थिती अहवाल तुम्ही अनेक वर्षे याठिकाणी मांडत आलेला आहात त्याच्यावर उपाययोजना सुध्दा काही ठिकाणी केलेल्या आहेत, जनजागृती केलेली आहे. तरी पण दरवर्षी प्रदुषण जे आहे ते १० ते २० टक्क्यांनी का वाढत, ते काही कमी होत नाही दरवर्षी १० ते २० टक्क्यांनी याठिकाणी वाढत जातं. प्रामुख्याने जलप्रदुषण, वायुप्रदुषण, घनकचरा व्यावस्थापन आणि

प्लॅस्टिक यामुळे खरतर पर्यावरणाचा -हास होतो. जलप्रदुषण बाबतीत आपण बघीतलतर ते पाणी प्रदुषणाचे हे प्रमुख कारण असू शकते. साहेब, आपण फार भाग्यवान आहात. आपल्या शहरातून तीन नदया वाहतात. त्याच्यामध्ये पवनानदी किवळे ते दापोडी २४ कि.मी. वाहते, इंद्रायणीनदी १६ कि.मी. वाहते आणि मुळा नदी वाकड ते दापोडी जवळ जवळ साडेतीन कि.मी. वाहते आहे. वास्तविक पाहता आपण जर बघीतलतर मी मगाशी म्हणालो की आपण फार भाग्यवान आहात या पिंपरी चिचवड शहराच जे औदयोगिकीकरण झालं ते ६१७७ कारखाने या शहरात आले त्याला केवळ ही पवनामाई कारणीभूत आहे. कारण पवनामाईला पाणी असल्यामुळे, पाण्याची सुबत्ता असल्यामुळे ख-या अर्थाने पिंपरी चिंचवड शहर हे औदयोगिक शहर म्हणून ओळखल गेलं. नंतरच्या काळामध्ये या नदया स्वच्छ आहेत का? या नदयाच प्रदुषण कमी होतय का? याचा सुध्दा विचार आपण करायला पाहिजे. जशा तीन नदया या शहरातून वाहतात तसे त्याचबरोबर या शहरामध्ये काही नाले देखील वाहतात. जवळ जवळ मला वाटत २८ ते २९ नाले या शहरामधुन वाहत आहेत. हे नाले पावसाळया मध्ये पाऊसाच पाणी नदीपर्यंत नेण्याच काम ख-या अर्थाने करत असतात. पण इतर कंपन्यामधुन येणार जे घाण पाणी असतं जे दुषीत पाणी असत किंवा नागरीकांच जे सांडपणी असतं हे सांडपाणी किंवा केमीकल असेल हे पाणी त्या नाल्याव्दारे डायरेक्ट नदीला जातं. त्यामुळे पवना नदीचा प्रश्न ऐरणीवरती आलेला आहे. आजच्या वर्तमानपत्रामध्ये देखील एक बातमी आलेली आहे. “आयुक्त साहेब, पवना स्वच्छतेसाठी स्वत:च्या अधिकाराचा वापर करावा” अशी ही बातमी आजच्या वर्तमानपत्रामध्ये आलेली आहे. नदीचे पाणी काळवंडलेल आहे. इतक पाणी काळवंडलेल आहे की मासे सुध्दा त्याठिकाणी जगू शकत नाहीत. बाकी जलचर प्राणी असतील ते देखील जगू शकत नाहीत एवढया मोठया प्रमाणावर या नदीचे प्रदुषण याठिकाणी झालेले आहे. सुरवातीच्या काळामध्ये पवना नदीचे पात्र हे सरासरी ४५ मी. एवढ होतं. त्याच्यामध्ये इतके भराव टाकले आहेत की त्याची रुंदी आता ३० मी.पर्यंत झालेली आहे याला आपला स्थापत्य विभाग जबाबदार आहे. याच्याकड कोणीच बघीतल नाही. वर्षानुवर्ष या नदीमध्ये भराव टाकण्याच काम चालू आहे. ४५ मी. रुंदी असलेल क्षेत्र आज ३० मी. पर्यंत गेलेल आहे. याच्याकड कोणीच याठिकाणी ख-या अर्थाने लक्ष दिलेल नाही. दुषीत पाण्यामुळे मोठया प्रमाणावर जलपर्णी वाढलेली आहे. जलपर्णी वाढल्यामुळे त्याच्यामध्ये मोठया प्रमाणावर डास झाले आणि त्या डासामुळे मोठया प्रमाणावर नागरीकांना आजार होत आहेत. मग ते मलेरीया असेल, डेंगू असेल इत्यादी आजार त्याच्यामुळे मोठया प्रमाणावर होत आहेत. सन २०१४-१५ मध्ये डेंगीचे ५९० रुग्ण या शहरामध्ये आढळलेले आहेत. आपण किती जरी आरोग्यावर खर्च करत असालतर ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. त्यामुळे या दुषित पाण्यामुळे गेस्ट्रो, कावीळ, टायफाईड इत्यादीचे जवळ जवळ २ हजार रुग्ण या शहरामध्ये आढळलेले आहेत. सन २०१२ मध्ये मला वाटते मा. आशिष शर्मा साहेब त्यावेळेला याठिकाणी आयुक्त

होते त्यांनी ७०० कोटी रुपयाचा प्रस्ताव जेएनएनयुआरएम अंतर्गत केंद्रसरकारला पाठवलेला होता पण ते बजेट नसल्यामुळे तो प्रस्ताव आपला मंजूर होवू शकलेला नाही त्यानंतरच्या काळामध्ये आता पर्यावरणमंत्री मा.रामदास कदम साहेब या शहरामध्ये येवून गेले त्यांनी नदी स्वच्छतेसाठी आराखडा बनवा असा आदेश आपल्याला दिलेला होता. मनपाने ३४६ कोटी रुपयाचा आराखडा तयार केलेला आहे आणि तो शासनाकडे पाठविलेला आहे त्यामुळे त्यातून काही मदत मिळते का यासाठीही आपल्याला ख-या अर्थाने प्रयत्न करावे लागणार आहेत. केंद्रीय पर्यावरणमंत्री मा.प्रकाश जावडेकर यांनी जपामधील जायकाजी बरोबर ९०० कोटी रुपयाचा करार करुन मुळा नदी पात्राच्या शुध्दीकरणाच पाऊल उचलेलं आहे जसं केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी पुणे शहरासाठी जपान मधील एका शहराशी ९०० कोटी रुपयाचा करार केलेला आहे तशा पध्दतीचा करार देखील आपल्या शहरातील नदयांसाठी करावा यासाठी देखील ख-या अर्थाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. वायू प्रदुषण ज्याला आपण हवा प्रदुषण देखील म्हणतो शुध्द हवा ही मानवी जीवनाची ख-या अर्थाने गरज आहे. प्रत्येक माणसाला शुध्द हवा ही मिळाली पाहिजे पण प्रामुख्याने आपल्या शहरामध्ये ती मिळती का याच्यासाठी देखील पर्यावरण विभागाने लक्ष देणे अतीशय गरजेचे आहे. यामध्ये शहराचा वाढता विस्तार असेल, वाहनांची वाढती संख्या असेल, शहरामध्ये झालेल्या मोठया प्रमाणावर औदयोगीकीकरण असेल हवेला हे सगळे घटक याठिकाणी कारणीभूत ठरतात. या शहरात ६१७३ लहान मोठे कारखाने आहेत. या कारखान्यामधुन येणारा धुर जो आहे हा सगळा आकाशा मध्ये पसरला जातो. त्याच्यामध्ये अनेक केमीकल कंपन्या आहेत त्याचा देखील वायू या वातावरणामध्ये पसरला जातो. शहरामध्ये वाहनांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. आरटीओच्या ताज्या आकडेवारीवरुन असे दिसून येते की दुचाकी वाहने या शहरामध्ये ८,५४,२८० इतकी आहेत, तीनचाकी वाहने २१,५६३ आहेत, चारचाकी वाहने १,९६,५०० इतकी आहेत आणि ट्रक १४,९५२ इतके आहेत. इतर वाहने ६५,९०० आणि बसेस १४००० आहेत. एवढी वाहने आपल्या शहरात आहेत. ही सगळी वाहने धुर ओकणारी आहेत, विषारी वायू ओकणारी आहेत आणि याचा परिणाम आपल्या शहरावरती होतो. धुळीकरणाचे प्रमाण आपल्या शहरात इतक आहे नां साहेब, तुम्ही एखादा पांढरा शर्ट घालून मोटारसायकल वरुन एक चक्कर मारलीनां तर तो संपुर्ण शर्ट काळा होवून जाईल एवढ हवेमध्ये धुळीकरणाच प्रमाण वाढलेले आहे यासाठी आपण काय उपाययोजना करणार हे देखील याठिकाणी महत्वाचे आहे. शहराचा बराचसा भाग हा औदयोगीकीकरणाने व्यापलेला आहे. त्यातल्या त्यात औदयोगीक सांडपाणी हे विवीध नाल्यामधुन आणि घरगुती सांडपाणी हे देखील विवीध नाल्यामधुन नदीमध्ये मिसळते आणि नदीच्या प्रदुषणात वाढ झालेली आहे. अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम ८० ते ८५ टक्के झालेले आहे. परंतु तरीही ड्रेनेज लिकेजेसचे प्रमाण हे फार मोठया प्रमाणावर आहे. ते लिकेज झाल्याच्यानंतर देखील ड्रेनेजमधील पाणी त्या नदीलाच मिळल जातं. त्याच्यामुळे देखील नदीच प्रदुषण आणखी

वाढत आहे. ध्वनीप्रदुषण मानवी जीवनावर घातक परिणाम करणारे आहे. आवाजाची पातळी ठरावीक मर्यादेपलीकडे गेली म्हणजे ध्वनीचा त्रास होतो त्याला ध्वनीप्रदुषण असे म्हणतात कर्कश् हॉर्न ज्या गाडयामध्ये असतं त्याच प्रमाण फार मोठ या शहरामध्ये आहे. जिथ हॉस्पिटल असेल, शाळा असेल अशा ठिकाणी देखील मोठमोठयाने हॉर्न् वाजविण्याचे प्रकार या शहरामध्ये आहेत. आता मोटारसायकल किंवा आता बुलेट गाडया निघालेल्या आहेत त्यांना सायलन्सर लावतात, पंजाबच सायलन्सर म्हणतात त्याचा इतका मोठा आवाज येतोना की समोरचा माणुस काय बोलतो हे सुध्दा समजत नाही त्यामुळे मोठया प्रमाणावर ध्वनीप्रदुषण होते. उत्सवाच्या वेळी फटाकडे असतील किंवा लग्नांच्या वेळी डीजे आहे. डीजे हा प्रकार गेल्या अनेक वर्षा पासून आहे आता शासनाने त्यावर बंदी घातलेली आहे. पण त्या डीजेचा आवाज इतका मोठा असतो की अक्षरश: कानाचे पडदे फाटतील अशा पध्दतीचा आवाज त्या डीजेचा असतो. त्याला कुठल्याही प्रकारची डेसीबलची मर्यादा नाही अशा भींतीची भींती ते उभारतात आणि गाणी लावतात याला देखील मर्यादा घातली पाहिजे. शहरातून ६५० ते ७०० मेट्रीक टन कचरा संकलीत करणे, वर्गीकरण करणे त्याच व्यवस्थापन करणे आपल्या महापालिकेच्या वतीने होतं. पण ख-या अर्थाने कच-याच्या बाबतीत सांगायचे झालेतर ब-याचशा अंशी कच-यातून मोठया प्रमाणावर प्रदुषण देखील होते. एकतर कचरा वेळेवर उचलला जात नाही मध्यंतरी आमच्या ब प्रभागामध्ये चार चार दिवस कचराच उचलला जात नव्हता. आपण त्यादिवशी मिटींगमध्ये आलेला होतात त्या दिवशी देखील मी हा प्रश्न उपस्थित केला होता. कारण गावडे साहेबांना विचारलतर ते म्हणाले आपल्याकडे गाडया नाहीत. गाडया नाही हे काही कारण नाही पण तो दोन-दोन, तीन-तीन दिवस कचरा त्या कचराकुंडीमध्ये राहतो तो कचरा राहील्याच्यानंतर शहरात भटक्या कुत्र्याला आपल्याकडे काही कमी नाही. ही कुत्री त्याठिकाणी जातात मोकाट गाई, म्हशी आहेत त्याठिकाणी जातात आणि प्लॅस्टीक पिशवीमध्ये शीळ अन्न टाकलेल असेल किंवा बाकीच काही असेलतर लोक ते त्या प्लॅस्टीकमध्ये घालतात आणि त्या कचराकुंडीत टाकतात आणि ती पिशवी तशीचजर त्या गाईच्या पोटात गेली, त्या जनावरच्या पोटात गेलीतर अनेक जनावरे देखील मृत्युमूखी पडलेले आहेत अनेक जनावरांच ऑप्रेशन देखील कराव लागलेल आहे. आपण प्लॅस्टीकच्या बाबतीमध्ये महापालिकेच्या वतीने देखील धोरण ठरविलेलं आहे. ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्याला आपण बंदी केलेली आहे. हे आपण धोरण ठरवलेल आहे, सभागृहामध्ये आपण तो ठराव देखील केलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. अजूनही आपण किराणाच्या दुकानामध्ये, छोटया छोटया दुकानामध्ये आपण गेलोतर ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या देखील या बाजारामध्ये आहेत आणि याचा पुनर्वापर होत नाही. या प्लॅस्टीकचे बाबती मध्ये मी कुठंतरी वाचलेल आहे या प्लॅस्टीकच विघटन होण्यासाठी कमीत कमी ४०० ते ५०० वर्ष लागतात. त्याशिवाय त्या प्लॅस्टीकच विघटनच होत नाही. म्हणजे सध्या एवढया मोठया प्रमाणावर प्लॅस्टीकचा वापर होतो आणि

याच विघटन ४०० ते ५०० वर्षे होत नाहीतर अशा प्लॅस्टीकवर ख-या अर्थाने बंदी आणली पाहिजे. आपण कितीतरी ठराव केले परंतु अजूनही तुम्हांला मार्केटमध्ये त्या पिशव्या दिसतील. पावसाळयामध्ये नदीला जेव्हा पुर येतो व पुर जेव्हा निघून जातो त्यावेळेला त्या झाडाच्या आजु-बाजूला सगळ प्लॅस्टीक लटकलेल असत. मग काय करत आपल पर्यावरण विभाग. तुम्ही पुस्तकामध्ये बरचस काही सांगीतलेले आहे की आम्ही ही उपाययोजना केली, ती उपाययोजना केली परंतु आज देखील पिशव्या मोठया प्रमाणावर या शहरामध्ये दिसतात त्याचा देखील आपल्याला याठिकाणी गांभीर्याने विचार करावा लागेल. सिमाताईने आता सांगीतलेल आहे की अनेक ठिकाणचे पाणी तपासले आहे त्या पाण्यामध्ये कुठल्या प्रकारचे क्षार पाहिजे. हे सगळ त्याच्यामध्ये आलेल आहे. विशेष म्हणजे आपल्या महापालिकेमध्ये ठराव करुन जैवविवीधता समिती आपण स्थापन केलेली आहे. मला वाटते मोरेश्वर भोंडवे त्याचे अध्यक्ष आहेत. त्यांचे ऑफिस संजय कुलकर्णी यांच्या शेजारी आहे ते अतीशय सुंदर आहे. जैवविवीधता समिती या शहरामध्ये स्थापन झालेली आहे मग ती केंद्रसरकारची असो, राज्यसरकारची असो या समितीचे काम देखील आहे या शहराच्या पर्यावरणाचा समतोल राखने. जैवविवीधता म्हणजे नदीमधील मासे असतील, प्राणी असतील किंवा इतर काही जलचर प्राणी असतील या प्राण्यांच रक्षण करणे ख-या अर्थान त्यांच काम आहे. मग शहरामधील झाड असतील पर्यावरणाचा -हास होवू देणार नाही म्हणून अनेक नैसर्गीक घटक असतील या घटकाचा -हास होवु नये आणि पर्यावरणाचा समतोल चांगल्या पध्दतीने राखला जावा हे ख-या अर्थान या समितीच काम आहे. नदी फार महत्वाची आहे त्यानंतर वायु प्रदूषण महत्वाचे आहे यासाठी आपण जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. जेवढे पैसे आपल्याला बजेटमध्ये ठेवता येतील तेवढे पैसे आपण ठेवा आम्ही तुम्हांला मान्यता देवू एवढच याठिकाणी सांगतो

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पर्यावरणचा विषय आलेला आहे. तरी याठिकाणी पिंपरी चिचवड शहर हे बेस्ट सिटी म्हणून ओळखले जाते मोशीच्या भागामध्ये विषय कचराडेपोचा आहे. सर्व भागामध्ये संध्याकाळ झाली की कच-याचा वास येतो, बो-हाडेवाडी, बनकरवस्ती, आदर्शनगरमध्ये याठिकाणी रहिवाशी लोक आहेत. गुंठा अर्धा गुंठा लोकांनी जागा घेतलेल्या आहेत. त्याना त्याठिकाणी रहायचे आहे. त्रासाला कंटाळलेले आहेत. कचरा डेपोवर खुप प्रक्रिया केलेली आहे. आयुक्त साहेब, मला एकच सुचवायच आहे कुलकर्णी साहेब एक महिन्यापुर्वी व्हिजीटला आलेले होते त्याच्यावर त्यांनी काय निर्णय घेतलेला आहे. यापुढेही आपल्या बाहेरच्या देशामध्ये कोणते प्रकल्प आहेत ते याठिकाणी पुढे प्रकल्प राबवावेत. कच-यापासून इंधन निर्मीती काय केलेली आहे तो पुरावा सुध्दा आम्हांला दाखवलेला नाही. मोशी डेपोवर कुत्री सुध्दा आणुन सोडतात. कचरा सुध्दा समाविष्ट करायचा, कुत्री सुध्दा समाविष्ट करायची का. अजून कुठल्या कुठल्या समस्या आम्ही सामावुन घ्यायच्या एवढच मला म्हणायच आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पर्यावरणाचा अहवाल आलेला आहे हा विषय मंजूर करणार आहोत परंतु आताच याच्यावर चर्चा झाली पाहिजे. पर्यावरण हा विषय जनतेशी, लोकांशी, सर्वांशी सर्वांच्या जीवनाशी निगडीत असलेला विषय आहे. जसे अन्न, पाणी, हवा हे जीवनावश्यक वस्तु आहेत तसे स्वच्छ असे पर्यावरण ही एक जीवनावश्यक बाब झालेली आहे. या विषयावर चर्चा करताना दोन सभासद, बहिरवाडे साहेब आणि सावळेताई यांनी अत्यंत अभ्यासपुर्वक त्याच विवेचन त्यांनी केलेल आहे. सामाजीक जाणीव ठेवून सकाळ या वर्तमानपत्राने पर्यावरणा बद्दल एक चांगली डीएनए टेस्ट म्हणून त्यांनी २९ ते ३१ ऑक्टोबर या काळामध्ये सकाळ वर्तमानपत्रातून बराचसा प्रकाशझोत त्यावर टाकलेला आहे. आपण हे काम करत नाही असे नाही, आपण ते करतो. आपल्याकडे महापालिकेचा पर्यावरण विभाग आहे तोही काम करतच आहे. परंतु लोकांनी याबाबतीत लवकरात लवकर जागरुक होणे अत्यंत महत्वाचे आहे. कच-याची विल्हेवाट, हवेचे प्रदुषण, पाण्याचे प्रदुषण आपण कितीही याच्याबद्दल चर्चा करत राहीलोतरी ती करायला, लोक ते वापरतात लोकांच्या चुकीच्या वापरामुळे हे प्रश्न निर्माण होतात आणि म्हणून आपण नागरीकांच्यामध्ये जाणीव निर्माण करणं, याबाबतीमध्ये जनजागृती निर्माण करणं हे फार महत्वाचे आहे आणि म्हणून मी अभिनंदन करते सकाळच की त्यांनी ही सामाजीक जाणीव ठेवून त्यांनी हा प्रकल्प राबविलेला आहे. त्यामध्ये आपल्या महापालिकेच्या पर्यावरण विभागाने अत्यंत सक्रीय असा सहभाग नोंदविलेला आहे. त्यांनी डीएनए टेस्ट म्हणलेले आहे त्यासाठी पाण्याची जी टेस्ट केलेली आहे त्यासाठी महापालिकेनी सहकार्य केलेले आहे. २९ ऑक्टोबर पासून व त्याअगोदरही मला काही सकाळ मधली एक नोंद घ्यावीशी वाटली. पाण्यातील घातक क्षाराच्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे आणि ते घातक पाणी कुठे आहे. कुठून सुरवात होते हे त्यांनी त्यामध्ये दिलेले आहे. त्यांनी पवनेच्या उगमापासून सुरवात केलेली आहे. आणि ते क्षार पवनेच्या उगमाजवळ जे ५० टक्के होते ते पवनेपासून देहूरोडपर्यंत येईपर्यंत १७४ टक्के एवढे झालेले आहेत, पिंपरी चिंचवड परिसरामध्ये नदी येईपर्यंत क्षाराच प्रमाण किंवा प्रदुषणाचे प्रमाण हे एवढे का झाले याचे कारण असे आहे की त्या भागातील लोक त्या नदीचा वापर कसा करतात, किती चुकीच्या पध्दतीने करतात. संपुर्ण मावळ परिसर त्याठिकाणच्या लोकांचा वापर होवून जे पाणी दुषित होते मग त्याच्यामध्ये जनावरे असतील, लोक असतील सगळच असेलतर तो वापर त्याला कारणीभूत आहे. मावळातील ज्या कंपन्या आहेत या कंपन्याचे रसायनमिश्रीत पाणी हे त्यामध्ये येतं आणि त्यामुळे हा रावेतपर्यंत नदीचा भाग येतो त्या पाण्यामुळे इतक प्रदुषीत झालेल आहे. मी म्हणत नाही आपल्याकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत प्रदुषण होतच नाही, होतय. आपल्याकडे परंतु पाणीच नाही आपल्या नदीत म्हणजे आपण प्रवाह पाहिलातर ती एक गटारगंगा झालेली आहे. कारण पाणी धरणामध्ये आहे आपल्याकडे अगदी थोड आहे आणि त्यामुळ प्रदुषण होत नाही असं नाही परंतु जे पाणी

आपण वापरतो, आपण ४२५ एमएलडी पाणी एमआयडीसी आणि पिंपरी चिंचवड महापालिका उचलते त्यातील २१० एमएलडी पाणी आपण एसटीपी प्लॅन्टमध्ये जनरेट करतो आणि उरलेले पाणी २० टक्के च-होली वगैरे भागामध्ये काही ठिकाणी ड्रेनेजलाईन नाही त्याठिकाणी होतही असेल. १०२ एमएलडी पाणी एमआयडीसी उचलते त्याचे काय? आपण चुकतो, आपण चुकतो पण त्या एमआयडीसीच काय? एमआयडीसी कोणाच्या अंडर आहे. हे कारखाने कोणाच्या अंडर आहेत. मग एमआयडीसीच एखाद अस पोल्युशन कंट्रोल बोर्ड वगैरे आहे का? आणि जे पोल्यूशन कंट्रोल बोर्ड आहे ते कार्यरत आहे का? काय काम करत ते. मलातर वाटत त्यांच कामही आपणच करत असू. आपला पर्यावरण विभागच ते काम करत असू आणि त्यामुळे आपल्याही शहरातील एमआयडीसीचे जे रसायनमिश्रीत पाणी जे आहे ते मिळत आणि त्यामुळे आपल्या येथील पाणी जास्त प्रदुषीत होते. आणि म्हणून मला असं वाटत की आपण एखादा ठराव करावा. आणि आपल्याकडे या कारखान्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने काही अधिकार दयावेत नाहीतर सरकारने त्यांच्यावर नियंत्रण ठेवाव. त्यांना उठसुठ आपली महापालिका दिसते आणि आपल्यालाही आपलीच महापालिका दिसते. एमआयडीसीच्या पाण्याचा कधी विचार केला आहे का. त्यांच्या प्रत्येक युनीटला एसटीपी आहे का आणि तस जर असततर मग सकाळमध्ये जे लेख दिलेले आहेत जी डीएनए चाचणी केलेली आहे त्यामध्ये एवढया मोठया प्रमाणावर प्रदुषणास जबाबदार कंपन्याना नोटीस दया. त्यानंतर "उदयोगनगरीत इंद्रायणीचा श्वास गुदमरतोय", "एमआयडीसीतील रसायनमिश्रीत पाणी नदीपात्रात" त्यानंतर "पवना नदी प्रदुषीत करणा-यावर कारवाई". आपल्या सन्मा. मंत्री महोदयानी केलेली घोषणा आणि "पाण्यातील घातक क्षाराच्या प्रमाणात वाढ", "रसायनमिश्रीत पाणी नदीत मिसळल्या जात असल्यामुळे नदीला ओंगळवानी रुप". म्हणजे अशाप्रकारे हे सगळे लेख आपण वाचले असतील. या बातम्या आपण वाचल्या असतील. तरी एमआयडीसी याला खुप मोठया प्रमाणात कारणीभूत आहे अस मी याठिकाणी सांगू इच्छिते. यानंतर आपल्याकडे जे काम चालू आहे ते खुप समाधानकारक आहे असं नाही. हवेच प्रदुषण, लोकांना यासंदर्भात कितीही हॉर्न वाजवू नका म्हणलतर लोक हॉर्न वाजवत जातातच. आताच माझ्या सहकार्यानी सांगीतल की मुलांना जागृतीसाठी मुलं हे खुप चांगले आहेत, मुल आठवी, नववीतले वय म्हणजे अगदी पाचवी पासूनच आतातर खुप हुशार मुल आहेत तरी पाचवीपासूनच जर त्यांना पर्यावरणाच्या बाबतीत आपले लोक याठिकाणी काम करतात त्यातील एक-दोन लोकांमार्फत जर सगळयाच शाळामधुन आपण आपले लेक्चर ठेवले. सकाळचा आणखीन एक उपक्रम आहे की त्यांनी "एक दिवस हात धुण्यासाठी" असा उपक्रम राबविलातर मुलांवर चांगले संस्कार झालेतर मुलांच वय शाळेतील वय हे संस्कारक्षम असतं आणि ते झालेले संस्कार मुल आयुष्यभर विसरत नाहीत. आणि म्हणुन याच वयामध्ये कच-याचा एखादा तुकडा जरी असलातरी तो आपल्या दप्तरामध्ये ठेवा

आणि घरी जावुन तो डस्टबीनमध्ये टाका अशाप्रकारे आपल्याकडून हे व्हाव. सगळ शाळांनी कराव असं नाही. आपण कोटयावधी रुपये खर्च करतो, त्यासाठी एक दोन अधिकारी नेमावेत अस मला वाटत. पाणी प्रदुषीत होते म्हणजे रसायनमिश्रीत असल्यामुळे प्रदुषीत होते. खरं म्हणजे सीमाताई यांनी अभ्यासपुर्ण विवेचन याठिकाणी केलेले आहे खरं म्हणजे त्यांच्या अभ्यासाबद्दल मी त्यांचा आदर करते. फक्त आपल्या महापालिकेकडून काय चुका होतात हे दाखवण्यापेक्षा मी त्यांना विनंती करेल की आपण आपल्याकडे ग्लासामध्ये किती कमी पाणी आहे हे पाहण्यापेक्षा ग्लास किती भरलेला आहे हेही सांगा म्हणजे बरे पडेल. विशेषत: मला शासनाला याठिकाणी सांगायच, माझ्या सहकारी मा.सुलभाताई तुम्ही तुमचे काम केलेले आहे तुम्ही मंत्री महोदयानां आणल आणि आपल्याकडे पोल्युशन होत त्याकडे त्यांच लक्ष वेधलं. आता जे जे सरकारशी संबंधीत सभासद आहेत त्यांनी आता या एमआयडीसीवर काहीतरी कंट्रोल करा. एमआयडीसीला जास्त चपराक कशी देता येईल आणि आपलं पाणी कसं शुध्द राहील याद्दष्टिने आपण प्रयत्न करु यात. मी पुन्हा एकदा सांगते आपण हे वारंवार असं आपल्या पोल्युशन बोर्डाने हे करण्यापेक्षा शासनाने काय करता येईल हे पाहिलेतर बरं होईल. आपल्याकडे जर पवनेमधुन बंद पाईपलाईनने पाणी आल असततर ते पाणी आपल्याला शुध्द मिळाल असत. काही सन्मा. अधिका-यांनी असं सांगीतले की असे तीन दुष्काळ पडले असतेतरी आपल्याला पाणी पुरले असते. लोकांनी मनात आणलेतर ते सुध्दा होईल. पुन्हा एकदा एमआयडीसीच्या पाण्याचे करायचे काय एवढा आपण सर्वानी विचार करुयात आणि जे काही प्रयत्न चालले आहेत ते अधिक वेगाने व्हावावेत असं मला वाटत एवढ सांगून मी थांबते.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर अभ्यासपुर्ण सगळी माहिती याठिकाणी पर्यावरण अधिका-यांनी सांगायचीतर ती आमच्या सदस्यांनी सांगीतलेली आहे. मला वाटत ३० जुन ही तारीख होती शासनाला अहवाल सादर करण्याची. आता ३० जुन गेली जानेवारी महिना आला आहे, मला वाटत या संदर्भात तुम्हांला दंड सुध्दा होणार आहे. नियमामध्ये आणि वेळेमध्ये अहवाल जर सादर झाला नाहीतर दंड होवू शकतो. जीबीला अशा पॉईंटला आणून ठेवता की उदया शासनात गेला नाहीतर त्याची तारीख उलटलीतरी जबाबदार आम्ही नाही, तुम्ही आहात. चाणाक्ष बुध्दीने हा आमच्या समोर तसा आणला गेला, म्हणजे यावर चर्चा होऊ नये. पर्यावरण प्रेमीचे जे दुखणे आहेनां ते या अहवालामध्ये नागरीकांशी चर्चा झाली पाहिजे होती. मा.महापौर साहेब, बाकीच्या महापालिकेत नागरीकांकडून काही विचार घेतात, आपण जसं बजेटला घेतो नागरीकांच्या माध्यमातून तसे काही यामध्ये झाले आहे का. ई-मेल वरुन नाही, सगळेच नागरीक ई-मेल वापरत नाहीत. तुम्ही फक्त औपचारीकता पुर्ण केलेली आहे, ऑनलाईन फक्त सुचना मागवलेल्या आहेत. ऑनलाईन सगळे नागरीक आहेत का, किती टक्के नागरीक ऑनलाईन आहेत. तुम्ही वॉर्डस्तरावरती या चर्चा का घेतलेल्या नाहीत. मा.आयुक्त साहेब तुम्ही चांगल करायला बघतात

परंतु तुमच नियंत्रण त्याच्यावरती नाही, असा एक दुसरा अर्थ त्याचा होतो. आताच मॅडमनी सांगीतल्याप्रमाणे मावळातील केमीकल फॅक्ट-याचे जे रसायनमिश्रीत घाण पाणी आपल्याकडे येते त्याच्यावरती एमपीसीबीने नुसती कागदोपत्री कारवाई केलेली आहे. जस म्हणले की एमपीसीबी खरच नावाला काम करते, त्या एमपीसीबी ऑफीसचीच तक्रार आम्ही मा.मंत्री महोदयांकडे केलेली होती. ते पाणी आपल्याकडे येतं, त्यांची घाण, आपली घाण मिळून ते पाणी खाली उजनीला जातं आणि त्यांना टिबल घाणीला सामोर जाव लागतं तीकडचा रिपोर्ट आहे तो तुम्ही बघीतलेला असेल, तीकडच्या रिपोर्टमध्ये त्यांनी पिंपरी चिंचवडला जबाबदार धरलेले आहे. आपल्या एका चुकीमुळे आपण मागचा पुढचा विचार न करता फक्त स्वत:चाच विचार करतो हे किती चुकीचे आहे. आता सांगीतले की कट, कॉपी, पेस्ट. पर्यावरण अहवालामध्ये मला दुसर एक सुचवायच होतं १५ पान कोरी आहेत त्याच्या पाठिमागे काहीच नाही. पर्यावरण कशाला म्हणायचे, कागद बनवायला झाड तोडावी लागतात तेव्हा कागद बनतो. पेपरलेस काम आयटीमध्ये चाललेले आहेत, सगळीकडे पेपरलेस कामाला अत्यंत महत्व दिलं गेल आहे. तुम्ही काही केलेले आहे का. पेपरलेस तर जाऊ देत परंतु वेस्ट ऑफ पेपर पर्यावरण अहवालामध्येच झालेल आहे. मा.आयुक्त साहेब, अजेन्डयाच्या बाबतीत सांगायच आहे हे पेपरच काम आहे आपलं. अजेन्डा तुम्ही आम्हां सदस्यांना तीनवेळा देता, घरी दोनदा पाठवता. प्रोसिडींगचा मोठा गठ्ठा येतो ते प्रोसिडींग किती लोक वाचतात किंवा नाही वाचत. याच्यापेक्षा ज्यांना पाहिजे ते तुमच्याकडे येवून घेवू शकतात्नां. याठिकाणी दोन प्रोजेक्टर लावलेले आहेत पाच वर्षात ते सभागृह झाल्यापासून कधी उघडलेले नाहीत. तुम्ही सभेच्या दिवशी अजेंडा याच्यावरतीच डिस्प्ले करा. हे कागद वाचतील, पर्यावरणाचा प्रत्येकांनी विचार केला पाहिजे. या छोटया छोटया गोष्टी आहेत. सर्व नगरसेवक काही डिग्रीवाले नाहीत किंवा सगळयांना कळतय असं काही नाही पण अधिकारी तरी नेमलेले आहेत त्यांच्याकडे तरी डिग्री आहे का नाही. त्यांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे की नाही. मा.महापौर साहेब, मध्यंतरी च-होलीला रसायनमिश्रीत पाणी आपल्या कुदळवाडीतल गेलेले होते त्यावेळेला सुध्दा मोठी कारवाई करणे अपेक्षीत होतं. नुसत्या नोटीसा दिल्या. फौजदारी कारवाई करण्याचे अधिकार तुमच्याकडे आहेत का एमपीसीबीकडे आहेत. ते तुमच्यावर ढकलतात तुम्ही त्यांच्यावर ढकलता. आपण अतिक्रमण पोलीसांवरती एवढा खर्च करतो, आपण पगार देतो, त्यांना इमारती देतो, त्यांच्यावर एवढा खर्च करतो सुविधा देतो, अनधिकृत बांधकामावर सध्या कारवाई नाही ते रिकामेच आहेत. आताच मला एक फोन आलेला होता, शिवसेना भवनाच्या शेजारी मासेवाले उघडयावरती बसतात त्या मासेवाल्यांनी सगळी घाण खाली उघडी टाकलेली आहे, फेकून दिलेली आहे त्याचा प्रचंड वास येतो. बसस्टॉपवरती लोकांना उभे राहता येत नाही किंवा शेजारच्या इमारतीमध्ये लोकांना जाता येत नाही. हे जे अन्न विक्री, मांसाहार विक्री

रस्त्यावर चालते याच्या बाबतीत तुमचे काय कंट्रोल आहे. लोक हेच अन्न खातात. तुमचा कचराकुंडी विरहीत वॉर्डाचा कचरा असतो, काही ठिकाणी तुम्ही एखादया वॉर्डमध्ये डम्पींग करता. तुमचा ॲक्ट काय सांगतो, म्युनिसीपल सॉलीड वेस्ट ॲक्ट काय म्हणतो. तुम्ही रिझर्व्ह केल पाहिजे त्याला कंपौड असलं पाहिजे असं कुठतरी नियमात म्हणलेल आहे आहे का तुमच्याकडे तसं काही. तिथल्या अजुबाजूच्या लोकांना किती त्रास होतो. कचरावेचक गोळा करणा-या लोकांचे पोट त्याच्यावर आहे. ते जाता जाता त्या गाडीवरुन कचरा वेचत वेचतच जातात आणि तो कच-यावाला सांडत सांडतच जातो. कचरा गोळा करण्यासाठी चार सिस्टीम आपल्या काम करतात. झाडूवाले वेगळे, कचरा उचलणारे वेगळे, कचरा वाहतूक करणारे वेगळे तीकडे जाऊन कचरा विलीनीकरण करणारे वेगळे. या चार सिस्टीम वापरुन सुध्दा आपण कमी पडतो. मा.आयुक्त साहेब, आम्ही बोलतो म्हणजे आम्हांला काही काम नाही किंवा आम्हांला यातून काही फायदा होतो अशातला विषय नाही. आम्ही विश्वस्त आहोत, प्रत्येक गोष्टीला जबाबदार आहोत तुम्ही या गोष्टीचा सुध्दा बारीक सारीक विचार केला पाहिजे. मा.कुलकर्णी साहेब, पेपरलेस कामासाठी काहीतरी स्वत:च स्किल वापरा. हे वेस्ट तुम्ही छापायच कशाला. याचपण टेंडर, छापायच टेंडर. आता प्रत्येकाकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल आहेत किंवा ईथ येवून मागतील कॉपी. किती पुस्तक रद्दीमध्ये जातात, तुम्ही आजुबाजूचे दुकान तपासा. तुम्ही हे दोन्ही प्रोजेक्टर सुध्दा वापरायला काढा आणि हा जो अजेन्डा आहे तो प्राजेक्टवरती दाखवायला सुरवात करा. म्हणजे निदान त्याचा वापर तरी होईल आणि आम्हांला सुध्दा थोडाफार आनंद होईल की आमच्या काही सूचना तुम्ही लक्षात घेतल्या. आता सांगीतले मा.मंत्री महोदयांच्या मिटींगला आम्ही पण होतो, मंगलाताई होत्या, मा.महापौर होत्या. त्यादिवशी आपली फाईल वेळेत न गेल्यामुळ आपला प्रस्ताव त्यादिवशी जाऊ शकला नव्हता, पुणे महापालिकेचा प्रस्ताव त्यादिवशी सादर झाला होता. आपला प्रस्ताव उशिरा गेला आहे त्यामुळे आपल्याला पैसे मिळण्यासाठी उशिर झाला हे पण तुम्ही कबुल करा सगळ शासनावरती ढकलू नका. आळंदीच्या सी.ओ.वर कारवाई करण्याचे आदेश आलेले आहेत. आळंदीच्या इंद्रायणीमध्ये आपण आपल घाण पाणी सोडतोय त्यांच पाणी दुषीत करतोय. आळंदीकराना पिण्यासाठी पाणी नाही. या सगळयाच गोष्टीला आपण जबाबदार आहोत. मंदाताईनी सांगीतले मोशीच्या कचराडेपोच. पाच एक्कर जागा आपण नाममात्र भाडयाने दिलेली आहे कोणीच बोलत नाही, तेरीभी चुप, मेरीभी चुप. याच्यावरती पण कोणीतरी बोलल पाहिजे. मा.आयुक्त साहेब आपल्याला आवडत नाही मागच्या विषयामध्ये हात घालायला, तो तुमचा स्वभाव नाही. कारण तुम्हांला माहिती आहे की दगड टाकलातर अंगावरती घाण उडणार आहे परंतु काही गोष्टीकडे तुम्ही लक्ष देवून गांभीर्याने बघीतल पाहिजे खरच चुकीच आहेतर ते बंद केल पाहिजे. तुम्ही थोडस स्ट्रीक्ट वागायला शिका. तुम्ही जर स्ट्रीक्ट नाही वागलात तर हे असच चालत राहणार. भरपूर जण त्याचा उलटा फायदा घेतात त्यामुळे सगळया गोष्टीवर त्याचा परिणाम होतो. मा.महापौर

साहेब, ज्या काही नगरसेवकांनी सूचना केलेल्या आहेत त्या सगळया सूचनांची अंमलबजावणी करावी आणि नागरीकांकडून तुम्ही डायरेक्ट हरकती / सूचना घेतल्या नाहीत याबद्दल मी पर्यावरण खात्याचा जाहीर निषेध करते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी. आज आपण पर्यावरण अहवाला विषयी सगळेजण चर्चा करतो आहोत. खरच शहराच्या दृष्टिकोनातून आणि चर्चा करण्याच्या दृष्टिकोनातून हा विषय म्हणजे आज पिंपरी चिंचवड नागरीकांचा प्रत्येकाचा हा हक्क आहे. सभागृहात लोकांमधुन निवडून आलेले लोक आहेत त्यामुळे ही चर्चा होणं सुध्दा गरजेच आहे आणि या चर्चेतून दुरुस्ती सुध्दा झाली पाहिजे असं मला याप्रसंगी वाटत. मा.महापौर साहेब, काल आपण जर टि.व्ही. बघीतला असेलतर एबीपी माझावर इज्राईल मधील तेल अविव या शहराची एक स्टोरी दाखवत होते. आता माझे सहकारी ब-याच विषयावर बोलले आहेत तेच बोलून रिपीट करुन मी सभागृहाचा वेळ वाया घालवणार नाही म्हणून मला जे मुद्दे बोलायचे आहेत तेच मी बोलणार आहे. ट्रिट केलेले पाणी जे आपण नदीमध्ये सोडतो, नाल्यामध्ये सोडतो किंवा आपल्या टाक्या वॉशआऊट करतो ते सगळे आपण ड्रेनेजला किंवा स्ट्रॉर्म वॉटरची लाईन आहे त्याच्यातून आपण पाणी सोडतो. आपल्या शहरामध्ये ट्रिट केलेले वॉटर हे आपले संपुर्ण शहरातील गार्डन, तुम्ही दुर्गादेवी टेकडीला गेलातर त्याठिकाणी काही भाग इतका रखरखीत दिसतो त्या टेकडीला तुम्ही हे पाणी सोडून दया कमीत कमी झाडालातरी ते जाईल. त्याच्यावर जरी खर्च झालातरी काहीच हरकत नाही. पण ते ट्रिट केलेले वॉटर ते व्यवस्थीत ट्रिट केलेल आहे का हे बघुन त्याच्यासाठी जिथं आपल्याला टाक्या बांधाव्या लागतील त्या सुध्दा बांधण गरजेच आहे त्याच्यावर खर्च झालातरी चालेल परंतु येथून पुढे आपल ट्रिट केलेल वॉटर कुठेही सोडून देऊ नका. कारण आजची परस्थिती, यंदाची परिस्थिती अशी आहे की यंदाच वर्षे कसेबसे आपण पावसाळयापर्यंत पाण्यासाठी पोहचणार आहोत. पण दरवर्षी निसर्गाची अशी मेहरबानी आपल्यावर होईल असं सांगू शकत नाही. पुढच्या पावसाळयात जर पाऊस खुप चांगला पडला नाहीतर आपली परिस्थिती पुण्यासारखी सुध्दा होऊ शकते. आज पुण्याला दिवसाआड पाणी आहे काही दिवसानी दोन दिवसाने एकदा पाणी सोडण्याच त्यांच नियोजन चालू आहे. पिंपरी चिंचवड शहरात बाहेरुन येणारे लोंढे खुप वाढलेले आहेत कारण पिंपरी चिंचवड मध्ये पाणी खुप चांगले आहे म्हणून पिंपरी चिंचवडमध्ये जास्तीत जास्त लोक येण्याची तयारी आहे आणि ज्या भागामध्ये पाऊस नाही तीकडचे मग ते मराठवाडयातील असतील, पश्चिम महाराष्ट्रातील असतील सगळीकडून काम करण्यासाठी जे लोक येणार आहेत ते याठिकाणी पाणी चांगले असल्यामुळे आहेत. म्हणून आपल्याला हा प्रोजेक्ट राबवायला काही अडचण आहे का. उदाहरणार्थ माझ्या वॉर्डात मी करुन घेतले आहे. ट्रिट केलेले वॉटर हे आम्हांला सोसायटीला पण दया. आज आपण पाणी जर देवू शकलो नाहीत लोक गाडी धुण्यासाठी पाणी वापरतात, पार्कींग धुण्यासाठी पाणी वापरतात, जिने धुण्यासाठी

पाणी वापरतात, झाडाला तेच पाणी वापरतात असा जर आपण शहरामध्ये ट्रिट केलेल्या पाण्याचा जर वापर केलातर नक्कीच आपलं पिण्याच पाणी आपण खुप चांगल्या पध्दतीने वाचवू शकतो. आपण चांगल ट्रिट करुन पाणी नदीला सोडत नाही अशा तक्रारी सुध्दा आलेल्या आहेत यामुळे त्या सुध्दा तक्रारी येथून पुढे थांबतील ज्यावेळेला एमआयडीसीमधील कंपन्या बरोबर सापडतील आपण पाणी एक थेंबभर सोडत नाहीत तर हे पाणी जात कुठून. आज कितीतरी गार्डनला पिण्याच पाणी वापरल जात. तुम्ही सर्व्हे करायला सांगा. अख्या शहरात ट्रिट केलेल्या पाण्याच्या लाईन टाका, त्याच्यावर खर्च झालातरी चालेल अख्ख्या शहरभर ही लाईन फिरवली पाहिजे. ही जर लाईन फिरलीतर अख्ख्या शहरामध्ये जेवढे गार्डन आहेत, जेवढी बांधकाम आहेत, या बांधकामाना सुध्दा तुम्ही हे पाणी देवू शकता सर्व गार्डनला पाणी देवू शकता. लोकांना वेस्ट वॉटर वापरायचे असेलतर त्यासाठी तुम्ही तेथे टँकर ठेवा त्याचा वापर सुध्दा ते करु शकतात. मध्ये ब-याचशा कंपन्याचा प्रस्ताव होता परंतु आपल्या ट्रिट केलेल्या पाण्याचा रेट जास्तीचा असतो म्हणून ते लोक म्हणतात की आमच्याकडे स्वत:चच पाणी आहे म्हणून ही लोक पाणी घ्यायला किंवा दुबार पाण्याचा वापर करायला कुठेही तयार नाहीत. परंतु सगळया बाहेरच्या देशामध्ये ट्रिट केलेले वॉटर पिलं जात, वापरल जात खुप ठिकाणी बाहेर सुध्दा पाणी मिळण मुश्किल आहे. आपल्याकडेही तीच परिस्थिती आहे. बाहेरही तीच परिस्थिती आहे. म्हणून आपल जे ट्रिट केलेल पाणी आहे ते १०० टक्के शहरासाठीच वापरले पाहिजे. प्लॅस्टीकचा जो मुद्दा आहे त्याबाबत माझ्या सहकार्यांनी मला सांगीतल आपण कायदा केला पाहिजे. शेवटी ज्यावेळेला आपण वस्तू घेतो त्यावेळेला दुकानदार प्लॅस्टिकच्या पिशवी पाहिजे असेलतर ते पाच रुपये लावतात, मॉलमध्ये गेलातर विचारतात तुम्हांला पिशवी पाहिजे का आणि ते पाच रुपये बीलामध्ये ॲड होतात, असेही पाच रुपये ॲड होणार आहेत तसेही पाच रुपये ॲड होणार आहेत मग त्याच्यापेक्षा प्लॅस्टिक पुर्ण बंदी करा. जोपर्यंत ही सवय लागणार नाही तोपर्यंत शहरामधल प्लॅस्टिक बंद करा. आपण काय म्हणणार आहेत दुकानामध्ये कोण बघायला जात. किती मायक्रॉनच प्लॅस्टीक वापरल जात हे कोणी बघीतल जात नाही. जनवाणी असेल, कंपनी असेल, एक कंपनी आली आणि ती म्हणाली आम्हांला मंगलाताईचा सीएसआरमध्ये वॉर्ड दया, आम्ही त्याठिकाणी झिरो गार्बेजसाठी काम करतो. मी लगेच त्यांना तयारी दर्शविली, माझी तयारी आहे. उदयाच्याला आमच्या वॉर्डात आम्ही सर्व झेंडावंदन तर करणारच परंतु झेंडावंदन झाल्यानंतर परत त्या नागरीकांनी पुढे स्वच्छता अभियानासाठी जॉईन व्हायचे आहे. सगळया सोसायटयांना कळवल की तुम्ही ओला कचरा, सुका कचरा त्याच्यासाठी टिमवर्क तयार झालेल आहे तुम्ही प्रत्येकानी वेगवेगळ कामकाज केल गेल पाहिजे. मग काही जनवाणी मधील लोक येवू देत आमचे नागरीक सहकार्य करायला तयार आहेत. पण त्याच्यासाठी आपल्याला १०० टक्के पिंपरी चिंचवड शहरात प्लॅस्टिक बंदी केली पाहिजे अशी माझी उपसूचना आहे. त्यामुळे रस्त्यावरचा कचरा कमी होईल. सकाळी रोडवरुन गेलोततर

अक्षरश: प्लॅस्टिकच्या पिशव्याचा कचरा सगळीकडे उडत असतो. रिकामे प्लॉट असतील तिथ पण प्लॅस्टीकच आहे. लोक कचरा प्लॅस्टिक पिशवीमध्ये गुंडाळून दुसरीकडे टाकतात आणि त्या प्लॅस्टीकच्या पिशवीमधला कचरा कितीतरी वर्षे विरघळत नाही त्यामुळे आपल्याला सुध्दा ग्लोबल वॉर्निंगसाठी फार मोठया गोष्टीना फेस कराव लागणार आहे आणि अशा दृष्टिकोनातून आपण प्लॅस्टिक पुर्ण बंदी करून पिंपरी चिंचवडच अजून एक पुढच पाऊल उचलू यात त्यासाठी सर्व सहकारी तयार असतील. त्यामुळे जनावर मरतात. मटनवाले काळे प्लॅस्टिक वापरतात ते काळ प्लॅस्टिक खान्याला धोकादायक आहे. त्यातून मटन घरी आणतात, मासे आणतात हे आरोग्याला धोकादायक असणार प्लॅस्टीक आहे. आता सांगीतल की बोपखेल येथे एसटीपी प्लॅन्टच नाही त्यामुळे ते सांडपाणी डायरेक्ट नदीला जाते. याची सुध्दा नोंद घेतली गेली पाहिजे आपल्याकडे कोणकोणत्या भागामध्ये एसटीपी प्लॅन्ट नाही. दरवेळेस आपण बजेटला सांगत असतो नवीन गावे आलेली आहेत त्यांच्याकडे पहिल्यांदा ड्रेनेजलाईन, पाणीपुरवठा, एसटी लाईन टाका ही महत्वाची कामे याच्यासाठी पाच फुटाचा टप्पा रोडवर असला पाहिजे आणि या सगळया लाईन त्याच्यातूनच गेल्या पाहिजेत. सगळया केबललाईन आहेत त्यासाठी दोन पाईपलाईन टाकून ठेवा. व्हीडीओ कॅमेरे हे बसलेच पाहिजेत. कोणी एबीपी माझ्यावर बघीतल असेलतर ॲक्सीडेंट झालातरी त्या लोकांना जागेवर बसुन कळतो तो ॲक्सीडेंट कसा झाला आणि तो कसा पळून गेला. पिंपरी चिंचवडला चांगल्या सुविधा दिल्यातर नागरीक नाही म्हणणार नाहीत. कच-याची समस्या दिवसेंदिवस वाढणारी आहे. ८००-८०० फ्लॅटच्या सोसायटया आहेत त्यांना तुम्ही सांगावे की तुमचा कचरा तुमच्या सोसायटीच्या बाहेर आला नाही पाहिजे त्यांना मोठ मशीन बसवून दया. पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर याठिकाणी मोठमोठया सोसायटया झालेल्या आहेत. त्यांना आपल्याकडून मशीन बसवून दया. त्या लोकांना सांगा की तुमचा कचरा बाहेर आला नाही पाहिजे असे सांगावे. ज्या संस्था काम करतात त्यांना सांगावे की तुमचा सुखा कचरा तिथूनच बाहेर आला पाहिजे व त्यांना टॅक्समध्ये सवलत दयावी. अशा पध्दतीने नागरीकांच्या समोर गेलोतर नक्कीच नागरीक आपल्याला मदत करतील. त्याच लोकांनी पाऊसाच पाणी पण वाचवल पाहिजे, उदया ट्रिटमेंट प्लॅन्ट सुध्दा त्यांना करुन दिलातर रिसायकल केलेल पाणी ते वापरु शकतील, त्यांच्याकडे प्रत्येकाकडे गार्डन आहे, प्रत्येक सोसायटीमध्ये स्विमींग टॅंक आहेत आणि ते सुध्दा फर्स्ट फ्लोअर, सेकण्ड फ्लोअरला आहेत, आपल शहर कितीतरी पुढे गेले आहे. विचार करण्याच्या पलीकडे गेलेले आहे, आपण फिरल पाहिजे, बघीतल पाहिजे. जगताप डेअरीच्या साईडला जर गेलतर मोठमोठया सोसायटया आहेत त्या प्रत्येक सोसायटीमध्ये स्विमींग टॅंक आहेत. मग ते कुठल पाणी वापरतात मग हे पाणी वापरण्यासाठी त्यांना जर चांगला एखादा प्लॅन्ट टाकून देण्यासाठी त्यांच्या आवारात त्यांनी जागा दिलीतर त्यांना त्यांच पाणी वापरता येईल. त्याच्यावरचा खर्च कमी होईल, आपल पिण्याच पाणी कमी लागेल. अशा माध्यमातून हा पर्यावरणाचा विचार केला

गेला पाहिजे. मंदाताईनी खरीच फॅक्ट सांगीतली, आपली लोक काम करत नाहीत असं मला म्हणायच नाही. परंतु आयुक्त साहेब, हवा आली की वास येतो तुम्ही तुमच्या टेरेसवर संध्याकाळी बसा १०० टक्के हवा सुरु झाली की तुम्हांला तुमच्या घरामध्ये वास यायला लागेल. आता कच-यामध्ये इतक्या ॲडव्हान्स गोष्टी झालेल्या आहेत मग आपल्या कच-याचा एवढा प्रॉब्लेम का यायला पाहिजे. आपल्या कच-याचा वास का यायला पाहिजे. कस प्रत्येक वॉर्डमध्ये तुमच मॉडेल होईल की कचरा तुम्ही तिथच जिरवा. तुम्ही प्रायोगीक तत्वावर मोशीचा वास थांबवू शकत नाहीत. वॉर्डामध्ये केलेतर नागरीक कसे काय तयार होतील. जर मोशीमधुन इथपर्यंत वास येत असेलतर तुम्ही तुमच्या वॅर्डातील कच-याला नाही करणार. म्हणून तो वास थांबविला गेला पाहिजे. कपडयाचे/फ्लॅटचे सेल सुरु झालेले आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये जाहीरात सुरु झालेली आहे. मोशी भागामध्ये जे बिल्डर लोक बांधकाम करतात तेथे जाहीरात सुरु झालेल्या आहेत. हे सुध्दा कारण असू शकेल. नदि प्रदुषण असेल, सांगवीमध्ये बसल की मच्छर चावतात, का म्हणून तीकडे मच्छर चावले पाहिजेत. मोशीमधील भागातील जलपर्णी वाढवू नये म्हणून पर्यावरण विभागानी काही उपाय केलेला आहे का. कोणती झाड लावली पाहिजेत म्हणजे जलपर्णी वाढणार नाहीत. तसे झाड आहेत, तुम्ही टेक्निशीयनला बोलवा, एक-दोन लोकांवर पर्यावरण सोडू नका. तुम्ही बाहेरची लोक बोलवून घ्या त्यांना विचारा की आमच्या नदीमध्ये आम्ही काय घटक वापरले गेले पाहिजेत. आजूबाजूला कोणती वनस्पती असल्यावर ही वनस्पती उगवणार नाही व त्याच्यामुळे मच्छर होणार नाहीत. अशा वनस्पती नदीच्या काठाला आहेत. आता नगरसेवकांनी एक विषय दिला नदी सुधारसाठीचा त्यांना बजेट थोड वाढवून पाहिजे होतं, आम्ही कुठल्या गोष्टीला आडवतो का. जर नदी सुधारसाठीच बजेट तुम्हांला वाढवून पाहिजे असेलतर ते दिलेले आहे तरी सुध्दा नदीच्या कडेच्या लोकांना राहण्यासाठी सुध्दा मुश्कील आहे. मा.महापौर गार्डनमध्ये उद्घाटन करायला गेलेतर सगळे मच्छर घोंगत होते, महापौरांनी उलटया दिशेने चालायला सुरवात केली, अशी परिस्थिती आहे, महापौर एकदाच जाणार आहेत परंतु तेथील नागरीकांना या गोष्टीला रोज फेस कराव लागणार आहे आणि म्हणून तिथे या गोष्टीसाठी पर्यावरणानी या गोष्टीची खुप खबरदारी घेतली पाहिजे. की कशामुळे एवढया गोष्टी होतात. त्या सर्व गोष्टी बघीतल्या पाहिजेत. आपल्या अधिका-यांना वाटत पर्यावरणाचा विषय म्हणजे खुप चांगल बोलता येतं. चांगल्या शहरामध्ये रहायच म्हणलतर बोलायलाच लागणार आहे आणि म्हणून ग्रामीण भागामधुन येणारे जे नाले/रस्ते/ओढे जे काही जिथ जिथ मिळणार आहे त्याठिकाणी सुध्दा जिथ आपल्याला वॉटर ट्रिट करायला लागेल तिथ तुम्ही त्या पाण्यामध्ये वापर केला गेला पाहिजे आणि १०० टक्के पाणी वापरले पाहिजे. कोणत्याही गार्डनमध्ये बीसलेरी बॉटल नेणेस परवानगी देवू नये. बर्ड व्हॅलीमध्ये त्याचा खच पडलेला दिसतो. बाहेर कुठेही जा त्याठिकाणी १०० टक्के बिसलेरी बॉटल, प्लॅस्टीक व खाण्याचे पदार्थ नेण्यासाठी बंदी आहे. तरी आपल्या सगळया गार्डनला सुध्दा ही बंदी असावी.

१०० टक्के कोणत्याही प्रकारची प्लॅस्टिकची बॅग ही शहरामध्ये दुकानदाराकडे आढळून आलीतर नुसता दंड करु नका एक महिन्याची मुदत दया आणि पुढच्या महिन्यापासुन १ मार्च पासून फौजदारी गुन्हे दाखल करायला सुरवात करा असं मी सांगते आणि पुर्णपणे प्लॅस्टिक बंदी करावी. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये सर्व प्रकारच्या प्लास्टिक पिशव्यावर १०० % बंदी आणणेबाबत मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** सन्मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बराचवेळ झाला या विषयावर चर्चा चालू आहे. पठाणताईनी उल्लेख केला, उबाळेताईनी उल्लेख केला, सीमाताईनी उल्लेख केला आणि सर्व माहीती आपल्यासमोर दिली. एखादया शहरातल्या आंधळयाला जरी आपण विचारले की ही नदी जी आहे या नदीचे नाले कोण करते तर तोही सांगु शकेल की या नदीच नालं आम्हीच करतो, म्हणजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका त्याला जबाबदार आहे हे आम्हांला दुर्दैवाने खेदाने सांगाव लागतं एमआयडीसी त्यांची जबाबदारी पुर्ण करत नाही. अनेक मिटींग झाल्या, तुम्हीही प्रयत्न केले, मागच्या अनेक मंञ्यांनी प्रयत्न केले त्यांनी प्लॅन्ट बसविला पाहिजे ते बसवत नाहीत. ३० ते ३५ एमएलडी घाणेरड पाणी डिस्चार्ज डायरेक्ट नदीमध्ये करतात आणि एक ते दोन एमएलडी पाणी धोकादायक आहे जेणे माणसाना रोगच होतील, छिद्रच पडतील अशी वाईट परिस्थिती असताना सुध्दा ते करत नाहीत. ठिक आहे परंतु जेएनएनयुआरएमच्या त्या त्या माध्यमातून आलेला एवढा प्रचंड पैसा त्याच्यामधुन आपण तरी का विचार करत नाहीत. किमान नदीमध्ये सोडायच्या आदि ते सर्व पाणी एकत्रीत ट्रिट करुन सोडले पाहिजे. त्यांची जबाबदारी त्यांच्या पर्यंत राहू दया. पुर्वी पद्मजी पेपरमीलबाबत आपण अशी काही ॲक्शन घेतली, पोल्युशन बोर्डाला कळवलं त्यांनी काही काळजी घेवून त्यांनी डिस्चार्जमध्ये थोडासा बदल केला. आज एमआयडीसी मधुन फुलेनगर झोपडपट्टी असेल, त्याच्यावर नेहरुनगर आणि एमआयडीसीमधला मोठा नाला आहे त्यामध्ये सर्व प्रकारचे घाण, सर्व प्रकारचे ॲसीड, सर्व प्रकारच पाणी हे संत तुकारामनगर मधुन कलासागर आणि कलासागरच्या तेथून डायरेक्ट पवना नदीला जाते. हे आपल्याला कोणी सांगायची गरज आहे का की या नदीच्या पवीत्र पाण्याचा नाला आम्ही करतो. जबाबदारी फक्त एमआयडीसीची नाही. आपल्या अधिका-यांनी सुध्दा त्यामध्ये ड्रेनेजलाईन सोडून दिलेल्या आहेत, स्ट्रॉमवॉटरच्या लाईनी सोडून दिलेल्या आहेत. आपल्या अधिका-यानी बेजबाबदारीपणाने अशा पध्दतीने त्यामध्ये नाल्याला अजून प्रदूषीत करण्याचे काम हे बेजबाबदार अधिकारी करतात याला कारणीभूत कोण आणि आपण कोणावर कारवाई करणार आणि आपण काय प्रयत्न केले. कोटयावधी रुपये आपण खर्च केले आपल्याला चांगले चांगले ॲवॉर्ड मिळाले, चांगले काम सुध्दा केले. चांगल्या कामाचे कौतूक पण केले पाहिजे. सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट बाबत सांगायच झालतर आपले सिटी इंजिनीअर यांच्याकडे मी स्वत: पत्र दिले, तुम्ही प्रयत्न केले. की तिथ

हेल्दी कॉम्पीटीशन व्हाव, चांगल्या लोकांनी याव, पाच एमएलडीचे दोन पंप असावेत का दहाचे असावेत याच्यावर अनेक चर्चा झाल्या. त्याच जे वॉटर डिस्चार्ज आहे त्याची काळजी आपण कितपत घेतो. जुने जे सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट आहेत त्याची आता काय परिस्थिती आहे. त्यासाठी आपण काही प्रयत्न केला का. मला काय म्हणायच आहे की आपण कोणालातरी सांगण्यापेक्षा आपल घर तरी दुरुस्त आहे का, आपण तरी चांगले काम करतो का. आयुक्त साहेब, तुम्ही प्रयत्न केले तुम्ही सांगीतल की अमुक अमुक याच्यामधले कंडीशन कमी करा, तर नाही, एक सर्क्युलर दाखवल की त्यांची संपुर्ण जबाबदारी संपली. साहेब, गेले वर्षानुवर्ष एस.एन. भट्टला आपण पोसतो आणि तो महापालिकेला निव्वळ खातोय. कोटयावधी रुपये खातोय. यावेळेसच टेंडर तुम्ही बघा. ७७ टक्के अबव्ह आहे, जेएनएनयुआरएमच्या नवीन गाईडलाईन आलेल्या आहेत त्या गाईडलाईन्स प्रमाणे ओपन टेक्नॉलॉजीचा वापर करुन, तुम्हीही प्रयत्न केले आहेत तुमचही विशेष अभिनंदन करतो या प्रयत्नामुळेच आज २३ एमएलडीच २३ कोटीचे जे आपल इस्टीमेट होते १६.५ च ते १४ कोटी ४४ लाखाला टेंडर पडलेले आहे. म्हणजे ते २३ कोटीच होत. मागच जे आहे ते २५ ते २७ कोटीला गेलेल आहे. यावेळेला हेल्दी कॉम्पेटेशन झाल्यामुळे मुंबईची पार्टी आली आणि त्यामुळे महापालिकेचे ५८ कोटी रुपये वाचलेले आहेत. परंतु अमुक नको, हे नको ते नको म्हणून फक्त एसी केबीनमध्ये बसून कोटयावधीचे टेंडर कसे काढता येईल वर्षानुवर्ष हे चालले आहे याच्यामध्ये लक्ष दयावे. तुम्ही सांगून सुध्दा, सूचना करुन सुध्दा अमुक सर्क्यूलर फक्त दाखवायच आणि करायचे बदल करायचे नाही. गव्हर्मेंट ऑफ ईंडीया अलॉव्ह करते, महाराष्ट्र गव्हर्मेंट अलॉव्ह करते तुम्ही कोण सांगणारे. तुम्ही तीन महिने प्रयत्न केले तरी सुध्दा त्यात काही झालेले नाही ही परिस्थिती आपल्या विभागाची आहे. मगाशी आल्हाट ताईनी सांगीतले मोशी याठिकाणी संध्याकाळी इतका घाण वास येतो. त्याठिकाणी आपण कन्व्हेन्शन सेंटर आणण्याचा प्रयत्न करतो, तिथे राज्यशासनाचा, महापालिकेचा आणि प्राधिकरणाचा माणस आहे, एवढ मोठ एक्झिब्यूशन सेंटर आपल्याला उभे करायचे आहे त्याच्या बाजूला जर अशा पध्दतीचा घाणेरडा वास येणार असेलतर, जगातल काहीतरी असं वैभव निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करतो मग असे प्रयत्न असताना त्याच्या बाजूला जर असा घाण वास येणारा असेलतर कोण नागरीक त्याठिकाणी थांबणार आहेत. कृषि प्रदर्शन भरले होते त्यावेळेला आम्ही गेलो होतो. त्याठिकाणी अक्षरश: प्रत्येक महिलेच्या आणि प्रत्येक पुरुषाच्या हातामध्ये रुमाल होता आणि तो नाकावर रुमाल घेवून ते प्रदर्शन बघत होते हे आपल्या शहरासाठी किती खेदजनक बाब आहे. लोक त्याठिकाणी राहतात मंदाताईनी सांगीतले आहे. लोकांना किती वेदना होतात, त्यावर आपण काय करतो, लॅण्डफिलींग केले म्हणजे आपली जबाबदारी संपली का. आपण हा सगळा कचरा ट्रिट तरी करु शकतो का तेही करु शकत नाही आणि म्हणून हा जो कचरा आहे तो ट्रिट व्हायला पाहिजे, तेथील दुर्गंधी कमी व्हायला पाहिजे. आपल्याला कत्तलखान्याबाबत पोल्युशन

कंट्रोल बोर्डाने नोटीस दिलेली आहे आपण तो बंद केला. परंतु आपण वारंवार सांगुन, तुम्ही प्रयत्न करुन, मी प्रयत्न करुन सुध्दा आज कलासागरच्या मागे ओपन असाच कचरा ते टाकतात. संत तुकारामनगरवासीयांना, सुखवाणी कॉम्प्लेक्स मधील लोकांना, संध्याकाळीतर आम्हांलाही आमच्या घरात राहता येत नाही. किती स्ट्राँग लेटर आपण लिहीले, काय ॲक्शन आपण घेतली. आपण काय केले आपण फक्त एकच म्हणतो की ते कॅण्टोन्मेंटच आहे ते आपल ऐकत नाही, असं बोलून जमणार आहे का. एखादा अधिकारी नेमून त्याठिकाणी सातत्याने प्रयत्न करुन पोल्युशन कंट्रोल बोर्डाला सांगून हे कुठल्याही परिस्थितीमध्ये बंद झाले पाहिजे असा प्रयत्न आपण केला का. मोशीसाठी चांगली ॲक्शन घ्या, काहीतरी तिथे चांगली टेक्नॉलॉजी आणा. पीपीपी मॉडेल असेल किंवा महापालिकेचा अर्धा खर्च त्यांचा अर्धा खर्च परंतु जास्तीत जास्त लोक यामध्ये पार्टिशिपेण्ट कसे होतील आणि यातून आपण कसं मुक्त होऊ हे बघावे व यास आपण प्रायोरीटीने घ्यावे. नदी पोल्युशन आपण करतो. चिंचवडच जे केजूबाई धरण आहे पुर्वी त्याठिकाणी स्वच्छ पाणी असायच की माणूस तेथील पाणी घेवून पिऊ शकेल परंतु आता दुर्दैवाने त्याठिकाणी सुध्दा चांगल पाणी येत नाही कारण वरती रावेत असेल, किवळे असेल त्याठिकाणी आता मोठमोठया स्किम्स झालेल्या आहेत तेथील जे स्ट्रॉर्म वॉटर आहे, तेथील जे ड्रेनेज आहे ते सुध्दा दुर्दैवाने असेडायरेक्ट नदीला जोडले गेलेले आहे. त्यामुळे शहराचे सुरवातीपासूनचे पाणी अपण प्रदुषित करायला बघतो. आणि महाभयंकर हा एमआयडीसीतला नाला, दुसरा एचए फॅक्टरी पासून पिंपरी कॅंपातला नाला, मध्ये मध्ये मिलींदनगरची झोपडपट्टी असेल, पिंपरी मधली झोपडपट्टी असेल, पिंपरी कॅंपातील लोक असतील सगळा कचरा वगैरे लोक डायरेक्ट नाल्यामध्ये टाकतात आणि ते सर्वच्या सर्व नदीला जाऊन मिळतं आणि तेथून नदीचे रुप बदलून नाला सुरु होतो. म्हणजे पवनेमधुन येणार पवित्र पाणी रावेतपर्यंत येत असताना ते चांगल शुध्द पाणी येते रावेतपासून आपली हद्द सुरु होते तेथून मात्र आपण याला नाल्याच रुप दिलय अस दुर्दैवाने, खेदाने म्हणाव लागतं. स्वच्छ भारत अभियानाची एवढी मोठी अनौन्समेंट झाली, जाहीरात होते सगळ होत परंतु या स्वच्छ भारत अभियानामध्ये निदान ही आपली नदी तरी आपण स्वच्छ ठेऊ आणि करुन दाखऊ असे एक वेगळे अवाहन आपण स्विकाराव अशाप्रकारची विनंती करतो आणि थांबतो.

**मा.साधना जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. चिखली गावामध्ये एक स्मशानभूमी आहे त्याठिकाणी दर दोन दिवसानी अंत्यविधीसाठी जावे लागते. या भागामध्ये कुदळवाडी भागातून मैलामिश्रीत पाणी किंवा कुदळवाडीचे शॉपमधून वगैरे जे पाणी येते हे सर्व पाणी इंद्रायणी नदीला मिसळते. एसटीपी प्लॅन्ट नाही आणि तो कधी चालू होणार आहे. आयुक्त साहेब, आपण फ प्रभागामध्ये मिटींगला आले होते त्याठिकाणी आम्ही सर्व नगरसेवक बोललो होतो. त्याच्यावर लवकरात लवकर कारवाई कधी होणार आहे. स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीसाठी जातोत त्यावेळेला नाकाला रुमाल धरुन बसावे लागते एवढा

दुर्गंधीयुक्त वास त्याठिकाणी येतो. इंद्रायणी नदी आळंदीला जाते, हे पवित्र तीर्थ म्हणून आपण घेतो पण हे पवित्र होत नाही यासाठी आपण जास्तीत जास्त लक्ष दयावे व इंद्रायणी जास्तीत जास्त सुरक्षीत कशी राहील याचा विचार करावा ही विनंती, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८०२ विषय क्रमांक - ६

दिनांक - २५/१/२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र
पअक/६/कावि/३१९/२०१५ दिनांक ०९/०७/२०१५
२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७२७ दि २३/७/२०१५
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७५० दि.१९/९/२०१५
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.७७३ दि.२०/११/२०१५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७ (अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगत पूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधीचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल. अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या DPSIR या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा. महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत आला असुन त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये सर्व प्रकारच्या प्लास्टिक पिशव्यावर १०० % बंदी आणणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि /१८/७४/२०१५ दि.४/११/२०१५

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७८८ दि.२०/११/२०१५

शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५/४२८/प्र.क्र.१३८/१५/नवि -१३, दि१५/७/२०१५. अन्वये शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

“पिंपरी चिंचवड वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूररेषेच्याबाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा प्रस्ताव त्यांच्या स्तरावरुन कार्यान्वित करुन शासनास सादर करण्याचे अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये निदेश देण्यात येत आहेत.

प्रस्तुत निदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत सदर फेरबदल प्रस्तावा संदर्भातील कलम ३७(१) खालील सूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची दक्षता नियोजन प्राधिकरणाने घ्यावी.”

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत सन १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या क्षेत्राच्या विकास योजनेस शासनाने दिः- ३०/८/२००८, दिः- १८/८/२००९ चे निर्णयान्वये भागशः मंजूरी प्रदान केली आहे. तसेच वाढीव हद्दीचे विकास योजनेतील पुर्नप्रसिध्द केलेल्या सारभूत स्वरुपाचे फेरबदलांचे प्रस्ताव ई.पी क्र. १ ते ११८ बाबत दिः- २/३/२०१५ चे अधिसूचनेव्दारे शासनाने निर्णय घेतला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द करतांना मुळा, पवना व इंद्रायणी नदीस लागून सुमारे १०० – २०० मी. अंतराचा हरित पट्टा नदीचे पाण्याचे थेट प्रदुषण व पूराचा धोका टाळण्यासाठी प्रस्तावित केला आहे. तसेच नाल्यांच्या दोन्ही बाजूस सुमारे १२.५० मी. रुंदीचा हरित पट्टा नाल्याची साफसफाई करण्यासाठी पोहोच उपलब्धतेसाठी प्रस्तावित केला आहे.

वाढीव हद्दीची विकास योजना कलम ३० अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करतांना मौजे किवळे येथील स.नं. ९१ मधील नदीलगतचे १०० मी. अंतरापर्यंतचे क्षेत्र हरित पट्टयात कायम ठेऊन त्याबाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले होते. शासनाने दिः- १८/८/२००९ अन्वये पुर्नप्रसिध्द केलेल्या विकास योजना प्रस्तावांमध्ये नदी लगतच्या हरित पट्ट्यातील क्षेत्रासंबंधी दोन गावांसाठी कलम ३१ (१) अन्वये फेरबदल

प्रस्तावित केले. त्यामध्ये ई.पी. क्र. ७२ अन्वये मौजे रावेत येथील स.नं.५६, ५४, ५३, ५२, ५१, ५०, ४२, ४१, ३१, ३२, ३३, २७, १७, २८,२६, १९, १८, १६, ४ व ३ मधील नदीचे लाल पुररेषा बाहेरील हरित पट्ट्याचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा व ई.पी. क्र. ७७ अन्वये मौजे किवळे येथील स.नं. ९९ मधील नदीलगतचा १०० मी. रुंदीचा हरित पट्टा कायम ठेऊन त्या बाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले होते. तथापी शासनाने दिः-०२/३/२०१५ रोजीचे अधिसूचनेव्दारे वाढीव हद्दीचे पुर्नप्रसिध्द विकास योजनेतील ई.पी. बाबत निर्णय घेतांना ई.पी. क्र. ७२ व ७७ विषयी निर्णय घेतला की, कलम ३१(१) अन्वये प्रस्तावित केलेला प्रस्ताव अमान्य करण्यात येत असून कलम २६ नुसार प्रस्तावित जमीन वापर कायम राहिल. त्यामुळे कलम २६ अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजनेतील उपरोक्त दोन्ही फेरबदल प्रस्तावातील क्षेत्र हरित पट्ट्यात कायम राहिले आहे.

लाल पूररेषे (नदीचे महत्तम पूर रेषा) बाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्र कलम ३७ अन्वये रहिवास विभागात समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव हा नाल्याचे दोन्ही बाजूस ठेवावयाचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा वगळून व नदीचे हद्दीपासूनचा किमान ३० मी. अंतराचा हरित पट्टा वगळून असणे पर्यावरण व नदीचे प्रदुषण टाळण्यासाठी गरजेचे आहे. तसेच देहु रोड ॲम्युनिशन डेपोचे २००० यार्डचे संरक्षित क्षेत्रातील लाल पूर रेषा बाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्राचादेखील फेरबदलाचे प्रस्तावात समावेश करता येणार नाही. पिंपरी चिंचवडमहानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे विकास योजनेतील संदर्भिय शासन निदेशास अनुसरुन कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीचे अनुषंगाने नदींचे महत्तम पूररेषा बाहेरील हरित पट्ट्यातील (नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यातील क्षेत्र सोडून) मिळकतींची गावनिहाय माहिती खालील तक्तात नमूद आहे.

| अ.क्र. | नदी | गाव | स.नं. / गट नं. | अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पवना | मामुर्डी | निरंक | ०० | |
| २ | | किवळे | स.नं. ९१, ९२, ९३, ९४, ९५ व ९६. | ३८,९२५ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ३ | | रावेत | स.नं. ५६, ५४, ५३,५२, ५१, ५०,४२, ४१, ३१, ३२, ३३, २७, १७, २८, २६, १९, १८, १६, ४ व ३. | ६२,७८७ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ४ | | पुनावळे | स.नं. ४२, ४३, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५२, ५३, ३ व ४. | ७९,८५० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ५ | | दापोडी | निरंक | ०० | |
| ६ | मुळा | वाकड | निरंक | ०० | |
| ७ | | दापोडी | निरंक | ०० | |
| ८ | | बोपखेल | निरंक | ०० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | इंद्रायणी | तळवडे | गट नं. ३६९, ३७०, ३७१, ३७२, ३७३, ३६८, ३७७ व ३७८. | २२,५२५ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १० | | चिखली | गट नं. १५६६, १६५५ (१), १६५५ (२), ३३८, १४३६, २०, ४१, २, ४६, ४७, ४५, ४९, ४४, ५१, ८७ व ९०. | १,२९,८५० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ११ | | बो-हाडेवाडी | गट नं. २६४ ( मोशी – जूना गट नं. १३८२),२६५ ( मोशी- जूना गट नं. १३८३) व २७२ ( मोशी – जूना गट नं. १३९०) | ९,१५० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १२ | | मोशी | जूना गट नं. २२७, २३०,२३१, २३२, २३३ व २३९. | ६,४४५ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १३ | | डुडूळगाव | गट नं. २१६, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४३, ४४ व ४५. | १९,२०० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १४ | | च-होली | स.नं. ९३६, ९३७, ९४०, ९८३, ९८४, ९८५, ९८६, ९८७, ९९०,१०१८, १०१७, २, ३, ५ व ४. | ४७,४०० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| | | | एकूण क्षेत्र ( चौ.मी.) | ४,१६,१३२ | सुमारे ४१ हे.६१ आर |

उपरोक्त शासन निदेशानुसार वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील नदींचे लाल (महत्तम) पूर रेषा बाहेरील हरित पट्ट्यातील (नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यात सोडून) सुमारे ४,१६,१३२ चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकामी कलम ३७ अन्वये फेरबदलाची विहित कार्यवाही करण्यास मा. महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे.

सबब संदर्भिय शासन निदेशानुसार वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील नदींचे महत्तम पूर रेषा बाहेरील हरित पट्ट्यातील (नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यात सोडून) सुमारे ४,१६,१३२चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकामी कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकती।सूचना अर्जांबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तदअनुषंगिक फेरबदलाची सर्व वैधानिक प्रक्रिया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करणे यासंबंधीची कार्यवाही करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र जगताप**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,हा जो ७ क्रमांकाचा विषय आहे, तो विषय ९७ नंतर गावांतील ३० मी. नदीपात्र सोडून जो हरीत पट्टा आहे तो निवासी क्षेत्र करण्याबाबतचा हा ठराव दि.३०/०६/२००८ला राज्यसभेत पाठविला आहे. तिकडून

फेरबदलासाठी हा विषय पुन्हा मा.महापालिका सभेत आला आहे. असे असताना १९९७ नंतर महापालिका हद्दीत आलेल्या गावांचा विचार केला आहे यासाठी माझा विरोध नाही. परंतू महापालिकेतील जी जुनी गावे आहेत, जी १९९७ नंतर समाविष्ट झाली नाहीत, त्यासाठी उपसूचना देणार आहे. परंतू पिंपरी चिंचवड महापालिका होण्याआधीची ही गावे असल्यामुळे आपण त्यांचा विचार केलेला नाही. पिंपरी चिंचवड शहर एक आहे असे असताना असा दुजाभाव केला जातोय. पिंपरी चिंचवड शहरातील बेकायदेशीर बांधकामे दिड लाख संपूर्ण राज्यातील बांधकामे एक लाख अशी अडीच लाख बांधकामे नियमित करण्यासाठी राज्य शासनाने त्याठिकाणी विषय एकमताने मंजूर केला. असे असताना महापालिकेतील जी जुनी गावे आहेत. २००७ला पहिल्यांदा नदीला पूर आला. २००७ला पहिल्यांदा नदीला पूर आला असताना इथे पूररेषा आणली गेली. आपल्या महापालिकेत दोन ते अडीच कोटी खर्च करुन ही पूररेषा आली. आपण आजूबाजूचा विचार करत नाही. ही पूररेषा आणताना सगळ्या महापालिकांत हे घडले नाही. त्याठिकाणी पूररेषा आली नाही. पिंपरी चिंचवडमध्ये मात्र दोन ते अडीच कोटी खर्च करुन ही पूररेषा आणली गेली. जसे ७५ लाखांचे बीओटी मशीन २ कोटी ८० लाखांना खरेदी केलीत. तसाच इकडचा तिकडचा कोणाचाच विचार न करता आपल्याकडे अडीच कोटी खर्च करुन ही पूररेषा आली. या शहराचा विकास करण्यासाठी या गावांनी काय योगदान दिले आहे याचा आपण विचार केला नाही. या जुन्या गावांत १८ मी. चे रस्ते असतील, २४ मी. चे रस्ते असतील त्यासाठी शेतकऱ्यांनी जे योगदान दिले आहे ते आपण पाहिले नाही. त्यावेळी आयुक्त पदी श्री.श्रीनिवास पाटील होते. १८ मी. रस्त्यासाठी महापालिकेला जागा दिल्यानंतर काहींना २५०/- स्क्वे.फूटाने पैसे मिळाले, काहींना २००/- स्क्वे.फूटाने पैसे मिळाले, काहींना १५०/- स्क्वे.फूटाने पैसे मिळाले. या रस्त्यांना कोणताही टीडीआर किंवा एफएसआय द्यायचा नाही असा शासनाचा निर्णय आला असताना काही शेतकऱ्यांना तर काहीच मोबदला मिळाला नाही. पिंपरी चिंचवडमधील जुन्या गावठाणांना डबल एफएसआय मिळाला पाहिजे तसा न मिळता त्यांना आहे ते बांधकाम सुद्धा करता येत नाही. महापालिकेत दुजाभाव झाला नाही पाहिजे. मी उपसूचना देतोय. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या शहराचा आराखडा २०१४ला तयार केला होता. तो २०१५ ला तयार झाला आहे. महापालिकेने नवीन डिपीला मान्यता सुद्धा दिलेली आहे. आम्हाला वाटते, त्यांच्या नियमावलीचा काही तपास दिसत नाही. ५/६ महिन्यांनंतर सर्व सदस्य निवडणूकीच्या कामात गुंतले जातील. नगररचना व बिल्डर लोकांचे संगनमत होईल. २०१७ ला हा डि.पी. मान्यतेसाठी येईल. अजून त्याची काही हालचाल झालेली दिसत नाही. आपण पाहिले की, १९९७ तील गावांच्या सर्वेनंबरचा विचार केला आणि तो सर्वेनंबरचा प्रस्ताव पुढे गेला. बिल्डर व नगररचना यांच्यात काहीतरी मिलीभगत झाले आहे असे वाटते आहे. त्यामुळे त्यांनी नवीन गावांचा प्रस्ताव पाठवला व जुन्या गावांचा विचार केला नाही. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, हे शहर एकच असताना असा दुजाभाव न

करता कोणताही प्रस्ताव एकच केला पाहिजे. डि.पी. व नदी पूररेषा या माझ्या दोन्ही प्रश्नांचा खुलासा झाला पाहिजे. मला त्याचे समाधानकारक उत्तर मिळाले पाहिजे. आपण आत्ता खुलासा देणार आहात का पूर्ण बोलल्यानंतर देणार आहात हे सांगावे

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सदर विषय चांगला आहे. परंतू ब्ल्यू लईन व रेड लाईन याच्या १०० मी. च्या आसपासचे जे क्षेत्र आहे, हरित पट्टा आहे, तो रहिवास क्षेत्र करण्याविषयी हा विषय आहे. जी समाविष्ट गावे आहेत, त्यांत सुमारे ४१ हेक्टर ६१ आर पर्यंत क्षेत्र आहे. परंतू मला सांगायचे आहे की, ब्ल्यू लाईन व रेड लाईन याच्या सभोवतालचे क्षेत्र व नाला याच्या क्षेत्राचा विचार न करता उर्वरित क्षेत्रांत गावागावांत आजही शेती क्षेत्र आहे. तो सुद्धा ग्रीन झोन आहे. ते सुद्धा घेतले तर त्याची आकडेवारी भरपूर होईल. विशेषतः च-होली गावात भरपूर क्षेत्र हे हरित पट्टा क्षेत्र ठेवले आहे. कोणी ठेवले माहित नाही. मोशी,चिखली इथे आहे. मधले क्षेत्र आहे. पाच/दहा एकरमध्ये इंडस्ट्री आहे तिथे सुद्धा ग्रीन झोन आहे. असे क्षेत्र सुद्धा त्यात समाविष्ट करणे गरजेचे होते. त्यासाठी उपसूचना दिली आहे. विशेषतः च-होली गावात जे नाले आहेत, ते १००/१५० फूट रुंदीचे आहेत. याला कारण म्हणजे नाल्यांच्या कडेची जी पोयटा माती आहे. ती पाऊस पडल्यानंतर नाल्यात जाऊन नाल्यांची रुंदी आपोआप वाढत गेली. ५०/६० फूटांचे नाले १०० फूटांचे झाले आहेत. पोयटा माती वाहून गेल्यामुळे नाल्यांची खोली कमी झाली आहे अशा ठिकाणी नाला चॅनलायझिंग करायला पाहिजे. त्याची डेप्थ् ठरवली पाहीजे १५० फूट + १२ मी. म्हणजे ४० फूट असा हरिता पट्टा ठेवलातर हे त्या शेतक-यांवर अन्यायकारक आहे. एखादा एकराने जमिनबाधित होतो. म्हणून विशेषतः च-होली भागात नाल्यांचे सर्वेक्षण करुन ते चॅनलायझिंग करणे गरजेचे आहे टाऊन प्लॅनिंग विभागाकडून याचे निश्चितपणे सर्वेक्षण व्हावे अशी सूचना मला द्यावी वाटते. त्यानंतर विषय आला होता. रेडलाईन बाहेरील क्षेत्र आहे. ते क्षेत्र रहिवास पट्यात कन्व्हर्ट करावे असा विषय आहे. ब्ल्यू लाईनपासून क्षेत्र घ्यावे अशीही माझी अपेक्षा आहे. मी एवढेच बोलू इच्छितो धन्यवाद!

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, १९९७ साली महापालिकेत जी गावे समाविष्ट झाली होती, त्यांच्या हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूर रेषेबाहेर जे नाविकास झोन आहे त्यामध्ये दर्शविलेले क्षेत्र त्यात हरित पट्टा किंवा ग्रीन झोन हा सलग रहिवास क्षेत्र उपलब्ध होण्यासाठी व शहराचा सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टिकोनातून रहिवास विभागामध्ये सामाविष्ट करण्यासाठी कलम ३७ खाली हा विषय मंजूर करायचा आहे. शासनाकडे हा प्रस्ताव ९० दिवसांच्या आतमध्ये आपल्याला पाठवायचा आहे असं शासनाने सांगीतलेल आहे. सन १९९७ साली जी गावे समाविष्ट झाली होती, त्यांचा डि.पी. राज्य सरकारला दि.३०/०८/२००८ रोजी पाठविला आहे आणि राज्य शासनाने त्याला १८/८/२००९ ला यास भागशः मंजूरी दिली होती. फेरबदलाचे प्रस्ताव ११८ बाबत

दि.२/३/२०१५ रोजी राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. वाढीव क्षेत्राचा विकास आराखडा सादर करताना मनपाने नदीला लागून असलेल्या १०० मी. काही ठिकाणी २०० मी. हरित पट्टा ठेवलेला होता. जेणेकरुन नद्यांचे प्रदूषण होणार नाही, पूराचा धोका होणार नाही यासाठी हे प्रस्तावित केले होते. नाल्यांच्या दोन्ही बाजूंना हरितपट्टा नालेसफाई करण्यासाठी प्रस्तावित केलेला होता. सन २००९ साली निळी पूररेषा, लाल पूररेषा याला मान्यता दिली आणि लाल रेषेच्यालगत जो नाविकास झोन आहे. जो शेती झोन आहे, जो हरित पट्टा आहे तो हरित पट्टा हा रहिवास झोन करावा असा हा विषय आहे. शासनाला विकास आराखडा सादर करताना ज्या गावामध्ये नदीपासून १०० मी., २०० मी. व त्यापलिकडे जो काही नाविकास झोन आहे, जो काही शेती झोन आहे तो शेतीझोन रहिवास करावा हे त्यावेळी डि.पी बरोबर पाठविले होते. परंतू शासनाने त्याला मंजूरी दिलेली नाही. हा प्रस्ताव शासनाकडे अमान्य करण्यात आला. आणि शासनाने आत्ता असे निर्देश दिले आहेत की, हा लालरेषा विभाग, हरित पट्टा विभाग हा रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा ठराव शासनाला पाठवून दयावा. जेणेकरुन शहराचा सुनियोजित विकास होईल व जास्तीत जास्त रहिवास क्षेत्र उपलब्ध होईल असे शासनाचे म्हणणे आहे. चार लाख सोळा हजार एकशे बत्तीस चौ.फुट इतक रहिवास क्षेत्र या शहरामध्ये उपलब्ध होणार आहे. आपण शासनाचे प्रतिनिधी आहात म्हणून मला तुम्हाला विचारायचे आहे की, पूर्वी असाच प्रस्ताव डीपी पाठवित असताना आम्ही पाठविला होता त्यावेळी तो अमान्य केला. मग आजच शासनाला असे का वाटले की हा जो शेती झोन आहे किंवा नाविकास झोन आहे त्याचा रहिवास विभागात समावेश करावा असे का वाटले. नदीच्या बाजूचा हा भाग आहे. लाल पूररेषेबाहेरचा भाग आहे. या भागातील लोक अजूनही शेती करतात. नदीच्या कडेचा हा भाग आहे त्यामुळे तेथील जमीन देखील सुपीक आहे. आज रावेत असेल, किवळे असेल किंवा नदीकाठचे जे काही शेतकरी बंधु असतील त्यांची काही जमिन गेलेली आहे आणि काही जमिन याठिकाणी शिल्लक राहीलेली आहे. या जमिनीवर देखील जर आपण रहिवास झोन करणार असालतर एका दृष्टिने हे चांगल देखील आहे बिल्डर म्हणून हा प्रस्ताव चांगला आहे. एक शेतकरी म्हणून त्यांचे खूप मोठे नुकसान होणार आहे. जर आपण रहिवास झोन केलात तर आपल्या शहरातील बिल्डर या शेतक-यांना नीट शेती करु देणार नाहीत. त्यांच्यावर प्रेशर आणतील त्यांना वेगवेगळी प्रलोभने दाखवली जातील आणि बिल्डर त्यांच्या जमिनी घेण्यासाठी प्रयत्न करतील. याचा खुलासा करावा अशी विनंती आहे. शासनाला असे का वाटले की याठिकाणी हा भाग रहिवास झोन करावा म्हणून. या विषयाला मंजूरी देणार असाल तर मला एक उपसूचना द्यायची आहे ती नंतर देतो.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर हा विषय अनेक दिवसांपासून आपल्या अजेंडावर आहे. आपल्या शहरातील अनेक जागा अडचणीच्या वाटतात. त्यांना काही ठिकाणी रहिवास क्षेत्र म्हणून केले पाहिजे. काही ठिकाणी लाल रेषा,

निळी पूररेषा हद्द कमी करुन पाहिजे. माझ्या मनात मात्र शंकेची पाल चुकचुकते आहे. महापालिकेत राष्ट्रवादीची सत्ता आहे. तुम्ही जे काही सगळे करता, सूचना/हरकती घेता, ते आता शासनाकडे जाणार आहे. भाजपा-शिवसेनेचे सरकार हे मंजूर करेल का नाही हे पहिले तपासून पाहिले पाहिजे. त्यामुळे उद्या जर भाजपा सरकारने याच्या विरोधात निर्णय घेतला तर आपल्या शहरातील पवना,मुळा व इंद्रायणी काठी जी घरे आहेत. भविष्यात हे क्षेत्र निवासी करु पाहतोय. निळी किंवा लाल पूररेषेच्या बंधनात जखडली आहेत, त्यातून मुक्त करु पाहत आहोत. त्याला मुक्त करायचे काम शासन करेल का नाही याबाबत शंका आहे. आमच्यासारख्या नगरसेवकांच्या परिसरात नद्यांचे वास्तव्य आहे. प्रत्येक ठिकाणी डिपीवर चुकीच्या पद्धतीने झोनिंग दिसतेय. त्यापेक्षा आज डिपीत जो काही शिक्का तिथे आहे. डिपीत काही बदल झाले. तर त्यानंतर काही ठिकाणी चांगल्या भावना व्यक्त झाल्या, अशी मिश्र प्रतिक्रिया मागे बघत करत आले आहेत. आमच्या सगळ्या सूचना पाहिल्यातर आम्ही संपूर्ण शहरासाठी चांगल्या सूचना देण्याचा प्रयत्न सर्व पक्षांचे सर्व नगरसेवक करत आहेत. भोसरीचे सन्माननीय आमदार इथे काही वेळापूर्वी होते. प्रत्येक शासन, तीन आमदार असतील, खासदार असतील सगळ्यांना वाटते आपले शहर चांगले व्हावे. पण हा निर्णय लगेच होणार आहे का. का तिथे सुद्धा राजकारण होणार आहे. मग तिथे सुद्धा परत आपली स्मार्ट सिटी करणार. आमच्या शहरातील लोकांच्या फायद्याचे असेल तर, भविष्यात त्यांनी केलेतर ती अतिशय अभिनंदनीय गोष्ट राहील. त्यामुळे या विषयाला आमची उपसूचना राहील. मा.आयुक्त साहेब, तुम्ही शासनाच्या निर्देशानुसार, आदेशानुसार इथे मांडलेले आहे. त्यामुळे त्याप्रमाणे आम्ही उपसूचना देऊ. त्या प्रत्येक उपसूचनेचा समावेश त्यात व्यवस्थित व्हावा. सूचनांचा भडिमार आलातर शासन शंभर टक्के तुम्हाला पॉसिटीव्ह निर्णय देईल असे नाही. त्यात काही सूचना कदाचित वगळाव्या लागतील. प्रशासन कदाचित निगेटिव्ह विचार करेल. त्यामुळे त्यापुढे त्या शासनाकडे परत पाठवल्या जातील. आता कालावधी राहीला सहा महिन्यांचा. सहा महिन्यांनंतर तुम्ही काय लिहिताय, काय म्हणताय. हे १२८ नगरसेवक त्यांच्या-त्यांच्या कार्यात मग्न झालेले दिसतील. त्यामुळे प्रशासन जे करेल ते आम्हाला नंतरच कळणार आहे यात शंका नाही. कारण पुढील वर्षी निवडणूका आहेत. वर्ष राहिले आहे. वर्षभरात तुम्ही जे नोटीफीकेशन देणार ते खूप महत्वाचे असणार आहे. आपण प्रशासनाने याच कालावधीत ते आणलेले आहे. त्यामुळे याकडे फारसे लक्ष राहिल असे मलातरी वाटत नाही. तुम्हाला जे करायचे ते तुम्ही करणारच आहात. परंतू याचा निर्णय शासनाने पॉझिटीव्ह ॲंगल घेऊन आपल्या शहरवासियांच्या दृष्टिकोणातून घ्यावा. ज्याचे जळते त्याला कळते. यात जे नागरीक बाधित आहेत, ज्या नागरीकांच्या त्या निळ्या रेषेत जमिनी आहेत, यलो रेषेत आहेत. एक गुंठा, दहा गुंठ्यांचा प्लॉट अडकला आहे, त्याला तिथे परमिशन देत नाहीत. त्याला कळते आपली व्यथा काय आहे. ही व्यथा महापालिकेच्या माध्यमातून शासनाने समजून घेतली, आम्ही सांगितलेल्या सूचनांचा स्विकार

केला,नद्या लवकरात लवकर निळ्या व लाल पूर रेषेतून मुक्त केल्या, त्यांचे निवासी भाग केले. काही नद्यांचे पात्र ३० मी. पर्यंत प्रस्तावित केले, नाल्यांचे साडेबारा मीटरपर्यंत असे लिमिटेड क्षेत्र केले तर, आपल्या शहराचा विकास होईल. भविष्यात नदीची स्वच्छता देखील फार महत्वाची आहे. जसे आत्ता मा.योगेश बहल यांनी सांगितले. तुम्ही नदीला संरक्षण केलेतर त्याचीदेखील स्वच्छता राहील व पर्यावरणाचा -हास होणार नाही या सूचना मला कराव्याश्या वाटत आहेत. परंतू माझे म्हणणे आहे. सर्व स्तरांतून ही मागणी आहे. पूर्वी च-होली इथला एक विषय आला. या विषयावर इतके राजकारण झाले. शासनाने तो विषय फेटाळून लावला. तुम्हालाही माहित आहे. ग्रीन टू रेसिडेन्शियल असा झोन चेंज करायचा विषय आहे. यात ठराविक सर्वे नंबरचा उल्लेख होता. हे करत असताना उद्याच्या काळात शहराच्या प्रत्येक गोष्टीत वाकड्या नजरेने पाहू नये व शहराचा होणारा विकास थांबू नये असे आम्हाला वाटते आहे. पॉझिटिव्हली विचार करुन शासनाकडे प्रस्ताव सादर केला. पण मनात हिच शंका आहे, तुम्ही ठराविक गावांसाठीच प्रस्ताव का सादर केलात. तुम्हाला ठराविक गावेच का दिसली. ठराविकच क्षेत्र का दिसले. तुम्ही चौरस मीटरचा उल्लेख केला आहे. तेवढीच हद्द का घेतलीत. आपल्या शहराला पवना, मुळा व इंद्रायणी या ३ नद्या आहेत. सांगवीला तर कायम ही अडचण आहे. डिपी पाहिलातर आम्हाला दुसरा डिपी जोडायला लागतो. ही लाईन तिथे मॅच होत नाही. रेड लाईन मॅच होत नाही. ब्ल्यू लाईनपण मॅच होत नाही. आमच्या भागात पवना, मुळा या दोन नद्या आहेत. या तीनही नद्या शहरातून जात असल्यामुळे शहराचा २० ते २५ टक्के भाग हरित व पूररेषेमुळे बाधित आहे. सध्या देशाची असलेली आर्थिक परिस्थिती बघितली तर आपल्याला खूप अवघड परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. आपल्या महापालिकेला आर्थिक संकटातून वाचवणे हे महापालिकेचे व शासनाचे काम आहे ते तुम्ही करावे. आमच्या सर्व उपसूचनांचा स्विकार करावा. तुम्ही इथे एवढ्याच गावांचा उल्लेख केला आहे त्यात इतर गावांचा उल्लेख का केला नाही. या प्रसंगी याच्या संदर्भात खुलासा व्हावा अशी विनंती करतो.

**मा.सीमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मला प्रथमत: प्रशांतदादा तुम्हांला सांगायच आहे ना सेनेनं, ना भाजपनं. २००९ ला आमच गव्हर्मेंट नव्हतं त्यामुळ त्यांनी आता त्याच्यात काय करायच हा निर्णय तुम्ही घेतलेला आहे अंमलबजावणी फक्त आमच्याकडे ठेवलेली आहे. त्यामुळे नागरीकांच नुकसान होईल का, त्यावेळेसच गव्हर्मेंट होत त्यांनी सुध्दा काहीतरी विचार केलाच असेलनां की नागरीकांच्या जीवापेक्षा त्यांच नुकसान महत्वाच आहे का जीव महत्वाचा आहे. पुररेषा ही जीवाशी संबंधीत असल्यामुळे त्यावेळेसच्या गव्हर्मेंटन निश्चितपणे चांगला निर्णय घेतला असेल माणुसकीच्या दृष्टिकोनातून घेतला असेल यात मला तीळमात्र सुध्दा शंका नाही. याच्यावर आम्हांला राजकारण करायच नाही. आपण उल्लेख केला म्हणून एक छोटस उत्तर दिल. मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास आराखडयातील लाल पूररेषेच्याबाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा फेरबदल प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा असे निदेश शासनाने याठिकाणी दिलेले आहेत. मा.महापौर साहेब, महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या दहा दिवस आदि अजेंन्डा देनं खरंतर कायदयाने बंधनकारक आहे. त्याचबरोबर त्यामध्ये काही प्रपत्र असतील, तक्ते असतील, शासन आदेश असतील हे सुध्दा देण महत्वाच आहे. पर्टीक्यूलर या विषयामध्ये शासन आदेश हा जर त्या विषयपत्रीके बरोबरच आम्हांला घरी पाठवला असतातर निश्चितपणे आम्हांला सुध्दा त्यामध्ये चांगला अभ्यास करता आला असता. आयुक्त साहेब, वारंवार अशा तक्रारी केल्यानंतर सुध्दा आपल्याकडून त्यामध्ये दुरुस्ती केली जात नाही हे अत्यंत खेदाने सांगाव लागतं. खरंतर मा.महापौर साहेब, ना-विकास विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबतच्या या अत्यंत महत्वाच्या शासन आदेशाची प्रत सर्व सदस्यांना देणे अपेक्षीत होते. ग्रीन मधुन एलो मध्ये जाणार कळायला पाहिजे होतना आता जशी राजेंद्र जगताप यांनी या विषयाला उपसूचना मांडली त्यांना सुध्दा वाटल की त्यांच्या गावातील जुन्या गावातल्या हद्दीत निळी पुररेषा आणि लाल पुररेषा जाऊन त्याठिकाणी सुध्दा ते क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट झाले पाहिजे आणि तसा ते प्रयत्न करतात आणि म्हणून त्यांनी जी दिलेली उपसूचना आहे त्या उपसूचनेला अजीबात विरोध करायच काही कारण नाही आणि करणारही नाही. कारण की त्यांची जी उपसूचना आहे ती तळमळीची आहे. त्या भागातील लोकांच्यासाठी असेल, तिथल्या नागरीकांसाठी असेल आणि म्हणून त्यांनी ती दिली परंतु खरच ती फ्लेक्झीबल आहे का किंवा फिजेबल आहे का हे सुध्दा पाहणे तेवढेच महत्वाचे ठरणार आहे. मा.महापौर साहेब, शासनाने एखादा आदेश दिलातर आपण सोईस्कररीत्या त्याचा अर्थ लावतो आणि तसा प्रस्ताव पण सभागृहामध्ये ठेवतो खरंतर अर्धवट दिलेल एखाद विषयपत्र जर असेलतर त्याचा आम्ही काय अर्थ लावायचा. मग आम्ही आपआपल्या परीने अर्थ लाऊ. तुमचा जो खुलासा येणार आहे त्या खुलाशात काहीतरी वेगळ सांगाल. पण हे जर का तुम्ही आम्हांला शासनाच्या आदेशासह आमच्या घरी विषयपत्रीका आली असतीलतर निश्चितपणे आमच्या माहितीमध्ये जास्त भर पडली असती. मौजे किवळे, रावेत, पुनावळे, तळवडे, चिखली, बो-हाडेवाडी, मोशी, डुडूळगाव, च-होली या गावामधील सुमारे ४१.६१ हेक्टर जमिन ना-विकास विभागातून रहिवास विभागात करण्याचे प्रस्तावीत आहे. ही १२५ एक्कर जमिन आहे. १२५ एक्कर जागा ही लाल पुररेषा आणि निळया पुररेषेच्या चक्रव्युहात अडकलेली आहे आणि या ३७ च्या कारवाईने जर का ती १२५ एक्कर जागा मोकळी होणार असेलतर निश्चितपणे त्यामध्ये राजकारण झाल्या शिवाय राहणार नाही. कारण जे काही सर्व्हे नंबर

दिलेले आहेत त्यातुन एकच लक्षात येते की सुपारी घेतलेली आहे, मग ती कोणी कोणाला दिली, कशी दिली, काय दिली. ३७ ची ज्यावेळेस सुनवाई घेणार त्यावेळेस आम्ही सांगणार तुम्हांला, पण सुपारी घेतली. मा.महापौर साहेब, सदर ४१.६१ हेक्टर नाविकास विभागाच्या सर्व क्षेत्रातील सर्व क्षेत्र हे मोकळे आहे अथवा सदर ठिकाणी जमिनीचा वापर नेमका कशासाठी करण्यात येत आहे याचे वर्गीकरण करुन प्रथमत: प्रशासनाने सभागृहासमोर ती माहिती ठेवायला पाहिजे होती. एकतर त्या जागेवर बांधकाम झालेले आहेत का याबाबत प्रशासनाने खुलासा दयायला पाहिजे. तुम्ही स.नं. दिले आहे ती जागा पुर्ण मोकळी आहे का, त्याठिकाणी अनधिकृत बांधकाम झालेले आहेत का आणि ते जर तुम्ही रहिवास विभागामध्ये कन्व्हर्ट करणार असालतर ती जी अनधिकृत बांधकाम आहेत ती सरसगट अधिकृत होणार आहेत आणि मग जे पुररेषेच्यात आहेत आणि स्वत:च्या सोईसाठी गुंठा, अर्धा गूंठयात ज्यांनी बांधकाम केलेल होतं ते का त्या अनधिकृत बांधकामाच्या चक्रव्युहात अजून अडकऊ नये, तुम्हांला माहिती पाहिजे की खरच त्याठिकाणी बांधकाम आहेत किंवा नाहीत, आता त्याठिकाणी जमिनीचा वापर काय आहे त्याची माहिती प्रशासनाने दिलेली नाही तरी त्याची सुध्दा माहिती प्रशासनाने दयायला पाहिजे. ४१.६१ हेक्टर क्षेत्रापैकी डोंगरमाथा, डोंगरउतार, स्लिपर आहे का किंवा हिलस्टॉपच क्षेत्र आहे का याबाबतीत काहीही प्रशासनाने सांगीतलेले नाही. आणि मग एकीकडे शासन आदेश देतं म्हणून तुम्ही एवढे मोठे क्षेत्र जर का रहिवास झोनमध्ये कन्व्हर्ट करायचा प्रयत्न करत असालतर असं होणार नाही. त्याठिकाणी प्रशासनाने सुध्दा अत्यंत अभ्यासपुर्ण असे निरीक्षक आणायला पाहिजे. तोजर रहिवास विभाग होत असेल आणि त्याठिकाणचे बांधकाम आहेत त्याठिकाणी आणि ती बांधकाम तुमच्या निळया/लाल पुररेषेच्या रहिवासी भागामध्ये तुम्ही समाविष्ट करणार असालतर ते सरसगट जर का अधिकृत होत असतीलतर तो न्याय सगळयांना लागू असला पाहिजे. मा.महापौर साहेब, याच वर्गीकरण नगररचना विभागाने सभागृहापुढे ठेवायला पाहिजे होते मा.महापौर साहेब, त्याठिकाणी एकुण बांधकाम किती आहेत. ३७ ची कारवाई आपण करतो हे जनतेला माहिती पाहिजे, म्हणजे तुम्ही लोकांचे त्याठिकाणी ऑब्जेक्शन कॉल करणार आहात. आम्हाला माहिती पाहिजे की त्या गोष्टीला आम्हांला विरोध करायचा की त्यामध्ये सपोर्ट करायचा. जर तुम्ही आम्हांला सत्य परिस्थिती सांगीतली नाही आणि आम्ही सुध्दा आंधळेपणाने तिथे गेलोतर आम्ही विरोध करु, किंवा आम्ही सांगणार नाही, तसं करु नका, मग तिथच का करता मग संपुर्ण शहरामध्ये करा की जे पॉसिबल नाही आणि मग आम्ही संपुर्ण शहराचा हाट्ट धरुन बसलोतर कुठलेच होणार नाही. म्हणून आमची विनंती आहे की ते लवकरात लवकर सभागृहापुढे सांगावे मा.महापौर साहेब, राज्यसरकारच्या नगरविकास विभागाचे अव्वर सचिव श्री.सुनिल मरळे यांनी दिनांक १७/५/२०१२ रोजी टिपीआर क्र.१८१२/८४८ पत्र क्र. १/१२-नावि/१३ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना पेठ क्र. २१, २५, २७ मधील

अनधिकृत बांधकामे नियमीत करण्यासाठी प्राधिकरणाने कलम ३७ ची कारवाई पुर्ण करुन शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेल्या कलम ३७ चा प्रस्ताव शासनाने नामंजूर करताना एमआरटीपी ॲक्ट १९६६ च्या कलम ३७ अन्वये केलेली कारवाई ही अनधिकृत बांधकामे नियमीत करण्यासाठी करता येत नाही असे श्री.सुनिल मरळे यांचे पत्र आहे, शासनाने पाठविलेल. म्हणजे एकीकडे एक न्याय, दुसरीकडे दुसरा न्याय म्हणून महापौर साहेब, मगाशी सांगीतलं शंभर टक्के सुपारी आहे. मा.महापौर साहेब, आपणास अशी विनंती असेल की याठिकाणी जर का बांधकाम झालेली असतील, जमीन वापर काय आहे हे जोपर्यंत सभागृहाला कळत नाही तोपर्यंत अशा कुठल्याही विषयावर निर्णय घेणे, तुम्ही पास केलतरी कलम ३७ नागरीका समोर येणार आहे आणि त्यामध्ये वेगवेगळे नागरीक की जे तिथं राहणारे आहेत ते त्याला शंभर टक्के सपोर्ट करतील आणि जे नाही राहणारे आहेत आणि जे इतर ठिकाणी राहतात निळया आणि लाल पुररेषेच्या क्षेत्रामध्ये ते लोक त्याला विरोध करतील. सत्य परिस्थिती समोर येऊ दया निश्चितपणे या शहराच्या दृष्टिने एक चांगला निर्णय घेण्याची आपल्यावर जबाबदारी आहे आणि जर सत्य परिस्थिती समोर आलीतर चांगला निर्णय घेऊ, धन्यवाद.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,खरेतर विषय इंटरेस्टींग झाला आहे. सुपारीमुळे त्यात ट्वीस्ट आला आहे. स्वतःच्या मनाला समजून घेण्याचा प्रयत्न करत होते. परंतू आत्ता सुपारीचा उल्लेख झाल्यामुळे समजत नाही कारण जमिनीचे व्यवहार जास्त कळत नाही. परंतू एक प्रश्न येतो की, मागे सगळे बसलेले या विषयात असमाधानी आहेत. मग नक्की सुपारी कोणी दिली? का सुपारी देणारा या सभागृहाबाहेर असला पाहिजे. कारण हे या विषयाला विरोध करत आहेत. मा.महापौर साहेब, मला जे समजतेय. माझी वैयक्तिक भूमिका, पक्षाची मी म्हणणार नाही. खरेतर हा विषय जो आहे जसे १२५ एकरचे गणित मांडलेतर हा जो १२५ एकर रहिवासी भाग होणार आहे. निश्चितपणे त्याचे वर्गीकरण नसल्यामुळे संशयाची सुई सरकते आहे. जसे मा.नारायण बहिरवाडे साहेबांनी सांगितले की, शेतकरी शेती करत आहेत. त्यांचा भाग रहिवासी होईल तर ही आनंदाची गोष्ट आहे. जर शेतक-यांना १२ महिने पिक घेऊन सुद्धा जेवढे पैसे मिळणार नाहीत तेवढे रहिवास भाग झाल्यानंतर मिळणार आहेत. दुसरे म्हणजे १२५ एकर जमिन आज रहिवासी झाली आहे. १९९७ साली जेवढी गावे महापालिकेत आली होती तेवढ्याच गावांची नावे यात दिसत आहेत. नंतरची गावे यात दिसत नाहीत. याचा अर्थ जुन्या गावांसाठी हा विषय नाही. परंतू ठाकूर साहेब तुम्ही नवीन आले आहेत. आमचा नवीन गावांचा डिपी फार उशीरा व अंशतः मंजूर झाला. त्यापैकी ४० टक्के सुद्धा आरक्षणे डेव्हलप झालेली नाहीत. आम्ही या डिपीत खूष नाही. हा १२५ एकर भाग रहिवास होत असेलतर शासनाचे कुठेतरी अभिनंदन केले पाहिजे. वर्गीकरण झाल्यानंतरच सुपारीचे कळणार आहे. पण यात जर लोकांची बांधलेली घरे असतील तर ती

सरसकट कशी काय अधिकृत होतील? नियमांत बांधले असतील तरच अधिकृत होतील. रिकाम्या जागा बिल्डरच्या आहे का शेतक-यांच्या हा संशोधनाचा भाग आहे. महापालिकेत सगळ्या जागांचे तसेच आहे. ९७ आधीची जागा असू दे नाहीतर ९७ नंतरची जागा असो आमच्या पुढे एवढाच प्रश्न आहे की, नंतरची जी गावे आहेत किंवा जो भाग रहिवास करायचा राहिला आहे त्याबाबतीत आमची ही तळमळ आहे. हे कुठेतरी शासनाचे पॉझिटिव्ह पाऊल आहे की, त्यांनी लोकांना काहीतरी दिलासा देण्याचे काम केले आहे. डिपी मंजूर झाल्याशिवाय, झोनिंग बदलल्याशिवाय तुमचे काही अधिकृत होऊ शकत नाही आज बो-हाडेवाडीचा विषय कित्येक वर्षे आर झोनचा विषय केलेला आहे. प्रभागांत केला आहे. चिखली, बो-हाडेवाडी या गावांत सरसकट बांधकामे झाली होती. तो ग्रीन झोन होता. त्याचे पूर्णतः आर झोन झालेला असे अजून आलेले नाही म्हणून आज हा विषय करतोय. परत किती दिवसांनी या कचाट्यात अडकणार आहोत का. नाहीतर असे होणार नाही ना, जशी ताथवडेच्या विषयात उपसूचनांची बरेच दिवस वाट बघितली. विषय ठेवला आणि शेवटी केला. उपसूचना अशा सहजासहजी होत नाहीत. यात विलंब नक्की कोणत्या कारणासाठी कोणामुळे होतो आहे. परंतू याला शासनाचे पॉझिटीव्ह/प्राथमिक पाऊल समजून शासन कोणाचे आहे त्यापेक्षा लोक जे आहेत ते कायम आपले शहरवाले आहेत. आत्ता नगरसेवक कोण आहे, २०१७ नंतर कोण नगरसेवक असणार आहे याला महत्व न देता या विषयाकडे चांगल्या दृष्टीने बघीतले तर उपसूचनेद्वारे हा विषय केला असेलतर तो होणार आहे का? होणार नसेल तर आमच्यात वादविवाद होतील, सूचना/हरकतींमध्ये अडकून हा होणारा विषय सुद्धा होणार नाही. अशा प्रकारे मा.आयुक्त साहेब आपण स्वतः खुलासा करावा. ठाकूर साहेबांनी खुलासा करावा. कारण हा विषय कळालेलाच नाही तर खुलासा नसेलतर बोलणार कोण? विषय पॉझिटिव्हली होत असेल, कारण हा विषय होणार असेल, यात बाकी विषय होणार असतील तर यात सांगावे की हा विषय होणार आहे का? ख-या अर्थाने ज्यांना कळतेय ते गप्प दिसत आहेत. कोणी काही बोलत नाही. मग ते का बोलत नाही. हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे. संशय घ्यायचा झाला तर बायकोनी नव-यावर संशय घेण्यासारखे आहे. रात्रंदिवस बाहेर गेल्यावर कुठे जातात. कुठे जातात. तसे या विषयाचे झाले आहे. शासन आमचे आहे त्यामुळे तसे होणार नाही. नक्की सुपारी कोणाची हे आम्ही नंतर शोधतो. या विषयाचा प्रथम खुलासा करावा. विषयाचे गांभिर्य लक्षात घेऊन हा शासनाचा पॉझिटीव्ह निर्णय कसा आहे. ठाकूर साहेब नीट समजून सांगणे ही तुमची जबाबदारी आहे.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सिमाताई, सगळ्यात महत्वाचे आहे की, पिंपरी चिंचवडमध्ये माझ्या घराशिवाय माझी कुठेही एक गुंठा सुद्धा जागा नाही. मला ज्यांनी निवडून दिले आहे. त्या चिंचवड गावासाठी मी आल्यापासून हा विषय पोटतिडकीने मांडते आहे. नोंद घ्या. मा.महापौर साहेब, निळी पूररेषा व लाल पूररेषा आ बैल मुझे मार असा या शहराने लादून घेतलेला विषय आहे लादून घेतलेल्या विषयावर आपण

आपल्यावर उगीचच ओरखडे ओढवून घेतोय असे वाटते आहे. खूप वाईट वाटते आहे. तुम्ही पुण्यामध्ये शिवाजीनगरमध्ये गेलात तर नव्या पुलाकडे नदीकडे खाली वाकून बघितले तर १०० मी. पण नसेल, ५० मी.वर उंच भिंत आहे. एक रस्ता सोडला तर लगेचच तिथे लोकांच्या इमारती आहेत. असे असताना आपणच का पोरके झालो आहोत. या लाल व निळ्या पूररेषेबद्दल आमचे आदरणीय नेते मा.शरदचंद्र पवार साहेब यांनी सुद्धा यासंदर्भात सांगितले. इकडे कुठेही शहरात नाही. मग रावेतपासून दापोडीपर्यंत पूररेषा का आहे याचे गौडबंगाल त्यांना सुद्धा कळालेले नाही. आहे ती तरी कुठे योग्य आहे. पूररेषा आखताना तलांत पाहिला गेला. समतल रेषा,कंटूर रेषा आखल्या गेल्या. त्यातरी एकच आहेत का? दोन/दोन अशा कंटूररेषा आहेत. कसे, कोण, कशानुसार बांधकाम परवानगी देतात हे सुद्धा स्पष्ट नाही. विशेषतः पूररेषेत निळी व लाल या दोन्हीमध्ये बांधकाम परवानगी देताना तुम्ही तलांत बघुन देता. पाटबंधारे विभाग तलांत बघून ते देत असतात. परंतू तो तलांत सुद्धा निश्चित नाही. या दोन पूररेषा नक्की झालेल्या नाहीत. कंटूर रेषेचा सर्वे तरी चुकीचा आहे किंवा सर्वेनुसार या परवानग्या दिल्या जात नाहीत. या दोन्हीपैकी एक आहे. या शहरात आत्ता तुम्ही जो विषय घेतला आहे. त्याबाबतीत मला म्हणायचे आहे की, तुमची निळी पूररेषाच चुकीची आहे पूर्वी निळी पूररेषा आखली आहे. आपल्या पवना नदीतील ३ बंधारे आपण फोडलेले आहेत. त्यामुळे पूरकाळात जो पाण्याचा फुगवटा येत होता तो आता येणार नाही. त्यामुळे आपण जी कंटूर रेषा तलांत म्हणता ती कमी होणार आहे. निळी पूररेषा नदीच्या बाजूने जाणार आहे. त्यामुळे कमी भाग व्यापला जाणार आहे. असे असताना हे पुर्नविलोकन करण्यासाठी, याचे पुन्हा निरीक्षण करण्यासाठी नाशिकच्या संस्थेला पाटबंधारे विभागाने हे काम दिले आहे. दि.२६/०३/२०१४ ला मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना,नाशिक मधील संस्थेला हे काम देण्यासाठी त्यांनी ११ लाखांची मागणी केलेली आहे. या विषयाचा मी खूप पाठपुरावा केला. लोकांना त्यात इतक्या शंका आल्या की, त्यांनी हा विषयच वर्षभर केला नाही. त्यांना काय साक्षात्कार झाला. डिसेंबर २०१५ मध्ये तो विषय झाला आहे. त्यांनी चेक केले असेलतर ज्यावेळी ते पूर्ननिरीक्षण होईल. त्यावेळी या संस्थेकडून निळी पूररेषा, म्हणजे त्याच्या कचाट्यातून आपला बराचसा भाग निळ्या पूररेषेतून कमी होईल हे पण लक्षात घ्यायचे आहे. मी जो विषय मांडला आहे. त्यात आत्ता आम्ही जी उपसूचना देतोय ती जुन्या गावांसाठी देतोय. मा.राजेंद्र जगताप हे जे बोलले होते, त्यांच्या बोलण्यात त्यांनी चांगले सांगितले आहे. या संपूर्ण विषयाचे तात्पर्य असे की, आपण निळी व लाल या दोन पूररेषांमध्ये बिल्डींग परमिशन देताना तलांत पाहतो. त्याठिकाणाची उंची किती आहे हे पाहतो आणि त्याप्रमाणे बिल्डींग परमिशन देतो. नवीन विषय असा आणला आहे की,लाल रेषेच्या बाहेर जो शंभर मी.चा हरित पट्टा आहे तो तुम्ही रहिवासी झोन यलो झोन करणार आहात. मधला भाग कसा सोडताय. कोणाला द्यायचे,कोणाला नाही द्यायचे हे त्या अधिका-याच्या मर्जीवर अवलंबून ठेवताय. त्याऐवजी

उपसूचनेचा अर्थ असा आहे की, त्यांनी निळया पूररेषेपासून ते लाल पूररेषेबाहेर जो आहे तुम्ही जो १०० मी.चा पट्टा म्हणताय. एखाद्याने काही का देऊ देत. हळदकूंकू देऊ द्यात. एखाद्याने लिंबू टाकू द्यात परंतू या १०० मी. पट्टयाबरोबर निळया पूररेषेपासून तुम्ही तुमचा जो प्रस्ताव सरकारकडे मांडताय. पाठपुरावा तुम्ही करायचा. लोकांची सोय पहायची का नाही हे तुम्ही बघावे. लोकांच्या सुपा-या किती घ्यायच्या याचा तुम्ही विचार करायचा आहे. मी पुन्हा एकदा सांगते. तुम्ही निळी पूररेषेपासून लालपूररेषा ओलांडून १०० मी.चा भाग आहे तो उपसूचनेद्वारे हा संपूर्ण भाग रहिवास झोन करावा अशी मी याठिकाणी विनंती करते. अशाप्रकारे हा सलग झोन रहिवास झोन करावा अशी मी विनंती करते.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,कलम ३७च्या मॉडीफीकेशनचा पूर्वी शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता तो पुन्हा आपल्यासमोर आलेला आहे. मा.आयुक्त साहेब, सुरुवातीलाच मा.राजेंद्र जगताप यांनी विषय मांडला आहे की, हा विषय करत असताना जुन्या गावांचा विचार यात झाला पाहिजे, तो झालेला नाही. सगळयांनी आपआपली मते व्यक्त करत असताना कोणी ही बाजू घेतली, कोणी ती बाजू घेतली. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू आहेत. परंतू आयुक्त साहेब, मुळात ही चूक झाली. पुणे शहराचा विचार केलातर पुणे शहरात ही पूररेषा आपल्यासारखी नाही. त्याठिकाणी प्लॅन सँक्शन होतो. आपल्याकडे मात्र अडवले जाते. आपण सगळयाबाबतीत पुणे शहराशी आपली तुलना करतो. पुणे शहरच नाहीतर इतर ठिकाणी देखील अशा पद्धतीने स्विकार झालेला नाही. ही प्रशासनाची झालेली चूक आहे. आता यात हे जे सर्वे नंबर टाकून आलेले आहेत. जवळजवळ या सगळया जमिनी मोकळया आहेत. परंतू ही जुनी गावे आहेत तिथे बांधकामे झाली होती काही अधिकृत झाली. काही अनधिकृत झाली. पूर्वी प्रशासनाने त्याला मंजूरी दिल्यामुळे तिथे अधिकृत घरे झाली होती. परंतू आत्ता परिस्थिती अशी झाली आहे की, तिथे कोणत्याही प्रकारचा प्लॅन सँक्शन होत नाही. मा.पठाणताई इथे बोलल्या. त्यांचा नेहमी सातत्याने पाठपुरावा असतो की, आमच्या चिंचवड गावात प्लॅन सँक्शन होत नाही. आम्हाला त्या नेहमी खाजगीत भेटल्या तरी सांगत असतात. आणि त्यांच्याकडे लोकं तशाप्रकारची मागणी करीत असतात. मा.आयुक्त साहेब, या निमित्ताने माझी आपल्याला विनंती आहे की, तात्पुरता विचार करुन हे सगळे करु नका. ब-याचदा सभागृहात प्रशासनाकडून असे निर्णय घेतले जातात, जे आपल्याला लाँगटर्ममध्ये अडचणीत आणतात. उदा.पीआयपीसंदर्भात आपण जो निर्णय घेतला. त्यामागची आपली भूमिका अशी होती की, हे रस्ते चांगले विकसित होतील. व त्याच्या बाजूच्या प्रॉपर्टी डेव्हलप होताना महापालिकेला भरपूर निधी उपलब्ध होईल अशी अपेक्षा होती. परंतू तो नियम करत असताना चूक अशी झाली की, तिथे कोणत्याही प्रकारची इमारत कोणी बांधायला तयार नाही. कारण त्याला तिथे परवडत नाही. मघाशी मा.नारायण बहिरवाडे म्हणाले, ग्रीन झोनमध्ये रहिवास जमिन झालीतर शेतक-यांचे नुकसान होईल. वास्तविक आत्ता पिंपरी चिंचवड शहर

इतके विकसित झाले आहे. की लोकांना शेती करण्यात इतका इंटरेस्ट नाही. त्यांच्या जमिनीला योग्य भाव मिळणार आहे जर ती रहिवास विभागात समाविष्ट झालीतर. ज्याला शेती करायची आहे तो रहिवास विभागात असलातरी तो शेती करत राहणार आहे. त्याला जमिनीत काही करायचे असेलतर त्यांच्यावर अन्याय होईल. हा चांगला विषय सभागृहात आला आहे. नवीन गावांचा विषय न करता जुन्या गावांचा सुद्धा विषय झाला पाहिजे. मा.सुरेश म्हेत्रे यांनी सांगितले की, जुने जे डीपी केलेत त्यात कोणतीही मेजरमेंट न घेता, कुठलाही सर्वे न करता असे रंगवले गेले आहे. त्यामुळे काय झाले त्या शेतक-यावर, जागा मालकावर अन्याय होऊन त्याला तिथे बांधकाम करता येत नाही. तुम्ही त्याचा सर्वे करा. अभ्यास करा. मुळात सर्वेबाबतीत परिस्थिती अशी आहे की, आपण खासगी एजन्सीकडून सर्वे केला आहे. त्यांचा सर्वे वेगळा आहे. सिटी सर्वे वेगळा आहे. कोणतीही मोजणी आणली तर ती कधीच मॅच होत नाही. त्याचा त्रास त्या माणसाला इतका होतो की त्याला हेलपाटे मारावे लागतात. मग तो विचार करतो की, त्याचे बांधकाम अधिकृत करण्यापेक्षा तो त्यांचे बांधकाम अनधिकृत करणार किंवा तो बांधकाम करणार नाही. ही परिस्थिती कशामुळे होते. हा सर्वे करताना ज्या त्रुटी राहतात. खासगी सर्वे केला आहे. महापालिकेचा नकाशा आहे. सिटी सर्वेकडे असलेला नकाशा आहे. यात कुठेही मेळ होत नाही. त्यामुळे नागरीकांना प्रचंड त्रास होतो आहे. कंट्रूर सर्वे आहे. पूररेषा आखली गेली. तेव्हा कंट्रूर सर्वे केला गेला. खरेतर हेच तपासण्याची वेळ आलेली आहे. मुळात चूक काय बरोबर काय हे तपासण्याची वेळ आली आहे. त्यामुळे आपण यात लक्ष घालावे. हा सगळा प्रकार नागरीकांच्या दृष्टीने योग्य कसा होईल. यादृष्टीने विचार करा. पुर्वी कोणत्या गव्हर्नमेंटने केले. आत्ता कोणते गव्हर्नमेंट करेल याचा विचार न करता, सगळ्या सभागृहाला माझी विनंती आहे की, हा राजकीय विषय न करता, त्यात कुठलेही राजकारण न आणता पिंपरी चिंचवडमधील नागरीकांसाठी हा विषय करायचा आहे. त्यांच्या हिताचे आहे तो निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. आपल्याला उपसूचना द्यायच्या आहेत. या विषयाला कोणत्या उपसूचना खरेच लागू होतात अशाच उपसूचना आपण घ्याव्यात त्यामुळे आपल्याला अडचण निर्माण होणार नाही. भविष्यकाळात या उपसूचनासुद्धा ग्राह्य होतील व लोकांची कामे होतील या दृष्टिकोणातून मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपण करावे व मा.राजेंद्र जगताप व इतरांनी जो खुलासा मागितला आहे तो आपण द्यावा.

**मा.संजय काटे**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आता हा जो लाल पूररेषेबाबतीत विषय आहे, त्यात लाल पूररेषा बाहेरचे क्षेत्र आहे ते निवासी झोनमध्ये करण्यासाठी हा विषय आणला आहे. मुळात लाल व निळी पूररेषा यात नेमका फरक काय आहे हे आपल्यातील बहुतेक लोकांना माहिती नाही प्रथम सर्वांनी याची सविस्तर माहिती घेतली पाहिजे. लाल पूररेषेबाहेर कोणताही निर्बंध नाही. सर्व प्रकारची बांधकामे व्यवस्थित करता येतात. फक्त शेती झोनचा मुद्दा आहे त्यासाठी हा विषय आणला आहे. लाल पूररेषेच्या आत

जी जागा येते पण ती निवासी झोनमध्ये आहे. अशावेळी बांधकाम नियमानुसार बेसमेण्ट घेता येत नाही वगैरे असे निर्बंध ठेवले आहेत. परंतू बांधकाम करता येते. म्हणजे लाल पूररेषा क्षेत्र हे बांधकाम करण्यासारखे क्षेत्र असते आणि आहे. त्यामुळे माझी अशी सूचना राहील की, जी निळी पूररेषा आहे यामध्ये जे क्षेत्र येते, त्याच्या आतमध्ये आपण कोणतेही बांधकाम करता येत नाही. पण लाल पूररेषेबाहेर शेती झोनचे निवासी झोनमध्ये रुपांतर केलेतर निळी व लाल पूररेषा यात जो शेती झोन येतो. जे जमिनमालक आहेत किंवा भूमिपुत्र आहेत त्यांच्यावर अन्याय होणार नाही. म्हणून निळ्या पूररेषेच्याबाहेर जेवढे-जेवढे शेती झोन क्षेत्र आहे ते सर्व क्षेत्र निवासी झोनमध्ये रुपांतरीत करावे अशी माझी सूचना राहील.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर ग्रामिण भागाचा विषय आहे. ग्रामिण भागाचा विषय असताना पिंपरी चिंचवड महापालिकेत १९९७ साली आमची गावे हद्दीत आली. हद्दीत येत असताना विकास आराखड्यात अनेक चूका झाल्या आहेत. त्यातलीच ही एक चूक असे म्हटलेतर वावगे ठरणार नाही. जेव्हा १९९७ ला गावे महापालिका हद्दीत आली. २००३-२००४ ला विकास आराखडा झाला. हाईट म्हणजे त्याला २००९ला तत्वतः मान्यता मिळाली असे आत्ताच सांगितले. या मधल्या घडामोडीत जर कोणी या विषयाला वेगळे वळण देत असतील तर एक उदाहरण म्हणून देतो. शेतकरी कुटूंबातील एकत्रित कुटूंब असलेली ही गावे आहेत. मग ते चिखली असेल,मोशी असेल, च-होली असेल तर हा विषय आला होता. या गावांत शेतकरी कुटुंबे असताना आत्ता ती विभक्त कुटूंबे झाली आहेत. एखादा भाऊ नदीच्या खालच्या बाजूला असेल व एखादा भाऊ नदीच्या वरच्या बाजूला असेल तर साहजिकच एका भावावर शंभर टक्के अन्याय झाला असे असणारच आहे. यात कोणताही बदल नाही. कारण पूर्वी असलेल्या प्रॉपर्ट्या उत्तर-दक्षीण असतील, पूर्व-पश्चिम असतील, त्यात सलग पट्टा असेल, मधला पट्टा असेलतर मग त्यात कोणी खाली असेल, कोणी वर असेल, कोणी मध्ये असेल. मग जो-जो पूररेषेच्या वरच्या बाजूला आला किंवा १०० मी.च्या बाहेर आला मग तो वाचला. जो निळ्या रेषेत आला, ग्रीन झोनमध्ये आला तर तो १०० टक्के बाधीत झाला. अशाप्रकारे हा विषय आणलेला आहे. मी माझ्या सगळ्या भगिनींना विनंती करतो की, कोणी काय सुपारी,कोण काय असे या विषयाला वेगळे वळण लावायची गरज नाही. असे अनेक वेळा झाले आहे. असा विषय पूर्वीसुद्धा होता. चिखली, बो-हाडेवस्ती, च-होली परिसरात जो ग्रीनचा यलो झाला आहे. तो वाद शासनाचा, जागा प्राधिकरणाची त्याच्यावर प्राधिकरणाची आणि आजही महापालिकेची मोजणी होत नव्हती. त्यात आजही मधला पट्टा राहिला आहे. आजही तो हरित पट्टा म्हणून ग्राहय धरला आहे. त्यात कोणाला वाटते कोण बिल्डर, हा बिल्डर, बिल्डर म्हणजे नक्की काय. आज शेतकरी ज्याची जागा आहे, जवळपास ७० टक्के शेतकरी हे बिल्डर झाले आहेत. आज ७० ते ८० टक्के शेतकरी कोणीही जागा विकत नाही. आज शेतक-यांना जागेचे ब-यापैकी माहित झाले आहे. टिडीआर काय, एफएसआय काय.

जागा कशी आहे, कशा पद्धतीने घ्यायचे आहे. मला नियमाने विषय आपल्यासमोर निदर्शनास आणून द्यायचा आहे की, हा विषय मुळात चुकीचा आणलेला आहे. पिंपरी-चिंचवड मनपाच्या वाढीव हद्दीच्या विकास नियोजन व नगर अधिनियमाच्या १९६६ चे कलम २४ अन्वये, मुळा, पवना, इंद्रायणी नदीस लागून सुमारे २०० मी. हरित पट्टा पाळण्याचे व नदीचे प्रदूषण व पुराचा धोका टाळण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच नाल्याच्या दोन्ही बाजूला सुमारे १२.५० मी. रुंदीचा हरित पट्टा नाल्याची साफसफाई करण्यासाठी व उपलब्धतेसाठी प्रस्तावित केला आहे. १२.५० मी. चा नाला दोन्ही बाजूला, त्यानंतर १२.५० पूर्वेला किंवा १२.५० मी. या दोन्ही बाजूला जर तो नाला सोडायचा असेलतर तो १२ X ३ = ३६ मी. चा नाला, म्हणजे नाल्याची रुंदी १२ मी. आहे. परत नाला १२ मी. सोडायचा. हा जो २ नंबरचा पॅरेग्राफ तुम्ही आणला आहे. हा विषय कशा माध्यमातून आणला आहे. यात १२ X ३ = ३६ मी. चा नाला झालातर शहरात एवढी मोठी नाल्याची रुंदी करणार आहोत. एका बाजूला विषय दाखवायला वेगळा आणला आहे. एका बाजूला लोकांच्या मनात शंका आणायचा विषय आणला आहे. एका बाजूला तो चुकीचा सुद्धा आणला आहे. म्हणजे प्रशासनाच्या मनात हा विषय करायचा आहे का नाही हाच पहिला प्रश्न आहे. का सभागृहात हा टाईमपास चालवला आहे. हा विषय शासनाकडे पाठवला होता. हा विषय परत आमच्यासमोर आणला आहे. जर विषय आणायचा होतातर प्रशासनाने जुनी व नवी गावे एकत्रित करुन विषय आणला असतातर यात कोणाचे काही बिघडले नसते. म्हणजे कोणाच्या मनात शंकाच राहिली नसती. हा विषय वाचला तर धोक्याचे पण आहे. यात दोन्ही बाजूला १२ मी. म्हणजे २४ मी. असे तुम्ही लिहीले होते. स्क्वेअर मी. मध्ये आणायची काय गरज नव्हती. चिखली असेल, मोशी असेल, च-होली असेल, जी गावे या मधल्या रेंजमध्ये आली आहेत ती सरसकट होणार आहेत. समजा मा.दत्तात्रय साने यांचा सातबारा असेलतर त्यांना वाचवण्यासाठी हा विषय चाललेला आहे. मा.सिमा सावळे यांच्या मताशी मी सुद्धा सहमत आहे. यासाठीच हे स्क्वेअर मीटर प्रसिद्ध केले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, हा विषय दुरुस्त करुन व सविस्तर करुन आणावा. जुन्या व नव्या गावांचे हा महत्वाचा विषय आणला आहे. असे गौडबंगाल करुन वरुन खाली विषय पाठवला आहे. परत वर पाठवणार. परत तो वरुन खाली पाठवणार. हे करण्यापेक्षा, तळ्यात-मळ्यात करण्यापेक्षा आम्हाला न्याय द्यायचा असेलतर हा विषय योग्य व सरळ आणा. ठाकूरसाहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, हा निष्कर्ष तुम्हाला कोणत्या टोकाला नेऊन फिरवेल, तुम्हाला या ५/६ महिन्यांत लक्षात आलेच असेल. हे सभागृह काय, नगरसेवक काय. हा जो विषय आणला आहे तो गोलगोल करुन न आणता ही जी जुनी गावठाणे आहेत, या नगरसेवकांची ओरड होणे साहजिकच आहे. कोणी ग्रामिण भागातला आहे. कोणी जुन्या गावातला आहे. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. आपण एकत्रित करुन उपसूचना बनवली, शहराला लागून केलेतर हा विषय तसा योग्य ठरेल असे वाटते आहे. ठाकूर साहेबांनी याचे स्पष्टीकरण करावे की, १२ मी.ची नदी असेलतर १२

बाय १२ परत १२ असे आहे का १२ बाय ७ १/२ आहे, नक्की काय याचा योग्य खुलासा विषयाच्या अनुषंगाने करावा. नंतर मला बोलायची संधी द्यावीत.

**मा.स्वाती कलाटे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - मौजे वाकड मधील रेड लाईन व ब्ल्यू लाईन यामधील ग्रीन झोन मधील क्षेत्र हे विषय क्र.७ नुसार मा.महानगरपालिका आयुक्त यांचेकडिल पत्र क्र.नरवि/कावि/१८/७४/२०१५ दि.४/११/२०१५ नुसार निवासी विभागात समाविष्ट करण्यात यावे.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब, मी उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.नितीन काळजे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आज च-होली इथे असो, चिखली इथे असो, ब्ल्यू लाईन, रेडलाईनचा जो विषय चालू आहे. मला एकच सांगायचे आहे की, आयुक्त साहेब, जो आपण सर्वे करणार आहोत. पूर्वी जो सर्वे केला आहे तो आपल्या इरिगेशन डिपार्टमेंटने केलेला नाही. तो आपल्या महापालिकेने डायरेक्ट टाकलेला आहे. कारण कधीही आयुष्यात नदीला एवढे पाणी आलेले नाही इतकी पूररेषा दाखवली आहे. शेतकरी पूर्णपणे या ब्ल्यू लाईन, रेड लाईनमध्ये येतात. जे आपण सर्वे नंबर घेतले आहेत. तसे न घेता पूर्ण सर्वेक्षण करुन तो सर्वे नंबर आपण घ्यावा अशी विनंती आहे. आत्ता जो डीपी सँक्शन केला. नाल्याविषयी बोलायचे झालेतर एका बाजूला डिपी, एका बाजूला नाला अशी परिस्थिती आहे. मी स्वतःचा अनुभव सांगतो. माझी स्वतःची वडिलोपार्जित शेती आहे. नाला १०० मी. पलिकडे आहे आणी डिपी एका बाजूला दाखवला आहे. तुम्ही अभिप्राय सुद्धा देत नाही अभिप्राय देतानासुद्धा अडचणी येतात. प्रत्येक शेतक-याला डिपी ओपिनियन मिळत नाही. त्यामुळे त्याचे नुकसान होते प्रत्येक वेळी सभागृहात सांगितले, नाल्यांचे सर्वेक्षण करा. नाल्यांचे सर्वेक्षण नसल्यामुळे शेतकरी म्हणा कोणी म्हणा. आपण ज्यावेळी संरक्षण भिंत बांधतो, डिमार्केशन नसल्यामुळे जशी जागा मिळेल, त्या पद्धतीने तो बांधत जातो. आपण १२ मी. पकडा, १२ मी. कमी करुन करा. मध्यंतरी नाला १२ मी. तो सोडणार. त्यानंतर बिल्डींग बांधणार. बिल्डींग बांधताना परत साईड मार्जिन सोडणार. माझे सांगणे आहे की, नाल्यापासून साईड मार्जिन पकडावे व जे ग्राह्य आहे ते त्यात धरावे. दुसरा विषय असा आहे की, ग्रीन झोनचा झालेला विषय आहे. आपल्या महापालिकेचा संपूर्ण क्षेत्रफळाचा विचार केलातर सर्वात जास्त ग्रीन झोन च-होली इथे आहे. तो आमच्या शेतक-यांचा आहे. माझी सूचना आहे की, एका गावात एवढा जास्त ग्रीन झोन का. शेतकरी थोड्या किंमतीत जागा विकतात. बिल्डर लोक आर झोनसाठी प्रयत्न करतात. त्यापेक्षा सर्व बिल्डरकडून नियमानुसार ग्रीन झोन ठेवून बाकी संपूर्ण आर झोन करावा. माझ्याकडे खूप म्हणजे हजार दीड हजार एकर ग्रीन झोन असेल. नाल्यांचे सर्वेक्षण करुन हा विषय संपवावा.

**मा.वसंत (नाना) लोंढे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, ब्ल्यू लाईन, रेड लाईन या विषयावर चर्चा चालू आहे. पुणे शहरात ५ धरणे आहेत. खडकवासला, वरसगाव,

पानशेत, टेमघर खरेतर पुणे शहराला धोका आहे. १९६१ साली पानशेत धरण फुटले होते तेव्हा पुणे वाहून गेले होते अशा शहरात ब्ल्यूलाईन,रेडलाईन नाही. इथे इंद्रायणी एका बाजूला वाहते. इंद्रायणी पलिकडील भाग आपला नाही. चाकण असेल, कुरुळी असेल, चिंबळी असेल इथे ब्ल्यू लाईन नाही. इथे मात्र ब्ल्यू लाईन टाकली आहे. आपल्या इंद्रायणी, पवना नदीला पूर्वी बंधारे होते. तुम्हाला माहित असेल पिंपरी डेअरीला पाणीपुरवठा करण्यासाठी बंधारा होता काटेपिंपळेला बंधारा होता. कासारवाडीला होता. त्यामुळे तिथे पाणी साठले जाते. त्यामुळे अचानक पूर आला की पाण्याचे बॅकवॉटर असते. पूररेषा वाढली जाते. त्यामुळे खरेतर पाण्याच्या फुगवट्यामुळे पूर येतो. त्यावेळी रेडलाईन, ब्ल्यू लाईन होती. आत्ता हे बंधारे तोडले आहेत. अशा वेळेला ब्ल्यू लाईन, रेड लाईनचे महत्व कमी व्हायला पाहिजे. हा विषय गरजेचा नाही. दुसरे म्हणजे एका बाजूला इंद्रायणी नदी आहे याचा विचार करावा. वाकड जकात नाक्यापाशी पूर्वी प्लॅन पास करत होतो. आत्ता प्लॅन पास करत नाहीत. परवानगी देत नाही. तिथे त्यावेळी ब्ल्यू लाईन, रेड लाईन काही नसताना आपणच बिल्डींगचे प्लॅन पास केले आहेत. बंधारा नसल्यामुळे या लाईनचा परत विचार करावा. कारण पाण्याचा फुगवटा होणार नाही. पूररेषा कमी करावी, माझी सूचना आहे.

**मा.राहूल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आज रेडलाईनचा विषय सभागृहापुढे आला आहे. सन्मा.सदस्यांनी यावर चर्चा केली आहे, विवेचन केले आहे. परंतू हा विषय आज आमच्या चिखली गावात सुद्धा सर्वांत जास्त क्षेत्र असेल तर चिखली, मोशी, च-होली इथे सर्वांत जास्त क्षेत्र आहे. परंतू विचार करता हा विषय ज्या पद्धतीने विषयपत्रिकेवर आलेला आहे. काकांनी तो वाचून दाखवला आहे. हा विषय मंजूर तर झालाच पाहिजे. परंतू शेतक-यांचे नुकसान होईल अशा पद्धतीने हा विषय अजिबात झाला नाही पाहिजे. आज नाल्याचा विषय घेतला. याठिकाणीसुद्धा चिखली इथे नाला आहे तो माझ्या व काकांच्या प्रभागात येतो. नाल्याचे पाणी कधीच १०० फूट खोल जात नाही. कितीही पाऊस झाला तरी पाणी कधीच एवढे जात नाही. यातही शेतक-यांचे नुकसान आहे. दुसरा विषय येतो की, नदीला कितीही पूर आला तरी आजतागायत एवढे पाणी कधीही या उंचवट्याच्या भागावर गेलेले नाही. आत्ता च-होली, भोसरी, चिखली इथला सर्वे केलातरी नदीप्रवाह वाहतोय त्याच्या बाजूने उंचवट्याचाच भाग आहे. त्यामुळे शेतक-यांचे नुकसानच आहे. आपण हा विषय मंजूर करु नये. हा विषय मंजूर होत असेल, त्यात शेतक-याचे नुकसान होत असेलतर त्यापद्धतीने पुन्हा एकदा नगररचना विभागाने सर्वे करावा. जेणेकरुन शेतक-यांचे या विषयात नुकसान झाले नाही पाहिजे. शेतक-यांचा विचार करुन हा विषय मंजूर झाला पाहिजे.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, आयुक्त साहेब, तुमच्याच उत्तरात प्रश्न अपेक्षित आहे. मी ते सांगू इच्छितो की, विषयाची सुरुवातच आहे. ती आणी तुमचं म्हणण्याचं इंटेन्शन यात विसंगती, गोंधळ होतो आहे. एका बाजूला आपण

म्हणताय, लाल पूररेषा, नदीची महत्तम पूररेषा, बाहेरील हद्दीतील पट्याचे क्षेत्र म्हणजे नदीच्या हद्दीपासून किमान ३ मी.म्हणताय म्हणजे एका बाजूला आपण असे म्हणताय की लाल पूररेषा सोडल्यानंतर बाकी हद्द म्हणताय. म्हणजे तुम्ही पूररेषा डिस्टर्ब करत नाही दुसरीकडे तुम्ही ३ मी. म्हणताय. तुमच्या खुलाश्यात हे स्पष्ट करा. मा.दत्तात्रय साने यांनी विचारले, नाल्यांची जी विड्थ आहे. त्याचा विचार न करता साडेबारा-साडेबारा दोन्ही बाजूला आहे, याबद्दल खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, एकतर दोन भाग आहेत. ब्ल्यू लाईन, व रेड लाईन आणि राज्य शासनाने हा आपल्याकडे पाठविलेला प्रस्ताव. मी पहिल्या भागाकडे येतो. याचा या प्रस्तावाशी तसा संबंध नाही. हा प्रस्ताव ब्ल्यूलाईन, रेडलाईनसाठी नाही त्याबाहेरच्या एरियासाठी आहे असा हा प्रस्ताव आहे. मी हे स्पष्ट करु इच्छितो की, जेणेकरुन कोणाच्या मनात काही काही राहणार नाही. ब्ल्यू लाईन, रेड लाईन लागू झाली. ती आपण डिपीत मार्क केलेली आहे. ब्ल्यू लाईनखाली सगळयाच गोष्टी नॉनग्रेडेबल आहेत. परंतू ज्यावेळी ब्ल्यू लाईनचा डिपी मंजूर केला. डिपी मार्च, एप्रिल २०१५ ला झाला. त्यावेळी शासनाने ब्ल्यू लाईनमधील जी गावठाणे आहेत, त्या गावठाणांच्या एरियात ब्ल्यू लाईन राहणार नाही. त्याठिकाणी सध्या नवीन बांधकाम पण करता येईल, दुरुस्ती पण करता येईल. त्याला फक्त इरिगेशन विभागाची एनओसी घ्यावी लागेल असे आपल्याला सांगण्यात आले आहे. हे माझे स्टेटमेंट आहे ते राज्य शासनाच्या ईपीमध्ये आले आहे. ब्ल्यू लाईनमध्ये बाकी काही क्रेडेबल नाही ऍक्सेप्ट गावठाण. ब्ल्यू लाईनमध्ये पूर्वीपासून जी बांधकामे सुरु आहेत. जसा आत्ता मा.नाना लोंढे यांनी उल्लेख केला की, वाकड नदीच्या पुलाजवळ बांधकामे होती. पूर्वी बिल्डींग परमिशन दिली होती. त्यामुळे त्यावर पैसा खर्च करुन बांधकाम केले असल्यामुळे मग त्याठिकाणी आपण त्यांची जी हायफ्लड लाईन आहे. त्याखाली त्याचे रहिवास प्रयोजन मान्य न करता आपण त्यांना कम्पलिशन सर्टिफिकेट देतो किंवा रेग्युलराईज करतो. ब्ल्यू लाईन, रेड लाईन हा एरिया ग्रेडेबल आहे हे सर्वांना माहित आहे. हायफ्लड लाईनवर स्पील्टची उंची असेलतर त्यानंतर तुम्हाला तिथे बांधकाम करता येईल. तो ऑलरेडी यलो असेलतर ग्रेडेबल आहे. तो जर अन्य ठिकाणी असेल, ग्रीन असेलतर तो तसा ग्रेडेबल होत नाही. मला वाटते, ब्ल्यू, रेडचे थोडे सांगायचा प्रयत्न केला आहे. राज्यशासनाचा हा प्रस्ताव काय आहे. रेड लाईनच्या बाहेर, नदी नंतर ब्ल्यूलाईननंतर रेड लाईन बाहेर पूर्वी आपल्या डिपीत सगळाच एरिया यलो पाहिजे. तो ग्रेडेबल आहे. तिथे रहिवास करता येतो. परंतू आपल्याकडे काही ठिकाणी यलो आहे. तिथून सुरुवात केली असे गृहित धरुन नंतर रेडलाईन आली, ब्ल्यू लाईन आली, नंतर नदी आली. आत्ता राज्य शासनाने असा प्रस्ताव पाठवला पाहिजे. आत्ता राज्य शासनाची अशी धारणा आहे की, जर रेडलाईन बाहेर यलो करणार, तो एरिया ग्रेडेबल आहे. पण तो ग्रीनमध्ये आहे. मध्ये ग्रीन पॅच राहिला आहे. तो तसाच ठेवला तरी जसे काका यांनी

सांगितले, बो-हाडेवाडी आणि चिखलीमध्ये महापालिकेची हद्द संपल्यानंतर किंवा प्राधिकरणाची हद्द संपल्यानंतर जिथे महापालिकेची हद्द सुरु झाली, तिथे प्राधिकरणाने आधी एरिया व्हेरीफाय केला पाहिजे होता. तो त्यांनी त्यांच्यामध्ये घेतला नाही. आणि महापालिकेने प्राधिकरणातील एरिया डिपीत घेतले नाही. त्यामुळे तो ग्रीन एरिया मध्ये आहे. असे अडीचशे/तीनशे पॅचेस आहेत. तिथे तुम्ही गेलात तर तुम्हाला असे दिसेल की, तिथे फार छोटेछोटे रस्ते साडेचार/पाच फूटांचे रस्ते आहेत. मग दोन्ही बाजूला अनधिकृत इमारती झाल्या आहेत. अशी अनप्लँड डेव्हलपमेंट आहे. हा ग्रीन बेल्ट यलो व्हावा. व यलो प्रमाणेच नंतर बांधकाम परवानगी घेऊन व्यवस्थित बांधकाम करता यावे म्हणून राज्य शासनाने हा प्रस्ताव केला होता. राज्य शासनाने फक्त नवीन १७ गावांचाच प्रस्ताव का दिला, पूर्ण गावांचा प्रस्ताव का दिला नाही याचे स्पष्टीकरण मला देता येणार नाही. परंतू राज्य शासनाने ही जी सुरुवात केली आहे, याचा फायदा शहरांना घेता आला पाहिजे. हा जो ग्रीन बेल्ट आहे तो अदरवाईज रेडलाईन बाहेर व यलो लाईनच्यामध्ये आहे, तो आता यात यलो करुन घेतला पाहिजे. यात दोन उपसूचना लॉजिकल होऊ शकतील. जर १७ गावांचे भले करता येत असेलतर जुन्या गावांनी काय घोडे मारले आहे. त्यांच्यावर का अन्याय होतो. जे काही होईल ते लॉजिकल होईल. जेव्हा नवीन गावांसाठी करताय, तसेच त्याच धर्तीवर जुन्या गावांसाठी पण केले पाहिजे.

दुसरे म्हणजे काटे साहेबांनी व मा.शमिमताई पठाण मॅडम यांनी सूचना केली की, ब्ल्यू लाईन बाहेर रेड लाईन पर्यंत जर ऑलरेडी डबल एरिया असेल आणि जर हायफ्लड लाईनपर्यंत उंच बांधकाम करता येत असेल, ग्रीन एरिया असेलतर तोही यलो करावा. ही सूचना करत असालतर ब्ल्यू लाईनच्या बाहेर ते लागू करावे आता तिसरा मुद्दा काळजे साहेबांचा असा आहे की, मा.नितीन काळजे साहेबांची जागा नदीला लागून आहे. तिथे ग्रीन बेल्ट आहे. तो यात घेतलातरी राज्यशासन तो मंजूरी करेल का नाही करेल ते मला सांगता येणार नाही. यासाठी सर्वांना विचारात घेऊन नवी योजना आणता येईल. तशी उपसूचना केलीतर राज्य शासन जरुर विचार करेल. मला एवढेच सांगायचे आहे की, हा चांगला प्रस्ताव आहे. यामध्ये मी मघाशी सांगायला चुकलो होतो. पण यात १०० एकरचे भले होईल. त्याचबरोबर ब्ल्यू लाईनपर्यंत राज्य शासनाने भविष्यात वाढवले तर आणखी एरियाचे भले होईल.

**मा.वसंत (नाना) लोंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आता बंधारे राहिलेले नाहीत. बंधारे तोडले आहेत.

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, तो हा विषय नाही. ग्रीनचे यलो करायचे का नाही हा विषय आहे. राज्य शासनाकडे त्याची तयारी आहे. आपण मान्यता दिल्यानंतर परत कलम ३७ची प्रक्रिया नाल्यासंदर्भात आहे.

**मा.शमिम पठाण**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपण जुन्या बांधकामांना नाल्यापासून १५ फूटांवर बिल्डींग परमिशन दिली आहे. त्याबद्दल काय सांगताय?

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, परत सांगतो हा विषय नाल्यांसंदर्भात नाही. आम्ही जरी दोन पॅरा दिलेले असलेतरी दोन पॅरांपूर्वी डार्क ग्रीन व्हायला त्याबद्दल देण्यात आलेले आहे. त्यामुळे राज्य शासनाचा मूळ प्रस्ताव रेडलाईनच्या बाहेर असलेल्या ग्रीन एरियासाठी आहे. त्यामुळे नाल्याचे काय होईल हे मला सांगता येणार नाही. मी पूर्वीची फक्त माहिती दिली. राज्य शासनाचा मूळ प्रस्ताव फक्त रेड लाईनच्या बाहेरच्या एरियासंदर्भात आहे. च-होली, मोशी इथे काही पॅचेस आहेत.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आम्हाला नाल्याचा जो विषय आहे, नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यात सोडून, हा विषय कळालेलाच नाही.

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, रेडलाईन बाहेरचा ब्ल्यूलाईनचा शासनाचा एकच प्रस्ताव आहे. ज्यावेळी आमच्या मंडळींनी विषय दिला, त्यावेळी पूर्वी कुठे-कुठे ग्रीन करुन ठेवला होता. त्याप्रमाणे भविष्यात १०० मी. पर्यंत ग्रीन करण्यात आला आहे. त्याप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे. राज्य शासनाचा प्रस्ताव फक्त रेड लाईनसंदर्भात आहे.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,तुम्ही या विषयाची आमच्याकडे मान्यता घेणार आहात.

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, मान्यता फक्त रेडलाईनच्या बाहेरच्या त्या चार्टलाच आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याच्यावर तुम्ही कलम ३७ नुसार कार्यवाही करणार आहात.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दुस-या परिच्छेदातील कंस वगळा, तो काढून घ्या.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझी सभागृहाला विनंती आहे की, ९ नंबरच्या पेजवरचा दुसरा पॅरेग्राफ वाचा आणि त्याचे सविस्तर उत्तर द्या.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, त्याबाबतीत अशी सुधारणा पाहिजे. नाल्यांबाबतीत डीसी रुलला प्रोव्हिजन आहे. त्याला सुद्धा या चार ओळी इफेक्ट करणार. डीसी रुललासुद्धा या चार ओळी इफेक्ट करणार आहेत. या चार ओळींचा उल्लेख करायचाच नव्हता. त्याचा काय संबंध आहे.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, राज्य शासनाचा प्रस्ताव आहे. राज्य शासनाच्या परिच्छेदात कमी/जास्त करायचा आम्हालासुद्धा अधिकार नाही. प्रस्ताव जसा आहे तसा ठेवला आहे. राज्य शासनाकडे लाल लाईन बाहेरचे जे क्षेत्र आहे तेवढाच चार्ट आहे.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, राज्य शासनाचा प्रस्ताव वाचा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेबांनी खुलासा केला नाही. ठाकूर साहेबांनी खुलासा केला तरी चालेल. तुमची जी धारणा आहे, ती आमचीसुद्धा धारणा आहे की, ब्ल्यू लाईन म्हटली तर काही विषयच नाही. दोन्ही नवी गावे व जुनी गावे दोन्ही डिपीमध्ये नाहीत का.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, ब्ल्यू लाईन संदर्भात नवा डीपी आहे. त्यासह डिपी मंजूर झाला आहे. हे तुम्हालाही माहिती आहे. मला असे डिस्ट्रीब्युशन करता येत नाही.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, माझा साधा प्रश्न आहे, त्यात त्यानंतर नदीपात्र ३ मीटरचे अंतर घेतले आहे असे म्हटले आहे.

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, मी विषय वाचतो. त्यावर सभागृहाने विचार करावा ही विनंती आहे. (मा.आयुक्त यांनी विषय वाचून दाखवला.)

लाल पूर रेषेच्या बाहेर जे नाविकास क्षेत्र आहे. यलो व लाल पूररेषेच्यामध्ये ग्रीन क्षेत्र आहे त्याचे यलो करा. महापालिकेने या १७ गावांत लाल पूररेषेच्याबाहेर जे गावनिहाय क्षेत्र आहे, ते त्यात घेण्यात आले आहे, हे मी रेकॉर्डवर घेतो.

**मा.सिमा सावळे**-मा.आयुक्त साहेब, तुम्ही असे करु शकणार नाहीत. तुम्ही शासनाच्या नियमांचे इंटरप्रिटेशन केले आहे.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, तुम्ही पत्र वाचलेत, त्याबद्दल धन्यवाद. वास्तविक पाहता, असाच एक गोंधळ पूर्वी झालेला आहे आणि आम्ही खूप मोठी चूक केली आहे. त्यावेळी आम्ही शहाणपण केलं, लवकर घाई केली आणि पैसे भरले. मघाशी मा.प्रशांत शितोळे बोलले. सिमाताईंना वेगळे वाटले. सुलभाताईंना तर अजून उत्स्फूर्ततेने मजा आली मा.प्रशांत शितोळे यांना म्हणायचे होते की, आमचे सरकार असताना आम्ही चुकलो. आम्ही झक मारली. आत्ता शासनाकडे जाणार आहे. निदान सगळ्यांचे चांगले व्हावे. हे सांगण्यामागचे कारण होते. आत्ता असलेल्या शासनाने हे करावे अशी मा.प्रशांत शितोळे यांची इच्छा आहे. आमचे एकच म्हणणे आहे की, शासनाचे इतके सरळ, साधे पत्र असताना इतके गोलगोल फिरुन, परत त्यात नाल्याचा विषय घुसडून, तुम्ही काही क्षेत्र, काही नावे, सर्वे नंबर हे सगळे करायची काही गरज नाही. त्यामुळे ही सुपारी तयार झाली. शासनाचे साधे पत्र होते, त्याप्रमाणे तुमची टिप्पणी आली असती तर सुपारी नाही नारळ सुद्धा निघून गेला असता. वैशिष्ट्यपूर्ण असे अमुक-अमुक नाव, अमुक-अमुक गट नंबर, इतके-इतके क्षेत्र असे करुन अधिक पारदर्शकता दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतू यातून अनेक क्षेत्रं सुटली गेलीत लोकांच्या हातात सभागृहात पाच/पंधरा उपसूचना देण्यासाठी तयार आहेत. साधे सरळ शब्दांत हा विषय आला असता तर हा प्रॉब्लेम झाला नसता. आत्ता आयुक्त साहेबांनी कबूल केले, माझी सुद्धा अशीच संकल्पना झाली की, मागील वेळेला मागील लोकांकडून जी चूक झाली. आत्तासुद्धा हिच परिस्थिती आहे. जुन्या हद्दीत सुद्धा आत्तापर्यंत एक्झिस्टींग लाईन नाही. मार्क केलेले नाही.

तरीसुद्धा तुम्ही सर्व परवानग्या रोखलेल्या आहेत. तिथे यूरी आपल्या अंगावर घेत नाही. बायो विभाग आपल्या अंगावर घेत नाही. काय म्हटले तर पूररेषा, अमुक तमुक आणि पुण्यामध्ये सरसकट बांधकामे चालू आहेत. तिथे पूररेषा नाही. म्हणजे आम्ही सावत्र आईची मुले. आम्ही ती करुन चूक केली. मग आम्हाला निर्बंध, आम्हाला भाषणे सगळे ऐकून घ्यावे लागते. हिच चूक आम्हाला पुन्हा नाल्यांसाठी करायची नाही. डीपीत जे नाले दाखवलेले आहेत,जी नियमावली आहे. पूर्वीच्या हद्दीतील नाले आहेत. सर्वे करुन तिथे साडेबारा मीटर अंतर कमी नाही. एखाद्या शहरातील ३ मी.चा छोटा नाला असेलतर त्या ३ मी. नाल्यासाठी या बाजूला साडेबारा व त्या बाजूला साडे बारा. म्हणजे आम्ही आमच्याच पायावर कु-हाड मारुन घ्यायचे काम करायचे. आम्हाला हे मान्य नाही. म्हणून आम्हाला ही चूक करायची नाही. हा विषय दुरुस्त करुन पुन्हा मिटींगला आणावा साधा,सुटसुटीत विषय आणावा.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शासनाचा मूळ प्रस्ताव आणा. त्याला आमची उपसूचना घ्या.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आपण प्रशासनाला आदेश द्यावेत की, त्यांनी शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे सर्वांना समजेल असे सुटसुटीत पत्र आणावे. आम्हाला त्याच्या कॉपीज् १० दिवस आधी मिळाल्या पाहिजेत. म्हणजे आमच्या मनात कोणतीच शंका रहायला नको. त्यात नाल्यांचा विषय बिल्कूल टाकू नका.

**मा.सुलभाताई ऊबाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, यात ९० दिवसांच्या आत असा शब्द वापरला आहे. मग याची व्हॅलिडीटी आत्ता काय राहिली आहे. समजा आम्ही हा विषय फेटाळला तर त्याचा निर्णय काय होणार आहे. आम्हाला गृहित धरुन सगळे केलेले आहे. म्हणजे सध्यातरी आम्ही इथे फक्त मम म्हणायच्या कामाचे आहोत. ९० डेज हा शब्द त्यात सांगितला आहे, त्याची व्हॅलिडीटी किती याचे उत्तर सांगा.

**मा.आयुक्त** - याबाबत शासन निर्णय घेईल.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, ९० दिवसांचा विषय उपस्थित झाला आहे. कायद्यात प्रोव्हिजन आहे. महाराष्ट्र नगररचना अधिनियमाच्या १५४ कलमानुसार, शासन कोणत्याही प्राधिकरणाला निर्देश देऊ शकते. त्याप्रमाणे कार्यवाही करणे प्रत्येक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही न झाल्यास शासन स्वतः ९० दिवसांनंतर ही कार्यवाही अधिकारी म्हणून करु शकते. कलम ३७ची जी जाहिर सूचना आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** - ९० दिवस कधी संपलेत ते सांगा.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, दि.१५/७/२०१५चा शासन निर्णय आहे. दि.४/११/२०१५ला मी हा विषय मांडला आहे. त्याआधी ब्ल्यू लाईन, रेड लाईन

यामधील क्षेत्र सुद्धा निर्देशात समाविष्ट करावे म्हणून शासन स्तरावर प्रयत्न केला होता. तसे बदलून न मिळाल्यामुळे आम्ही हा विषय मांडला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, खरेतर खूप चांगले झाले. मा.योगशभाई बहल यांनी सांगितले. तुम्ही सगळे प्रशासन अंगाला तेल लावलेले पहिलवान आहात. तुम्ही हातात येत नाहीत. तुम्ही आमच्या आमच्यात भांडणे लावलीत. तुम्ही प्रशासनानेच सुपारी घेतलीत कि काय. तुमचा यात सर्वे नंबर टाकायचा काय संबंध आहे. त्यात सर्वे नंबर आहेत का. दुसरे म्हणजे तुम्ही महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची प्रत आम्हाला दिली नाही त्यात तुमचा शंभर टक्के काहीतरी वेगळा हेतू होता. तुम्ही जो खुलासा केलात आम्ही तुम्हाला वारंवार म्हणत होतो. ज्यावेळी कलम ३७ ची कार्यवाही करता, हरकती सूचना मागवता तर सभागृहाने मान्यता दिलेल्या प्रस्तावावर कार्यवाही व्हायला पाहिजे, सूचना/हरकती घेता. सभागृहाने मान्यता दिलेल्या प्रस्तावावर कार्यवाही व्हायला पाहिजे, सूचना/हरकती घेतल्या पाहिजेत. शासन निर्देशानुसार कलम ३७ची कार्यवाही करणार असालतर माझी प्रशासनाला अशी विनंती आहे की, प्रशासनाने हा विषय दुरुस्तीसह पुढील वेळी सभागृहापुढे आणावा आत्ता हा विषय केलाततर हा विषय होणार नाही. त्यामुळे ज्या उपसूचना असतील त्या विषयात घेऊन पुढे आणा. परत अशी चूक करु नका.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, यात चार्ट देण्याचा उद्देश एवढाच होता की, कोणता एरिया आहे, किती एरिया आहे. उद्या महासभेत विचारले असते की, किती एरिया आहे. मग तुम्ही गावानुसार का केले नाही. म्हणून हा देण्याचा प्रयत्न आहे. तरी मी या मताशी सहमत आहे की, शासनाने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणेच केले पाहिजे त्यामुळे विषय क्र.७ मागे घेणेस परवानगी देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,मला एवढेच सांगायचे आहे की, आपले नदीपात्र किती आहे. इरिगेशन विभागाकडील माहितीनुसार आपले नदीपात्र किती कि.मी. आहे याचा खुलासा करावा. आपले नदीपात्र किती आहे हे मला अजून माहिती नाही. ३० मी. म्हणतोय. इरिगेशन विभागाने पूर्वी काय दिले होते. नवीन डिपीचा विषय याचा खुलासा झाला नाही.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या विषयामुळे आपण अडचणींत येणार का याचा पण खुलासा करावा.

**मा.शमिम पठाण-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, ऑलरेडी ४ महिन्यांपासून हा विषय अजेंडावर येतो आहे. आधीच ३ महिने होऊन गेले आहेत. शासनाचा निखळ म्हणजे आहे तसा प्रस्ताव आपल्यापुढे ठेवावा.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह,एक्झिस्टींग मॅप तयार करण्यासाठी एजन्सी नेमण्याची प्रक्रिया करतोय, त्यासाठी टेंडर काढतोय. आयुक्त साहेबांनी टेंडरला मान्यता देऊन सिटी इंजिनिअर यांच्याकडे प्रसिद्धीसाठी दिले आहे. २/३ दिवसांत टेंडर प्रसिद्ध होईल.

**मा.राजेंद्र जगताप** - आम्ही नगरसेवक ५/६ महिन्यांनी निवडणूकीच्या कामात असू. त्यावेळी काय होणार. २०१५ ला हा विषय तयार केला. आत्ता सुरुवात झाली आहे. हे ६ महिन्यांत, २०१६ मध्ये वर्षभरात होईल का?

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आपल्याला सहा महिन्यांचे बंधन नाही. सहा महिन्यांत प्रक्रिया पूर्ण होईल.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आपल्याला आधी विनंती केलेलीच आहे. परंतू शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पुढील जी.बी.ला तो विषय येईल याची काळजी घ्या. कृपा करुन चुकून सुद्धा जुन्या गावांचा उल्लेख करु नका नवीन गावांपुरताच उल्लेख करा. जुन्या गावांची दोन ओळींची उपसूचना द्यायची ती आम्ही देऊ. तुमचा विषय मात्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पुढील मिटींगला येऊ द्या आणि मा.महापौर साहेब,आपण हा विषय मागे घ्यायला सांगावा आणि दि.१०/२/२०१६ रोजी विशेष महापालिका सभा आयोजित करुन या सभेत विषय घेणेत यावा.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - हा विषय माघारी घेऊन दुरुस्त करुन पुढील सभेच्या वेळी आणावा

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ८०३ विषय क्रमांक - ७

दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि /कावि /१८/७४/२०१५ दि.४/११/२०१५

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७८८ दि.२०/११/२०१५

मा.आयुक्त यांनी केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.७ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८०४ विषय क्रमांक - ८
दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र
क्र.आरोग्य/२/कावि/८७४/२०१५दि.९/१२/२०१५

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,१७,५७,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ८,०९,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,३७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ३४,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **२७,३७,००० /-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूणअनुदान** | **२,५४,४०,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३०/११/२०१५ अखेर सोबत सादर केलेले प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे. शासन निर्णय क्र.स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा " असे कळविलेले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/११/२०१५ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र "अ"**

| | | |
|---|---|---|
| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका |
| जिल्हा | | पुणे |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ३०८७ |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | २५३२ |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १०२० |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ६७५ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | १८९ |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ९६५लाभार्थी | ५७.९० रु. लाख |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | नाही | सध्यस्थितीत काम चालू |

महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.शुभांगी लोंढे -** मा. महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शुभांगी लोंढे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८०५ विषय क्रमांक - ९

दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दि.६/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२०/११/२०१५ व दि.२१/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शुभांगी लोंढे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८०६ विषय क्रमांक - १०

दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.२८/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१६/११/२०१५ व २६/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शुभांगी लोंढे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८०७ विषय क्रमांक - ११
दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.३/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शुभांगी लोंढे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८०८ विषय क्रमांक - १२
दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतीक समिती**

अ) दि.२१/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.४/११/२०१५ व दि.१८/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१८/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/६/कावि/१३३४/२०१५ दि.१०/१२/२०१५
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१४२०३ दि.१५/१२/२००१५

शिक्षण मंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१६-२०१७ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे. शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रकास मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे कलम १५४ (२) अन्वये दिनांक १ जानेवारी पूर्वी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. सन २०१५-२०१६ च्या ४ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ८ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कमा नमूद केलेल्या आहेत. शिक्षण मंडळ सभेने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांचेशी चर्चा करुन सन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.११४,२६,९०,०००/- चे व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.११५,२७,२४,०००/- मान्यतेकामी सादर केले असल्याने त्यास मान्यता देणेची मा.आयुक्तांची मागणी असली तरी शिक्षण मंडळाकडील सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये शिक्षण मंडळाने तयार केलेले सुधारित र.रू. १,१५,४९,९४,०००/- व मूळ र.रू. १,३३,९८,२४,०००/- मंजूर करणेस व त्या प्रमाणे सुधारित मध्ये ७२,१३,२४,०००/- व मूळ मध्ये ९०,३३,६९,०००/- मनपा हिस्सा अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी लोंढे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सदस्य म्हणतात ते बरोबर आहे. मागील वेळी मिटींग तहकूब झाली होती. हा जो विषय आहे. हा विषय घ्या असे म्हणत नाही. मघाशीच मी ऊबाळे मॅडम यांना बोलवून घेतले होते. तेव्हाच मी त्यांना कल्पना दिली होती की, तुमचा विषय, प्रिंटींग हे आत्ता सभागृहात आलेले आहेत या विषयावर सगळ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. आपली २० तारखेला मा.महापालिका सभा आहे. त्याआधी एक दिवस आधी विशेष सभा किंवा पूररेषेचा विषय व शिक्षण मंडळाचा विषय या दोन विषयांकरीता दि. १० फेब्रुवारी २०१६ रोजी विशेष सभा घेण्यात यावी. आयुक्त साहेबांनी स्पष्ट करावे. मागील वर्षी सुद्धा शिक्षण मंडळाचा विषय महापालिका सभेपुढे ऐनवेळचा विषय म्हणून आला होता. इतके ढसाळ काम चालू आहे. मी अशी सूचना मांडते की, विषय क्र.१३ चा विचार दि.१०/०२/२०१६ रोजी विशेष महापालिका सभेचे आयोजन करुन या सभेत करणेत यावा.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - हा विषय तहकूब ठेवून दि.१०/०२/२०१६ चे विशेष महापालिका सभेत घेणेत यावा.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ८०९ विषय क्रमांक - १३
दिनांक - २५/०१/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/६/कावि/१३३४/२०१५ दि.१०/१२/२०१५
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१४२०३ दि.१५/१२/२००१५

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/११४/१६
दिनांक - १५/०३/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.